मे २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य

## देदीप्यमान महाराष्ट्र...

















## राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी...

# महामानवाला विनम्र अभिवादन...

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त चैत्यभूमी स्मारक येथे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विनम्र अभिवादन केले. या वेळी बुद्धवंदना घेण्यात आली. तसेच चैत्यभूमीवरील भीमज्योतीस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी भदन्त धम्मप्रिय यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, खासदार राहुल शेवाळे, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.**





भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१व्या जयंतीनिमित्त राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दरम्यान सामुदायिक त्रिशरण बुद्ध वंदना करण्यात आली. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री डॉ.विश्वजीत कदम, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बालसिंह चहल, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, पूज्य भदन्त डॉ. राहूल बोधी महाथेरो, नागसेन कांबळे उपस्थित होते.

# अंतरंग

## ६ पर्यटनाच्या समृद्ध दिशा


राज्यात पर्यटनाच्या असंख्य संधी आहेत. कृषी पर्यटन, वन पर्यटन, जलपर्यटन तसेच लेणी, जागतिक



वारसास्थळे, धार्मिकस्थळे, गडकिल्ले, जैवविविधता अशा असंख्य पर्यटनाच्या पर्यायांनी महाराष्ट्र समृद्ध आहे.

## ११ थंड हवेच्या कुशीत

राज्याला ७२० किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. राज्यात मंदिरे, गडकिल्ले आहेत. यासोबतच अनेक प्रसिद्ध थंड हवेची



ठिकाणेही आहेत. उन्हाळ्यात जिवाच्या होणाऱ्या काहिलीपासून बचावासाठी थंड हवेच्या ठिकाणी जाण्यास उत्सुक पर्यटकांसाठी राज्यातील महत्त्वाची थंड हवेची ठिकाणे जाणून घेऊ या..

## १४ समता सप्ताह उत्साहात

राज्य सरकार सातत्याने अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय म्हणून विविध कल्याणकारी योजना राज्यभर राबवते. या सर्व योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच त्याचे उद्देश साध्य व्हावेत, याकरिता राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम ६ ते १६ एप्रिल २०२२ या कालावधीत राबवण्यात आला.


## २१ जलद व सुखकर प्रवास

महानगरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रोसारखी जलद वाहतूक प्रणाली फायदेशीर ठरणार आहे. मुंबई मेट्रोच्या २-अ या दहिसर ते



डहाणूकरवाडी आणि मेट्रो-७ च्या दहिसर ते आरे या दोन मार्गिकांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच लोकार्पण झाले. मेट्रोच्या या मार्गिका म्हणजे राज्य शासनाने मुंबईकरांना दिलेली गुढीपाडव्याची भेट असून मेट्रोच्या या दोन नव्या मार्गिकांचा घेतलेला वेध..

## ४२ क्रिप्टो करन्सीच्या मोहमयी जगाची सफर



आर्थिक पेमेंट किंवा कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहारांबाबत तुमच्या मनातील शंकांचे समाधान जी. लिब्रान्ड आणि नताशा डी तेरां या लेखकांनी लिहिलेले 'दि पे ऑफ : हाऊ चेंजिंग दि वे वुई पे चेंजेस एव्हरीथिंग' हे पुस्तक वाचून होऊ शकेल.




## राजर्षी शाहू : लोकराजा

राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचे व्यक्तिमत्त्व लाखो नव्हे, तर करोडो लोकांत उठून दिसावे असे होते. एवढेच नव्हे, तर त्यांच्यासारखा थोर मानवतावादी राजा शतकातच नव्हे, तर सहस्रकात एखाद दुसराच होत असतो. शिवछत्रपतींबद्दल अनेकदा असे जाणवते की, त्यांच्या चरित्राचा जसजसा अभ्यास करत जावे, तसतसे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे नवनवीन पैलू दृश्यमान होत जातात. शाहू छत्रपतींबाबतही त्यांच्या चरित्र अभ्यासकांना हाच अनुभव येतो. त्यांच्या बहुरंगी आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या काही ठळक पैलूंचा हा परामर्श.

**४३–५८**


| | |
|---|---|
| पर्यटनाच्या समृद्ध दिशा | ६ |
| चला चिंब भिजायला... | ९ |
| थंड हवेच्या कुशीत | ११ |
| समता सप्ताह उत्साहात | १४ |
| सर्वसामान्यांची बँक | १६ |
| कांदळवन संरक्षण व संवर्धन | १८ |
| जलद व सुखकर प्रवास | २१ |
| 'सेवाव्रतीं'चा सन्मान | २३ |
| पाऊल पडते पुढे | २४–३५ |
| मंत्रिमंडळात ठरले | ३६–३९ |
| विकासकामांचे प्रतिबिंब | ४० |
| क्रिप्टो करन्सीच्या मोहमयी जगाची सफर | ४२ |
| राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी | |
| कृतज्ञता पर्व विशेष | ४३ |
| राजर्षी शाहू : लोकराजा | ४४ |
| कामगारांचा कैवारी | ५० |
| प्रेरणादायी समृद्ध वारसा | ५४ |
| कृतज्ञता पर्व | ५८ |

वर्ष ७३ वे | अंक ९ | मे २०२२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

■ मुख्य संपादक — दीपक कपूर
■ प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
■ संपादक — अनिल आलूरकर
■ उपसंपादक — अतुल पांडे, गजानन पाटील, राजाराम देवकर
■ वितरण — मीनल जोगळेकर
■ मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
■ मांडणी, सजावट — शैलेश कदम
■ मुद्रितशोधन — उमा नाबर
■ मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# मुंबईची नवी ओळख 'वृक्षनगरी'

मुंबईकर नागरिकांना विविध नागरी सेवासुविधा देतानाच मुंबईतील पर्यावरणाची जोपासना करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरणविषयक कामांची दखल आता थेट संयुक्त राष्ट्र संघाच्या अखत्यारितील संस्थेने घेतली आहे. या संस्थेने 'वृक्षनगरी' अर्थात 'Tree City' चा 'वर्ष २०२१' साठीचा बहुमान मुंबईला घोषित केला आहे. हा असा बहुमान मिळवणारे मुंबई हे भारतातील दुसरे शहर ठरले आहे. या गौरवामुळे 'स्वप्न नगरी' अशी ओळख असणाऱ्या मुंबई शहराला आता 'वृक्षनगरी' अशी एक नवी ओळख मिळाली आहे. जागतिक स्तरावरील या गौरवाची दखल घेऊन राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कौतुक केले आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात अलीकडेच झालेल्या एका विशेष बैठकीदरम्यान राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल आणि उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या अखत्यारितील 'अरबर डे फाऊंडेशन' यांच्याद्वारे प्राप्त झालेल्या सन्मानपत्राची प्रत दिली आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरणपूरक कामांचे कौतुक केले.


संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या अखत्यारीतील 'अरबर डे फाऊंडेशन' चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॅन लेंब यांनी या मुंबई शहराच्या बहुमानानिमित्त लिहिलेल्या विशेष पत्रात मुंबई शहराचे अभिनंदन केले आहे. तसेच मुंबई शहर हे आता शहरी आणि सामुदायिक वनीकरणात आघाडीवर असलेल्या महत्त्वाच्या जागतिक 'नेटवर्क'मध्ये सहभागी झाले आहे. हा अत्यंत प्रतिष्ठेचा दर्जा मिळवल्याबद्दल त्यांनी मुंबई शहराचे आणि पर्यायाने मुंबईकरांचे अभिनंदन केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात आलेली मियावाकी जंगले, नियमितपणे करण्यात येणारे वृक्षारोपण, वृक्षांची घेण्यात येणारी शास्त्रशुद्ध निगा, जनजागृती, संबंधित संसाधनांचे वाटप अशा विविध मानकांच्या आधारे जगभरातील शहरांचे मूल्यमापन करण्यात येऊन मुंबईची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी भारतातील केवळ हैदराबाद या एकाच शहराला हा बहुमान लाभला आहे. त्यामुळे 'वृक्षनगरी'चा बहुमान मिळवणारे मुंबई हे देशातील दुसरे शहर ठरले आहे.

# प्रगतीच्या पाऊलखुणा

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२वा वर्धापनदिन साजरा करत असताना मागे वळून पाहिल्यास चौफेर प्रगतीच्या पाऊलखुणा नजरेस पडतात. देशाच्या एकंदरीत आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीत राज्याचा सदैव सिंहाचा वाटा राहिला आहे. देशाला आणि अवघ्या जगाला दिशा देण्याचे सामर्थ्य महाराष्ट्राकडे आहे. असंख्य संकटांचा सामना करत, प्रचंड संघर्षातून तावूनसुलाखून निघत 'महा'राष्ट्र असे नाम धारण केलेल्या या पुण्यभूमीने आपला इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिला आहे.

आतापर्यंतच्या इतिहासात प्रत्येक संकटात राज्याने खंबीरपणे पाय रोवून आपले सामर्थ्य, नेतृत्व, कर्तबगारी सिद्ध केली आहे. अलीकडेच आपल्याला कोविड-१९ सारख्या महासंकटासोबतच महापूर, चक्रीवादळे अशा विविध आपत्तींचा सामना करावा लागला. मात्र महाविकास आघाडी सरकारने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन वर्षांत या आपत्तिकाळातही राज्याच्या विकासाचे चक्र अव्याहतपणे सुरू ठेवून विविध आघाड्यांवर दमदार कामगिरी केली आहे.



महाराष्ट्राने देशातले एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था असलेले पहिले राज्य होण्यासाठी विकासाची पंचसूत्री ठरवली आहे. कोरोनाच्या तीन लाटांचा नियोजनबद्ध रीतीने सामना करत असताना महाराष्ट्राने देशात एक उदाहरण निर्माण केले आहे. केंद्र शासनाच्या 'सुशासन निर्देशांक अहवाल - २०२१' मध्ये महाराष्ट्राने दुसरे स्थान मिळवले आहे.

इलेक्ट्रिक वाहन धोरण, पहिल्या टप्प्यात आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यात येत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ४८८ शाळा, ग्रामीण भागात महाआवास योजनेतून देण्यात आलेली पावणेपाच लाख घरे, कोरोना काळात गरीब आणि गरजूंना नि:शुल्क शिवभोजन थाळी, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत लाभ, विकेल ते पिकेल अभियान, शेतकऱ्यांसाठी मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना, राज्याचे स्वतंत्र कृषी निर्यात धोरण आदी निर्णयांमुळे सर्वांगीण प्रगतीला गती मिळाली आहे.

रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबईतील बेलापूर येथून मुंबई, एलिफंटा, जेएनपीटी या जलमार्गांवर वॉटर टॅक्सी सेवा, तर पालघर, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जेट्टींची कामे सुरू आहेत.

विमान वाहतुकीला चालना देण्यासाठी राज्य शासनाने विविध निर्णय घेतले आहेत. मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी मेट्रो प्रकल्पांच्या कामांना अधिक गती देण्यात आली आहे. मेट्रोच्या विविध १४ प्रकल्पांचे काम वेगाने सुरू आहे. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत एक लाख सौर कृषी पंप उद्दिष्टापैकी एकूण ९९ हजार ८५२ सौर कृषी पंप लावण्यात आले आहेत. त्याचबरोबर अल्पसंख्याक, आदिवासी, ऊसतोड कामगार किंवा असंघटित कामगार, सर्व दुर्बल घटकातील नागरिकांसाठी राज्य शासनाने मदतीचा हात दिला आहे. राज्यातील गडकिल्ल्यांचे तसेच प्राचीन मंदिरांचे जतन आणि संवर्धन करण्याची योजना हाती घेण्यात आली आहे.

वरील सर्व कामगिरीचे प्रतिबिंब या अंकात दिसणार आहे. तसेच मे महिन्यातील उन्हाळी सुट्या लक्षात घेता थंड हवेची ठिकाणे व पावसाळी पर्यटन या विषयांवरील लेख हे या अंकाचे मुख्य आकर्षण आहेत. त्याचबरोबर पर्यटन वाढीसाठी राज्य शासनाने घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय व उपक्रमांची माहितीही अंकात देण्यात आली आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची ६ मे रोजी १०० वी पुण्यतिथी. त्यानिमित्ताने हे वर्ष 'कृतज्ञता पर्व' म्हणून साजरे केले जात असून राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अंकात समाविष्ट करण्यात आलेल्या 'कृतज्ञता पर्व विशेष' विभागात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची, योगदानाची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर 'कांदळवन संवर्धन', 'समता सप्ताह', 'जागतिक परिचारिका दिन' आदी विषयांसोबतच मंत्रिमंडळ निर्णय व महत्त्वपूर्ण घडामोडी ही नेहमीची सदरेही अंकात समाविष्ट आहेत. हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.

**दीपक कपूर**
(मुख्य संपादक)

राज्यात पर्यटनाच्या असंख्य संधी आहेत. कृषी पर्यटन, वन पर्यटन, जलपर्यटन तसेच लेणी, जागतिक वारसास्थळे, धार्मिकस्थळे, गडकिल्ले, जैवविविधता अशा असंख्य पर्यटनाच्या पर्यायांनी महाराष्ट्र समृद्ध आहे. या वैविध्यपूर्ण पर्यटनस्थळांची माहिती देशीविदेशी पर्यटकांपर्यंत विविध माध्यमातून पोहोचवली जात आहे. त्यांना 'महाराष्ट्र पर्यटन'साठी आकर्षित केले जात आहे. पर्यटन धोरण, पर्यटनस्थळी पायाभूत सुविधा, पर्यटक वाढीसाठीचे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम आदींच्या माध्यमातून राज्यातील पर्यटनाला उभारी मिळत आहे.



# पर्यटनाच्या समृद्ध दिशा

**डॉ. धनंजय सावळकर**

जगभरात थैमान घातलेल्या कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर जागतिक व देशपातळीवर घोषित करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे पर्यटन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव हा कमी झाल्याने व देशपातळीवर टाळेबंदी व संचारबंदी शिथिल करण्यात आल्यामुळे देशांतर्गत पर्यटन व्यवसाय पूर्वपदावर येत आहे. आपल्या देशातही स्वदेशी पर्यटनात वाढ होताना दिसत आहे. महाराष्ट्र राज्य हे पर्यटन क्षेत्रातील एक अग्रेसर राज्य आहे.

कोरोनापश्चात नागरिकांच्या बदलत्या सवयी विचारात घेऊन राज्याच्या पर्यटन विभागाने काही पर्यटन धोरणे अमलात आणली आहेत. त्यामधील कृषी पर्यटनाच्या धोरणामुळे पर्यटकांना कमी गर्दीच्या ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यात आणि ग्रामीण संस्कृतीचा अनुभव देणारा पर्यटनाचा एक वेगळा आयाम उपलब्ध झालेला आहे. जवळपास ४०० कृषी पर्यटन केंद्रांनी पर्यटन विभागाकडे नोंदणी केली आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, नाशिक, मराठवाडा व विदर्भ अशा सर्वच विभागात कृषी पर्यटनाला वेगवेगळ्या स्वरूपाच्या पीक पद्धती व विविध फळबागांच्या प्रकारांमुळे खूप मोठा वाव आहे.

## साहसी पर्यटन

सह्याद्रीच्या पर्वत रांगा, विस्तीर्ण समुद्रकिनारा व घाटमाथ्यावरील पठारी प्रदेश अशा वैविध्यपूर्ण भौगोलिक परिस्थितीमुळे साहसी पर्यटनासाठी महाराष्ट्रात मोठा वाव आहे. साहसी पर्यटनाला गती देण्यासाठी राज्याने ऑगस्ट २०२१ मध्ये साहसी पर्यटनाचे नवीन धोरण अमलात आणले असून २५० हून अधिक साहसी पर्यटन संस्थांचे या धोरणांतर्गत अर्ज प्राप्त झाले आहेत. साहसी पर्यटनात असलेले धोके कमी करण्याच्या दृष्टीने व सुरक्षितेत वाढ करण्याच्या दृष्टीने साहसी पर्यटन प्रकारनिहाय विस्तृत नियमावली बनवण्यात आली आहे. याशिवाय या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी साहसी पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे साहाय्य घेण्यात येत आहे.

या धोरणांतर्गत जलसाहसी क्रीडा प्रकारात नवीन व्यावसायिक उतरत असल्याचे दिसून येत आहेत. तसेच गडकिल्ले ट्रेकिंग या साहसी प्रकारातील अपघात टाळण्यासाठीदेखील उपाययोजना आखण्यात येत आहेत.



## पर्यटनस्थळांची प्रसिद्धी

महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची देशपातळीवर व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी करणे हे देखील पर्यटन विभागाच्या कामकाजाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. याकरिता पर्यटन विभागाने आता कंबर कसली आहे. त्यासाठी प्रसिद्धीच्या सर्व प्रकाराच्या माध्यमांचा प्रभावीपणे वापर करण्यात येत आहे. याकरिता पर्यटन विभागाने महाराष्ट्र पर्यटनाच्या संकेतस्थळातही सुधारणा केली असून ती आता इतर विविध भाषांतदेखील उपलब्ध आहे. तसेच आजच्या पिढीतील तरुणाईचा कल विचारात घेऊन महाराष्ट्र पर्यटनाच्या विविध सामाजिक माध्यमांद्वारे (सोशल मीडिया) प्रभावी प्रसिद्धी करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत १.५ दशलक्ष फॉलोअर्स सोशल मीडियाच्या माध्यमातून जोडले गेले आहेत. तसेच 'महाराष्ट्र पर्यटन' या नावाने मोबाईल ॲपदेखील विकसित करण्यात आले आहे. याशिवाय दूरचित्रवाहिनी, रेडिओ, एअरपोर्ट, रेल्वे व

अन्य बाह्य (आऊटडोअर) जाहिरातींद्वारे प्रसिद्धी करण्यात येत आहे. देशांतर्गत विविध राज्यातील प्रभावकांना (एन्फ्ल्युअन्सर) राज्यातील पर्यटनस्थळी आणून त्याद्वारे देखील 'क्रिएट युवर वोन स्टोरी' माध्यमातून प्रसिद्धी मोहीम राबवण्यात येत आहे.

## पर्यटन महोत्सव

राज्यात स्थानिक पातळीवर काही अल्प प्रमाणात प्रसिद्ध असलेल्या पर्यटन स्थळांना प्रसिद्धी देण्यासाठी पर्यटन महोत्सव घेण्यात आले. त्यात प्रामुख्याने जुन्नर द्राक्ष महोत्सव,



तेर महोत्सव, होट्टल महोत्सव, बोधलकसा पक्षी महोत्सव, रामटेक साहसी व वारसा महोत्सव, श्रीवर्धन महोत्सव, कातळशिल्प रत्नागिरी महोत्सव, नाशिक ग्रेप हार्वेस्ट महोत्सव व नांदूर मधमेश्वर महोत्सव असे विविध ठिकाणी पर्यटन महोत्सव घेण्यात आले आहेत.

## नावीन्यपूर्ण विपणनावर भर

महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचे सुयोग्य विपणन ही देखील पर्यटन विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. २०२१-२२ या वर्षात पर्यटन संचालनालयामार्फत देशांतर्गत विविध ९ राज्यात आयोजित करण्यात आलेले 'रोडशोज' तसेच तेथील 'टूर ऑपरेटर्स' यांच्याकरिता आयोजित केलेले ३ 'फॅम टूर्स' व 'व्यावसायिक ट्रॅव्हल मार्ट'मध्ये सहभागी झालेल्या संस्थांकडून महाराष्ट्र पर्यटन विपणन प्रक्रियेमधील उणिवांबाबत मौलिक सूचना प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने



**आदित्य ठाकरे**
मंत्री, पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार

### उपक्रमांना पर्यटकांचा प्रतिसाद

राज्यात पर्यटनासाठी सर्व प्रकारचे पर्याय उपलब्ध असून येथे पर्यटकांना अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. कोरोना काळात पर्यटनक्षेत्र बंद असले तरीही त्यानंतर पर्यटकांना आकर्षिक करण्यासाठी विभागाने विविध योजनांच्या अंमलबजावणीचे नियोजन केले. आता पर्यटक पुन्हा एकदा बाहेर पडत असून राज्यात पारंपरिक पर्यटनाबरोबरच साहसी पर्यटन, बीच शॅक्स, कॅराव्हॅन, कृषी पर्यटन आदी योजनांसाठीच्या नोंदणीला तसेच मुंबईत दादर व गिरगाव चौपाटी येथे नुकत्याच उभारलेल्या दर्शक गॅलरीसारख्या नवीन उपक्रमांना पर्यटकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

महाराष्ट्रात दीर्घ कालावधीचे टूर पॅकेजेस उपलब्ध नसल्याचे व खासगी सहभागीदारांद्वारे ते चालवले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी सद्य:स्थितीत महाराष्ट्रात अल्प कालावधीचे (२ ते ३ दिवस) विशेष करून शनिवार व रविवार अशा सुट्टीच्या दिवसांचे पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्यातील हॉटेल/रिसॉर्ट व्यावसायिकांनादेखील आठवड्याच्या दिवशी (विकडेज) कमी प्रतिसाद मिळत असून त्यामुळे पर्यटनस्थळांच्या सर्वांगीण विपणन प्रक्रियेस बाधा येत आहे. तसेच दीर्घ कालावधीच्या टूर्स उपलब्ध नसल्याने बरेचसे राज्याबाहेरील पर्यटक अल्प कालावधीच्या टूर्स करून परत जातात. पर्यटन वाढीच्या विविध निर्देशकांपैकी 'पर्यटकांचे वास्तव्याचे एकूण दिवस' हा एक महत्त्वाचा निर्देशांक आहे व त्याच्या वाढीकरिता अशा दीर्घ कालावधीच्या टूर पॅकेजेस चालवण्याची व्यवस्था उभारणे हे अत्यंत आवश्यक असल्याने टूर ऑपरेटर्समार्फत पहिल्या टप्प्यात राज्यातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांना जोडून ६ ते ८ दिवसांची १५ टूर पॅकेजेस बनवण्यात आली असून आगामी काळात खासगी टूर ऑपरेटर्समार्फत अशी पॅकेजेस चालवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

पर्यटन संचालनालयाने २०२१-२२ मध्ये देशांतर्गत ९ राज्यांतील महत्त्वाच्या ९ शहरांमध्ये रोडशोज आयोजित करून राज्यात पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. रोडशोज कार्यक्रमास मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या वर्षी देखील देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये रोडशोज कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच देशांतर्गत विविध राज्यातील टूर ऑपरेटर्सकरिता परिचय सहली (फॅम टूर्स) आयोजित करण्यात येणार आहेत. एकंदरीतच पर्यटन स्थळांच्या विपणानाची प्रभावी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न खासगी पर्यटन व्यावसायिकांच्या माध्यमातून केला जात आहे.

## पायाभूत सुविधांचा विकास

पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासाठी २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत ६५८ कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याशिवाय खासगी गुंतवणुकीच्या माध्यमातून रोपवे व अन्य सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. तसेच दर्जेदार आदरातिथ्य व्यवस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवडक मालमत्ता खासगी उद्योजकांच्या गुंतवणुकीमधून श्रेणीवाढ करण्यात येत आहे. महाबळेश्वर, माथेरान, मिठबाव व हरिहरेश्वर या ठिकाणच्या पर्यटक निवासांकरिता श्रेणीवाढीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच आणखी काही मालमत्तांचा अशाच प्रकारे आगामी काळात विकास करण्यात येणार आहे. मुंबई व ठाणे या शहरांत यशस्वी होत असलेल्या 'टॅक्टिकल अर्बनिझम'सारखा वैशिष्ट्यपूर्ण व

पर्यटन स्थळांचे सौंदर्य वाढवणारा प्रकल्प महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, लोणावळा, चिखलदरा यासारख्या थंड हवेच्या ठिकाणी राबवण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून नाशिक, तारकर्ली व गणपतीपुळे या ठिकाणी आधुनिक जलपर्यटन सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

## मुंबई पर्यटनाला चालना

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून आंतराष्ट्रीय पर्यटनासाठी महत्त्वपूर्ण असे शहर आहे. नजीकच्या काळात पूर्णत्वास येत असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांचे जाळे (३३७ कि.मी.), कोस्टल हायवे प्रकल्प, शिवडी न्हावा-शेवा ट्रान्स हार्बर लिंक, नवी मुंबई विमानतळ यांसारख्या महत्त्वपूर्ण पायाभूत प्रकल्पांमुळे पर्यटन वाढीस मदत होणार आहे.

मुंबईतील रात्र पर्यटन वाढीच्या दृष्टीने हेरिटेज इमारतींवर विद्युत रोषणाई प्रकल्प राबवण्यात येत असून त्याअंतर्गत गेट वे ऑफ इंडिया, जनरल पोस्ट ऑफीस, पोलीस महासंचालक कार्यालय यांसारख्या ऐतिहासिक वास्तूंवर रोषणाई करण्यात येणार आहे. तसेच मागील वर्षी पर्यटनाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय व मुंबई उच्च न्यायालय या ऐतिहासिक वास्तू उपलब्ध करून दिल्या आहेत.

आगामी काळात मुंबई विद्यापीठ व जनरल पोस्ट ऑफिससारख्या अन्य महत्त्वपूर्ण ऐतिहासिक इमारती पर्यटनासाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. याशिवाय बृहन्मुंबई महानगरपालिकेने राबवलेल्या दादर व गिरगाव चौपाटी येथील दर्शक गॅलरीसारख्या प्रकल्पांमुळे समुद्र किनाऱ्याचे सौंदर्य पाहण्याची वेगळी संधी निर्माण करण्यात आली आहे. याशिवाय मुंबईतील किल्ले विकासाची योजना राज्य पुरातत्त्व विभागामार्फत राबवण्यात येत आहे.

## धार्मिक स्थळांचा विकास

धार्मिक पर्यटन हे महाराष्ट्र पर्यटनाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळमार्फत पुरातन व महत्त्वपूर्ण अशा धूतपापेश्वर (रत्नागिरी), गोंदेश्वर (नाशिक), कोपेश्वर खिद्रापूर (कोल्हापूर), खंडोबा (औरंगाबाद), एकवीरा देवी (पुणे), मार्कंडा (गडचिरोली), आनंदेश्वर (अमरावती) व भगवान पुरुषोत्तम (बीड) या मंदिरांच्या पर्यटन विकासाकरिता १०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## गाईड प्रशिक्षण कार्यक्रम

पर्यटन स्थळांची माहिती देण्यामध्ये गाईडची भूमिका फार महत्त्वाची असते. त्याकरिता केंद्र शासनाच्या आयआयटीटीएम ग्वाल्हेर या संस्थेच्या साहाय्याने पर्यटन संचालनालयाने मुरबाड, अलिबाग, मुरुड-जंजिरा, श्रीवर्धन, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, भंडारदरा, नाशिक, औरंगाबाद, जुन्नर, बृहन्मुंबई (दोन ठिकाणी) व अहमदनगर अशा १३ पर्यटनस्थळी गाईड प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आले व त्यात सहभागी झालेल्या तरुणांना गाईड प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात ३५० तरुण सहभागी झाले. तसेच केंद्र शासनाच्या टूर फॅसिलिटेटर या ऑनलाईन प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी भाग घेऊ इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणांसाठी योजना राबवल्या जात असून आतापर्यंत ७०० तरुणांनी या प्रशिक्षणात सहभाग दर्शवला आहे.

एकंदरीतच महाराष्ट्र पर्यटनाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वोतोपरी प्रयत्न सुरू आहेत. विविध पर्यटन उपक्रम, पर्यटन धोरण, पर्यटन विकास योजनांच्या माध्यमातून राज्यात पर्यटन मोठ्या प्रमाणावर वाढेल, अशी खात्री आहे.

(लेखक हे पर्यटन संचालनालय, मुंबई येथे सह संचालक आहेत.)



**कु. आदिती तटकरे**
राज्यमंत्री, पर्यटन, उद्योग, खनिकर्म, फलोत्पादन, क्रीडा व युवककल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क

## पर्यटनवृद्धी व रोजगार निर्मिती

महाराष्ट्र हे ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक, वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी देशाच्या विविध प्रांतांतून परदेशांतून लाखो पर्यटक राज्यात येतात. मुंबई, अजिंठा आणि वेरूळ यांना परदेशी पर्यटकांची पहिली पसंती असते. राज्याच्या संस्कृतीची व परंपरेची विविधांगी ओळख व्हावी आणि पारंपरिक पर्यटनापेक्षा वेगळी अनुभूती पर्यटकांना मिळावी, यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्य शासन, पर्यटन संचालनालय व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण संकल्पना राबवून पर्यटनविषयक महत्त्वपूर्ण धोरणे, विविध पर्यटन स्थळांसाठी सामंजस्य करार या माध्यमातून राज्यात पर्यटनवृद्धी व त्यातून रोजगार निर्मिती होण्यासाठी पर्यटन विभागाची वाटचाल सुरू आहे.

## कॅराव्हॅन पर्यटन धोरण

नव्याने आणलेल्या कॅराव्हॅन पर्यटन धोरणांतर्गत कॅराव्हॅनची नोंदणी ही हळूहळू वाढताना दिसत आहे. कॅराव्हॅनमुळे दुर्गम पर्यटन स्थळांच्या ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन



विशेष अनुभवजन्य निवास व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. परिवहन विभागाने अशा कॅराव्हॅनना द्याव्या लागणाऱ्या वार्षिक वाहनकरातून सूट देण्यात आली आहे.

**थोडी कळ सोसायची, उन्हाची झळ सरणार आहे. पावसाच्या आगमनाने हिरवळ फुलणार आहे. मातीचा सुगंध, हिरवळ, वाहते-कोसळते धबधबे असा योग जुळून यावा याची तुम्ही वाट पाहताय ना? नुसती वाट बघू नका, तर तयारीला लागा. लॉकडाऊननंतरचा पहिलाच पावसाळा असल्याने गेल्या दोन वर्षांत शक्य न झालेली पावसाळी सहल कुठे करायची यासाठी सर्वोत्तम अशी काही ठिकाणे आपण पाहणार आहोत...**

# चला चिंब भिजायला...

राज्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत अनेक पावसाळी पर्यटन स्थळे पाहायला मिळतात. या पर्यटन स्थळांवर दरवर्षी पावसाळ्याच्या दिवसांमध्ये गर्दी पाहायला मिळते. यात भंडारदरा, माळशेज घाट, खोपोली, ताम्हीणी घाट, ठोसेघर, भांबवली, मार्लेश्वर या पर्यटन स्थळांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. निसर्गाच्या कुशीत असलेली ही पर्यटन स्थळे पर्यटकांना दिवसेंदिवस आकर्षित करत आहेत. ही पावसाळी पर्यटन स्थळे पर्यटकांना नक्कीच आवडणारी अशी आहेत.

## माळशेज घाट

उत्तुंग कड्यांवर कोसळणारा मुसळधार पाऊस आणि शुभ्र खळखळत फेसाळणारे धबधबे, ढगांची गर्दी, त्यातून जाणारा घाटाचा रस्ता, वाचून वाटत असेल त्याहून १०० पट सुंदर अशा माळशेज घाटाची सफर पावसाळ्यात न चुकवण्यासारखी आहे. नगर-कल्याण रस्त्यावरच्या माळशेज घाटाच्या सुरुवातीला पठारावरील एमटीडीसीचे रिसॉर्ट अलीकडे पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. जवळच खुबी गावाजवळ पिंपळगाव धरणाचा सुंदर जलाशय आहे. मागे हरिश्चंद्रगडाची उत्तुंग डोंगररांग पसरलेली आहे.

माळशेजच्या समोर दरीच्या तळात घनदाट जंगलामुळे इथे ससा, घोरपड, मुंगूस, बिबळ्या अशा वन्यप्राण्यांचा वावर असतो. जुलै ते सप्टेंबर महिन्यात सैबेरियातून येणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांचे थवे घाटाच्या अलीकडे डोंगरवाडीजवळ, शेतांमध्ये साचलेल्या पाण्यात आवर्जून दिसून येतात. पावसाळ्यात माळशेज घाटाकडे जाताना दूर डावीकडे डोंगरात खूप उंचावरून कोसळणारा धबधबा दिसतो.



या वाटेत अनेक ठिकाणी वडापाव, मका भजी, कणीस असे पदार्थ मिळतात. एका कटिंग चहासोबत पावसात हे पदार्थ म्हणजे खवय्यांसाठी खरी पर्वणी आहे.

## खोपोली

मुंबई, पुण्यातील मित्रांसोबत नक्की पर्यटनाचे नियोजन कुठे करावे हे ठरत नसेल, तर खोपोलीच्या रूपात सुवर्णमध्य साधता येईल. खोपोलीत लहानमोठे शेकडो धबधबे आहेत. एखाद्या ठरावीकच ठिकाणी जायचे नसेल आणि स्वतःची गाडी असेल तर नुसते वाटेतही हिरवळ, धबधबे असे मोहक रूप पाहत सैर करता येईल. खोपोलीत गगनगिरी महाराजांच्या मठाला भेट देणे चुकवू नका.

जर तुम्ही कुटुंबासोबत पिकनिकला जात असाल आणि फार गर्दी नसलेले ठिकाण शोधताय, तर खोपोलीजवळचा झेनिथ, कोलते, ढेंगटाक, कापरी धबधबा हे उत्तम पर्याय आहेत. मात्र पावसाळ्यात धबधब्याचा प्रवाह खूप वेगवान असतो. त्यामुळे आवश्यक खबरदारी घ्या.

## भंडारदरा

कळसूबाई पर्वताच्या कुशीत वसलेले भंडारदरा पावसाळ्याची चाहूल लागताच भेट देण्यासाठी उत्तम पर्याय आहे. भंडारदऱ्यातील विल्सन धरण, रंधा धबधबा हे पावसाच्या महिन्यात अगदी रौद्र रूप धारण करतात. त्यामुळे जूनच्या उत्तरार्धात किंवा जुलैच्या सुरुवातीला आपण सहलीचा बेत आखणे उत्तम ठरेल.

विल्सन धरणावरच छत्रीसारख्या आकाराचा एक मोठा गोलाकार धबधबा म्हणजेच 'अम्ब्रेला फॉल' तसेच शेंडी या गावापासून १० कि.मी.वर रंधा धबधबा व जलविद्युत निर्मिती प्रकल्प पाहणे अजिबात चुकवू नका.

भंडारदऱ्याहून बोटिंगचा आनंद घेत रतनवाडी येथील आदिवासी कोळी महादेव जमातीच्या अमृतेश्वराच्या पुरातन हेमाडपंथी मंदिरापर्यंत पोहोचता येते. या मंदिरावरील दगडी नक्षीकाम अत्यंत सुबक आहे. मंदिरातील शिवलिंग पावसात पूर्णतः

पाण्यात बुडालेले असते. रतनवाडी परिसरात अनेक धबधबे असून गळ्यातील हारासारखा दिसणारा 'नेकलेस फॉल' हा विशेष लोकप्रिय आहे.

भंडारदरा हे बॉलीवूडच्या दिग्दर्शकांचेही आवडते स्थान असल्याने 'कटी पतंग', 'हीना', 'राम तेरी गंगा मैली', 'राजू चाचा', 'देऊळ' या चित्रपटांचे चित्रीकरण येथे झाले आहे.

## ताम्हिणी घाट


ताम्हिणी घाटातून पसरलेली हिरवळ, थंडगार वाहता वारा, डोंगरावर उतरून आलेले पांढरे ढग व कोसळणारे शुभ्र धबधबे हा नजारा प्रत्येक थकलेल्या जिवाला हवीहवीशी शांती देऊन जातो. मुंबई-गोवा महामार्गाने कोलाडपर्यंत जाताना कुंडलिका नदीवरील पूल ओलांडला की, डाव्या बाजूला मुळशी धरण आहे. कोलाड आणि मुळशी धरणाच्या मधल्या भागात हा ताम्हिणी घाट आहे. ताम्हिणी हा घाट मुंबईपासून सुमारे १४० कि.मी. अंतरावर असून पुण्यापासून पौड रस्त्यामार्गे ९३ कि.मी. अंतरावर वसलेला आहे. या घाटात ताम्हिणी वन्यजीव अभयारण्य वसलेले आहे. ताम्हिणी अभयारण्यात सस्तन प्राण्यांच्या २८ प्रजाती तसेच स्थानिक पक्षांच्या १२ प्रजातींसह येथे १५० प्रकारचे पक्षी आपण पाहू शकतो. विशेष म्हणजे या अभयारण्यात ७२ प्रकारची फुलपाखरे, ८ प्रकारचे सरपटणारे प्राणी आणि वरदानी आणि काळकाई देवराई सह ३३ प्रकारच्या दुर्मीळ वनस्पतीदेखील आहेत. एक दिवस काढून सुद्धा तुम्ही ही सहल पूर्ण करू शकता. येथेच कोलाड परिसरात पावसाळ्यात रिव्हर राफ्टिंगची देखील मज्जा अनुभवता येईल.



## ठोसेघर व भांबवली

महाराष्ट्र राज्यातील जैवविविधतेचा हॉटस्पॉट म्हणजे कास पठार. रानफुले, फुलपाखरे व दुर्मीळ वनस्पतींनी नटलेल्या कास पठाराची आणखी एक खास ओळख म्हणजे येथील वजराई भांबवली आणि नवाजा ठोसळेघर धबधबा. सातारा जिल्ह्यातील तारळी नदीवर ठोसेघर धबधबा आहे. विशेष म्हणजे सर्वात लहान धबधबा २० मीटर आहे, तर सर्वात उंच धबधबा २१० मीटर आहे. येथून जवळच कोयना अभयारण्यात दुर्मीळ प्राणी, पक्षी, साप, कीटक आढळतात.

कास पठारापासून ५ कि.मी.वर भांबवली व येथून १ कि.मी. चालत मग धबधब्यापर्यंत पोहोचता येते, ही मधली पायवाट घनदाट जंगलाची असून झाडाझुडपांच्या गर्दीतून सूर्यप्रकाशदेखील जमिनीवर पोहोचत नाही. येथे पोहोचल्यावर धबधब्याच्या माथ्यावर वजराईदेवीचे (साते आसरा) जागृत देवस्थान आहे. भांबवलीच्या जंगलात बरेच वन्यजीव आहेत. हा धबधबा बारमाही वाहता असतो, त्यामुळे येत्या विकएंडलासुद्धा हा बेत करायला हरकत नाही.



## मार्लेश्वर

रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वर तालुक्यात देवरूखपासून १८ कि.मी. अंतरावर मार्लेश्वर हे गाव आहे. येथील एका नैसर्गिक गुहेत भगवान शिवाचे जागृत शिवलिंग आहे व जवळच बारमाही वाहणारा धबधबा आहे. या मार्गावर पावसाळ्यात अनेक लहान मोठे धबधबे कोसळत असतात. देवस्थान असल्याने इथे वर्षभर गर्दी असतेच; पण श्री देव मार्लेश्वरचा विवाह कोंडगाव (साखरपा) मधील श्री देवी गिरजाईशी मकर संक्रांतीच्या दिवशी होतो. कोंडगाव-साखरपा येथून भोगीच्या दिवशी श्री देवी गिरजाईची पालखी मार्लेश्वरला निघते. त्या दोन दिवशी मार्लेश्वरला मोठी यात्रा भरते.

मार्लेश्वरबाबत एक आख्यायिका म्हणजे या धबधब्याखाली उभे राहून ओम नमः शिवाय म्हटल्यावर धबधब्याचे पाणी थेट डोक्यावर पडते, असे येथे येणारे अनेक भाविक आपल्याला हा अनुभव आल्याचे सांगतात. पावसाळ्यात धबधब्याचा वेग इतका जास्त असतो की, मंदिराच्या पुढे जाण्यासही परवानगी नसते. मात्र हे दृश्य दुरून पाहूनही डोळ्याचे पारणे फिटते.

पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**राज्याला ७२० किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. राज्यात मंदिरे, गडकिल्ले आहेत. यासोबतच अनेक प्रसिद्ध थंड हवेची ठिकाणेही आहेत. उन्हाळ्यात जिवाच्या होणाऱ्या काहिलीपासून बचावासाठी थंड हवेच्या ठिकाणी जाण्यास उत्सुक पर्यटकांसाठी राज्यातील महत्त्वाची थंड हवेची ठिकाणे जाणून घेऊ या..**

# थंड हवेच्या कुशीत

असं वाटतं ना चार दिवस मस्त सुट्टी टाकून कुठेतरी थंड ठिकाणी निघून जावे. उन्हाळ्यात जीवाची काहिली होणारा प्रत्येक जीव हा एकच विचार करत असेल, तुम्हीही करताय का? आता थंड ठिकाण म्हणजे थेट काश्मीर गाठावे तर एवढी सुट्टी देणार कोण? बरं सुट्टी मिळाली तरी बजेटचा आकडा पाहता घाम फुटतो तो वेगळाच! या सगळ्या संभ्रमात अडकला असाल तर आज हा लेख तुमच्या नक्की कामी येईल. आज आपण आपल्या घराची म्हणजेच आपल्या महाराष्ट्रातील काही सुंदर थंड हवेची ठिकाणे पाहणार आहोत. लोणावळा, खंडाळासारखी हिरवाईने नटलेली, थंड हवामानाची महाराष्ट्रातील ही ठिकाणे आपणही ऐकून असालच पण आजच्या या लेखात आपण ओळखीच्याच ठिकाणांची काहीशी अनोळखी बाजू पाहुयात. जेणेकरून तुम्हाला तुमच्या सुट्टीचे नियोजन आखायला मदत होईल...

## आंबोली

महाराष्ट्रातील सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या ठिकाणांपैकी एक असलेल्या आंबोलीमध्ये वर्षभरात सरासरी ७५० सेंटीमीटर पाऊस पडतो. भरपूर पावसामुळे आंबोलीत घनदाट जंगल आहे. परिणामी येथे अनेकदा रानडुकरे, ससे, गवे, बिबटे, चितळ आदी वन्य प्राणी आढळतात. सहसा न दिसणाऱ्या पक्ष्यांचेही येथे दर्शन होते, त्यामुळे आंबोली सहल ही प्राणिप्रेमींसाठी विशेष ठरते. या भागात बडा धबधबा, आंबोली धबधबा, शिरगावकर धबधबा, महादेव धबधबा आणि नांगरट धबधबा अशा धबधब्यांची मांदियाळी आहे. हिरण्यकेशी नदीच्या उगमस्थानाजवळ एक पुरातन शिवमंदिर आहे. हे मंदिर स्वतः शंकराने अवतार घेऊन बांधल्याची आख्यायिका आहे. मारुती मंदिर, दुर्ग ढाकोबा कावळेशेत पॉईंट, महादेवगड पॉईंट इत्यादी प्रसिद्ध पर्यटक आकर्षण येथे आहेत.

आंबोलीला भेट देण्याचे आणखीन एक आणि मुख्य कारण म्हणजे येथील मेजवानी. मालवणी झणझणीत कोंबडी वडे, ताजेमासे, कोकम सरबत, सोलकढी असे पदार्थ, शाकाहारींसाठी सुद्धा फणसाची भाजी, घावणे, आंबोळ्या असे पर्याय आहेत. जून ते ऑगस्ट हा काळ आंबोलीच्या सहलीसाठी उत्तम मानला जातो. येथे वस्तीसाठी विसलिंग वूड्स, एमटीडीसी ग्रीन व्हॅली ही प्रसिद्ध व खिशाला परवडणारी निवासस्थाने आहेत.



## लोणावळा

मुंबई पुण्यातील चाकरमान्यांसाठी हक्काचा विकेंड स्पॉट म्हणजे लोणावळा. जर आपण ट्रेकर असाल, तर लोणावळा जवळच विसापूर व लोहगड हे दोन सुंदर किल्ले व राजमाची ट्रेक आहे, मुख्य म्हणजे या गडांची चढाई सोपी ते मध्यम श्रेणीतील असल्याने आपण कुटुंबासहसुद्धा आरामात हा ट्रेक करू शकता.

लोणावळ्यात पारंपरिक शेती संकल्पनेवर आधारित अनेक हॉटेल्स उपलब्ध आहेत. पावना लेक कॅम्पिंगला तरुणांनी अक्षरशः डोक्यावर घेतले आहे. जर का आपण साहसी खेळ खेळण्यासाठी उत्सुक असाल तर डेला ॲडव्हेंचरला आवर्जून भेट द्या. साधारण २५०० ते ५००० रुपयात आपण बंजी जम्पिंग, पॅराग्लायडिंगसारखे थरार अनुभवू शकता.

लोणावळा सहल ही टायगर पॉईंट, कार्ले भाजे लेणी, भुशी धरण याशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. टायगर पॉइंटला मिळणारी मक्याची भजी व मिसळ खायला विसरू नका.

लोणावळा केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर जगभरात 'चिक्कीचे माहेरघर' म्हणून ख्यात आहे, दररोज येथून तब्बल ५००० टन चिक्की निर्यात होते, त्यामुळे घरी परतताना चिक्की व जेली चॉकलेट न्यायला विसरू नका.

## खंडाळा

'ज्वेल ऑफ सह्याद्री' म्हणजेच खंडाळा, सुट्टीसाठी अनेकांची पहिली पसंती ठरतो. प्राचीन लेणी, धबधबे येथील निसर्ग सौंदर्यात भर टाकतात. अलीकडे अनेक निसर्गप्रेमींकडून खंडाळा परिसरात मोठ्या प्रमाणात कॅम्पिंगचे आयोजन केले जाते.

खंडाळ्यात ड्युक्स नोज म्हणजेच नागफणी हे ठिकाण निसर्गाचे एक आश्चर्यच आहे. ड्यूक ऑफ वेलिंग्टनचे नाक नागाच्या फण्यासारखे म्हणून त्यांच्या कार्यकाळानंतर या पॉइंटला नागफणी म्हणून ही ओळखले जाऊ लागले. २५०६ फूट उंच हा कडा २५ फुटावर ९० अंश कोनात दिसतो. नवख्यांनी

किंवा प्रशिक्षित मार्गदर्शकाशिवाय कड्यावर चढण्याचा प्रयोग हाती घेऊ नये.

खंडाळ्यात वाघदरी पॉइंटवरून काळजीपूर्वक दरीत पाहिले तर तिथे वाघ दरीत उडी मारतो आहे असा भास होतो.

१८९६ मध्ये बांधलेले खंडाळ्यातील पुरातन कारागृह पर्यटकांना आकर्षित करते, सेंट झेव्हियर्स कॉलेजच्या संस्थापकांना युद्धकैदी म्हणून ब्रिटिशांनी या तुरुंगात डांबले होते.

'आती क्या खंडाळा' या गाण्यातून खंडाळा जगभरात पोहोचले. गंमत म्हणजे या गाण्याचे गीतकार नितीन राईकवर हे वडगाव शेरी, पुण्याचे रहिवाशी असनू खंडाळ्याच्या निसर्गाच्या प्रेमात असल्याचे सांगतात.

## जव्हार

पालघर जिल्ह्यात घनदाट जंगलामध्ये वसलेले हे पर्यटनस्थळ सुखद अनुभव देणारे आहे. वारली, कोलचा, कुकणा अशा आदिवासी समुदायांचे हे घर आहे. येथील दैनंदिन जीवनाचे चित्रण करणारी वारली चित्रे अतिशय प्रसिद्ध आहेत. जव्हार मध्ये चित्रप्रदर्शन, कलाकेंद्रे, तारपा नृत्याचे कार्यक्रम अधूनमधून सुरू असतात.

सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध, १३०६ साली स्थापन झालेले जव्हार प्रथम मुनके साम्राज्याचे केंद्र होते, त्याची साक्ष देणारा जय-विलास महाल आजही येथे पाहायला मिळतो. छत्रपती शिवाजी महाराज व सैन्यासाठी सुरतच्या वाटेवर असताना विश्रांतिस्थळ म्हणून याची निवड केली. जव्हारमध्ये व सभोवताली अलंग-कुलंग, काळदुर्ग, कोहेज, गुमतारा, टकमक, तांदुळवाडी, जलदुर्ग यांच्यासह तब्बल २९ गडकिल्ल्यांची ऐतिहासिक तटबंदी लाभली आहे.

जव्हारच्या दक्षिणेस ८ कि.मी. अंतरावर काळमांडवी धबधबा आहे. ट्रेकिंग, रॉक क्लाइंबिंग आणि रॅपलिंग या साहसी खेळांसाठी हा खडकाळ आणि उंच धबधबा पर्यटकांना आकर्षित करतो. काळमांडवी धबधबा सुमारे १०० फूट उंचीचा असून वर्षभर वाहतो. याशिवाय हरिहरगड ग्रामदेवतेचे प्राचीन मंदिर, जयसागर व खडखड धरण, हनुमान पॉईंट ही येथील खास आकर्षणे आहेत.



## तोरणमाळ

सातपुडा पर्वतरांगांमध्ये समद्रुसपाटीपासून ३७७० फूट उंचीवर वसलेल्या तोरणमाळ गिरिस्थानावर निसर्गाचा वरदहस्त आहे. नाशिकपासून सुमारे ३०५ कि.मी.वर असणारे तोरणमाळ हिरवळीने वेढलेले आहे, येथील तलाव पावसाळ्यात काठोकाठ भरतात. त्यामुळे पावसाळ्याच्या वीकेंड सहलीसाठी हे अगदी बेस्ट ठिकाण आहे. ऑक्टोबर ते मे हा काळ येथे भेट देण्यास उत्तम मानला जातो. या भागात आढळणाऱ्या तोरणा वनस्पती वरून या टेकडीचे नाव 'तोरणमाळ' असे पडले. इथेच टेकडीवर आदिवासींची देवी 'तोरणा' देवीचे मंदिर असून त्यावरूनच तोरणमाळ असे नाव पडल्याचेही मानले जाते. येथील वनस्पती व प्राण्यांच्या प्रजाती पाहण्यासाठी, पवित्र मंदिरांमध्ये दर्शनासाठी व ट्रेकिंगसाठी पर्यटकांची गर्दी असते.

सीता खाई नजीकच्या धबधब्यालगत उमललेली कमळे पाहणे खूप सुखद अनुभव असतो. यशवंत तलाव, मच्छिंद्रनाथ गुंफा, गोरक्षनाथ मंदिर, लोटस तलाव, कॉफी गार्डन, आवसबरी पॉईंट, सनसेट पॉईंट, चेक डॅम हे येथील मुख्य पॉईंट्स आहेत. तोरणमाळावर गिर्यारोहण, कॅम्पिंग आणि कायाकिंगचे पर्याय उपलब्ध आहेत. ऊस उत्पादनासाठी तोरणमाळ प्रसिद्ध आहे. या

## माथेरान



मुंबईपासून १०० कि.मी. दूर व समुद्रसपाटीपासून २,६०० फूट उंचीवर स्थित माथेरानमध्ये वर्षभर थंड व सुखद हवामान असते. माथेरानचा शब्दशः अर्थ 'माथ्यावरचे वन' म्हणजेच पर्वतांवर स्थित जंगल असा होतो. उन्हाळ्यात तीव्र झळांपासनू मुक्ती मिळावी म्हणून ब्रिटिशकाळात हे ठिकाण रिसॉर्ट म्हणून विकसित केले होते. हे संपूर्ण आशिया खंडातील एकमेव वाहन-मुक्त थंड हवेचे ठिकाण आहे. शून्य प्रदूषणातील शांतता येथे अनुभवायला मिळते.

माथेरानमध्ये वाहने नसल्याने येथे अनेक नैसर्गिक पाऊलवाटा आहेत. संपूर्ण माथेरानमध्ये घनदाट जंगल असून मुख्यतः आंबा, धावडा, जांभूळ, बेहडा, खैर, सागवान ही झाडे येथे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात, येथे विविध प्रकारची फुलपाखरे पाहणे हा एक सुंदर अनुभव ठरतो.

माथेरानमधील बाजारपेठेत खरेदीसाठी हस्तकलेच्या वस्तू व कपड्यांना मागणी आहे. तसेच सांबराच्या कातड्यापासून बनवलेले बूट व किंवा चपला विशेष प्रसिद्ध आहेत. माथेरान प्रवेशद्वाराच्या बाजूला असणारे एमटीडीसीचे निवास संकूल हे सर्व पर्यटकांचे आकर्षण ठरते व येथून पुढे जाण्यासाठी घोडेस्वारी, टॉय ट्रेन किंवा पायी जाण्याचा पर्याय आहे.

## चिखलदरा



सर्वाधिक उष्णता अशी ओळख असणाऱ्या विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणजे समुद्रसपाटीपासून १११८ मीटरवर वसलेले चिखलदरा. अमरावती जिल्ह्यातील चिखलदऱ्याचा उल्लेख महाभारत ह्या महाकाव्यात आढळतो.

पौराणिक कथांनुसार भीमाने कीचकाला ठार मारले आणि खोऱ्यात खाली फेकले, यामुळे या शहराला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. तुम्ही चिखलदरा येथे पाऊल टाकताच हवेतील कॉफीचा गंध तुम्हाला भारावून टाकेल. या प्रदेशातील हे एकमेव कॉफी उत्पादक क्षेत्र आहे. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर स्थित चिखलदरा विविध प्राणी आणि वनस्पतींनी समृद्ध आहे. चिखलदरा येथून हाकेच्या अंतरावर असणारा मेळघाट व्याघ्र प्रकल्प येथे येणाऱ्या पर्यटकांना साहसी अविस्मरणीय अनुभव देऊन जातो. असे म्हणतात की, नशीबवानांना चिखलदरा घाटात रस्त्यावरसुद्धा वाघ दिसून येतात. चिखलदरा येथील मुख्य आकर्षण म्हणजे देवी पॉईंट कारण येथूनच अन्य पर्यटन स्थळांना सुरुवात होते. भुयारातील देवी पॉईंटपासून चंद्रभागा नदीचा उगम होतो. देवीच्या मंदिरातील दगडी कुंडातून पडणाऱ्या पाण्याने येथे सुंदर धबधबा तयार झाला आहे. येथूनच जवळ पंचबोल किंवा इको पॉईंट आहे जिथे मोठ्याने हाक मारल्यास पाचवेळा आवाज घुमतो, हा अनुभव घेण्यासाठी अनेक पर्यटक आवर्जून भेट देतात.

सहलीत खास खानदेशी मसाल्यांनी बनलेले पदार्थ नक्की चाखून पाहा.

## महाबळेश्वर

पश्चिम घाटात वसलेले, निसर्गाचे वरदान लाभलेले महाबळेश्वर, महाराष्ट्रातीलच नव्हे, तर जगभरातील पर्यटकांना आकर्षित करते. पुण्यापासून सुमारे १२० किलोमीटर आणि मुंबईहून २५५ किलोमीटर अंतरावर महाबळेश्वर वसले आहे.


यादव राजा सिंघनदेव याने १३व्या शतकात बांधलेल्या महाबळेश्वराचे महादेवाचे मंदिराला आवर्जून भेट द्या. अफझलखानच्या तंबूवरील कापून आणलेले सोन्याचे कळस छत्रपती शिवाजी महाराजांनी या महाबळेश्वर मंदिरास अर्पण केले होते. महाबळेश्वराच्या मंदिरातून कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गोवित्री या पाच नद्या उगम पावतात. येथे पंचगंगेचे देऊळ आहे.

पंचगंगा मंदिराजवळच कृष्णाबाई मंदिर आहे की, जेथे कृष्णा नदीची पूजा केली जाते. १८८८ मध्ये कोकणचे राजे 'रत्नगिरीओण' यांनी हे मंदिर उंच टेकडीवर बांधले जिथून पूर्ण कृष्णा दरी पाहता येते. जर का आपण गडप्रेमी असाल तर महाबळेश्वर सहल थोडी वाढवून जवळच्या प्रतापगडाला आवर्जून भेट द्या. महाबळेश्वर जवळच लिंगमळा धबधबा आहे. यातील पाणी साधारणपणे ६०० फूट उंचीवरून वेण्णा तलावात पडते.

महाबळेश्वरच्या स्ट्रॉबेरी सोबतच, रासबेरी, जांभूळ, मध व लाल मुळा, गाजरे सुद्धा प्रसिद्ध आहेत. महाबळेश्वरचा मध व गुलकंदही उच्च प्रतीचा मानला जातो.

## पाचगणी

पाचगणी या पाच टेकड्यांनी वेढलेल्या महाराष्ट्रातील प्रसिद्ध थंड हवेच्या ठिकाणी वर्षभर आल्हाददायक आणि शांत वातावरण असते. पाचगणी पुण्यापासून १२० कि.मी. अंतरावर आणि मुंबईहून २५० कि.मी.



अंतरावर आहे. पाचगणी महाबळेश्वरच्या अगदी जवळ असल्याने जर का तुम्ही महाबळेश्वरची २ दिवसांची सहल आखत असाल तर एक दिवस पाचगणीला नक्की जाऊ शकता. उत्कृष्ट हवामान आणि संपन्न निसर्ग हे पाचगणीचे वैशिष्ट्य आहे. खोल दऱ्या, धबधबे, कमल गड, टेबल लँड, किड्स पार्क, पाचगणीच्या गुंफा ही काही प्रसिद्ध व पाहण्यासारखी प्रेक्षणीय स्थळे आहेत. येथील टेबल लँडवर अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झालेले आहे.

येथे १९व्या शतकात अनेक बोर्डिंग शाळांची स्थापना करण्यात आली होती. येथील पारशी लोकांनी प्राचीन काळात बांधलेले बंगले आजही लक्ष वेधनू घेतात.

पाचगणी हे थंड हवेचे ठिकाण असूनही या ठिकाणी ज्वालामुखीच्या उद्रेकाने ज्वाला रस बाहेर येऊन हे डोंगर तयार झाले असावे असे मानले जाते.

## पन्हाळा

मराठ्यांच्या इतिहासाचा साक्षी पन्हाळा, महाराष्ट्रातील अत्यंत मनमोहक पर्यटन स्थळांपैकी एक आहे. मुंबईपासून ३८० कि.मी. अंतरावर व पुण्यापासून २३६ कि.मी.वर पन्हाळा आहे. एमटीडीसी महालक्ष्मी आणि अन्य खासगी रिसॉर्ट्सवर निवासाची उत्तम व्यवस्था होऊ शकते. छत्रपती शिवाजी महाराजांनी येथे ५०० हून अधिक दिवस वास्तव्य केले होते. त्यामुळे मराठा साम्राज्यात या पन्हाळगडाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पन्हाळगडावरील तबक उद्यान, वीर बाजीप्रभू यांचा पुतळा, अंबारखाना, धर्मकोठी, नायकिणीचा सज्जा, ताराराणी राजवाडा, सज्जाकोठी, वाघ दरवाजा, तीन दरवाजा, पांडवदरा, सोमेश्वर तलाव, आदी प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. पन्हाळ्याचा माथा हिरवळीने बहरलेला असनू येथील वातावरण आल्हाददायक असते. कोल्हापूरची गादी स्थापन करणाऱ्या महाराणी ताराराणी यांनी आपली राजधानी काही वर्ष येथे ठेवली होती. पन्हाळ्याला उत्तम कोल्हापुरी पदार्थ जसे की, तांबडा/पांढरा रस्सा, सुके मटण इत्यादींचा आस्वाद नक्की घ्या.

**पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**राज्य सरकार सातत्याने अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय म्हणून विविध कल्याणकारी योजना राज्यभर राबवते. या सर्व योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच त्याचे उद्देश साध्य व्हावेत, याकरिता राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम ६ ते १६ एप्रिल २०२२ या कालावधीत राबवण्यात आला. महामानव डॉ. आंबेडकर यांची १३१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

# समता सप्ताह उत्साहात

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या राजकीय-सामाजिक वाटचालीत असलेले योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, तसेच सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या हितासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती जयंतीनिमित्त देण्यात आली. मागील दोन वर्षांत कोविड निर्बंधांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम सार्वजनिकरीत्या साजरा करता आला नव्हता. या वर्षी कोविड नियंत्रणात असल्यामुळे निर्बंध शिथिल झाले असल्यामुळे सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती राज्यभरात विविध उपक्रम राबवून साजरी करण्याची अनोखी संकल्पना राबवली.

## राज्यस्तरीय कार्यक्रम

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्यस्तरीय शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, खासदार सुप्रियाताई सुळे, राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये, सहसचिव दिनेश डिंगळे, जयदेव गायकवाड, प्रसिद्ध गायक आनंद शिंदे, महेबूब शेख उपस्थित होते. या विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी व देखरेख समितीमार्फत मुंबई येथील राज्यस्तरीय कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी या विभागामार्फत राबवल्या जात असलेल्या महत्त्वपूर्ण योजना व मागील दोन वर्षात घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय यांची एक चित्रफीत या कार्यक्रमात प्रदर्शित केली. कार्यक्रमस्थळी बार्टीच्या प्रशिक्षणातून केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून अधिकारी झालेले सचिन पवार, सौरभ व्हटकर, अर्चना वानखेडे तसेच मार्जिन मनी योजनेचे लाभार्थी अश्विनी पार्सेकर, वैशाली खांडेकर, सुचिता गवळी,



सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने 'नवे पर्व' व 'विकास पर्व' या दोन माहिती पुस्तकांचे प्रकाशन करताना माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, खासदार सुप्रियाताई सुळे, राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम आदी मान्यवर.

विद्या हंडोरे, कल्याणी शिरोडकर तसेच परदेशी शिष्यवृत्ती योजनेतील पवनकुमार सूर्यवंशी, अतुल कांबळे, सुमित कांबळे डिक्कीचे प्रतिनिधी संतोष कांबळे यांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला.

डिक्कीमार्फत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती संतोष कांबळे यांनी या वेळी दिली. राज्यातील २१ हजार महाविद्यालयात सुरू करण्यात येत असलेल्या 'सर्वांना समान संधी केंद्रांचे' मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्याचबरोबर परदेशी शिष्यवृत्ती, यूपीएससी प्रशिक्षण, मार्जिन मनी आदी योजनांचा लाभ घेतलेल्या यशस्वी लाभार्थींचा गौरवही करण्यात आला. कार्यक्रम स्थळी बार्टीकडून सुरू करण्यात आलेल्या बेंचमार्क सर्व्हे व स्वयंसहायता युवक गट उपक्रमांचेही उद्घाटन करण्यात आले.

## विविध उपक्रमांनी जयंती साजरी

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून राज्यभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता कार्यक्रम राबवला होता, प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रम राबवण्याची जबाबदारी त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा समाज कल्याण अधिकारी व साहाय्यक आयुक्त यांना सोपवण्यात आली होती. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करावेत तसेच यात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री. मुंडे यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत ११ दिवसांतील सर्व उपक्रमांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, विभागातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्व अनुयायांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.


## असा साजरा झाला समता सप्ताह

६ एप्रिल २०२२ रोजी सामाजिक समता कार्यक्रमांचे सर्व जिल्ह्यांमधून उद्घाटन करण्यात आले. ७ एप्रिल २०२२ रोजी विभागाची सर्व महाविद्यालये, आश्रमशाळा, वसतिगृहे, निवासी शाळा आदी ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा पार पडल्या. ८ एप्रिल रोजी, जिल्हा व विभाग स्तरावर स्वाधार शिष्यवृत्ती, मिनिट्रॅक्टर आदी लाभार्थींना प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. ९ एप्रिल रोजी ज्येष्ठ नागरिक योजनांच्या जनजागृती संदर्भात मेळावे, तसेच जिल्हा आरोग्य विभागाच्या समन्वयाने विभागाच्या शैक्षणिक अस्थापनांमध्ये रक्तदान शिबीर पार पडले. १० एप्रिल २०२२ रोजी समता दुतांमार्फत ग्रामीण व शहरी भागात लघुनाट्य, पथनाट्यांच्या माध्यमातून विभागाच्या योजनांच्या माहितीबाबत प्रबोधन करण्यात आले.

११ एप्रिल रोजी महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करून विविध वक्त्यांना निमंत्रित करण्यात आले. १२ एप्रिल रोजी मार्जिन मनी योजनेच्या जनजागृती बाबत तसेच लाभ मिळालेल्या लाभार्थींसाठी विशेष कार्यशाळा पार पडल्या. १३ एप्रिल रोजी संविधान जागर हा विशेष कार्यक्रमदेखील उत्साहात पार पडला. १४ एप्रिल रोजी सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये, शाळा, वसतिगृहांमधील आस्थापनांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम पार पडला. या ठिकाणी, व्याख्याने, चर्चासत्रांचे कार्यक्रम पार पडले. त्याचबरोबर कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून डॉ. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची माहिती देणाऱ्या व्याख्यानांनाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याच दिवशी सर्व जिल्ह्यातील जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आले.

१५ एप्रिल २०२२ रोजी, प्रत्येक साहाय्यक आयुक्त कार्यालयात महिला मेळावे आयोजित करून 'महिलांविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य' याबाबत माहिती देणारे कार्यक्रमदेखील घेण्यात आले. तृतीयपंथीविषयक शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती व्हावी, यासाठी याबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचेही तसेच नोंदणी करून ओळखपत्र देण्याचा उपक्रम या





वेळी राबवण्यात आला. १६ एप्रिल या अंतिम दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमाची सर्वत्र स्वच्छता मोहीम राबवून सांगता करण्यात आली. राज्यातील शहरातील महापुरुषांची स्मारके, बाजारतळ, जलाशय परिसर, प्रमुख रस्ते, चौक, शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे आदी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या कार्यक्रमात विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह स्थानिक नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

**संकलन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**आपल्या ग्राहकांच्या विविध स्वरूपाच्या सर्व बँकिंग गरजा पुरवणारी संपूर्णपणे सरकारची एक सक्षम बँक म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बँक नावारूपाला आली आहे. राज्याच्या ग्रामीण विकासात या बँकेचा मोलाचा सहभाग राहिला आहे.**

# सर्वसामान्यांची बँक

**संजय वाघ**

तब्बल ५९ लाख ग्राहकांचा विश्वास संपादन केलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेने 'साथ विश्वासाची, वाट विकासाची' या घोषवाक्याला साजेशी कामगिरी करून दाखवली आहे. या घोषवाक्याचा उद्देश सत्यात उतरवला आहे. सतत नफ्यात असलेली ग्रामीण बँक अशीही ओळख या बँकेने निर्माण केली आहे.

महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांत ७ विभागीय कार्यालयांसह ४१५ शाखा असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मुख्य कार्यालय औरंगाबाद येथे आहे. औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यात बँकेचा शाखा विस्तार आहे. बँकेमार्फत ४१ आधार सेवा केंद्रदेखील कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. बँकेचा डिसेंबर २०२१ अखेर एकूण व्यवसाय २२१६६.८२ कोटी रुपये असून त्यामध्ये एकूण ठेवी १३९१८.२५ कोटी रुपये असून एकूण कर्ज ८२४८.५७ कोटी रुपये आहे.



## कर्ज वाटपात अग्रेसर

महाराष्ट्र ग्रामीण बँकेने खरीप हंगाम २०२१ मध्ये आपले पीक कर्ज वाटपाचे १७८६.१९ कोटी रुपयांचे उद्दिष्ट १०१.४७ टक्के पूर्ण करत १८१२.४५ कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप केले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रतिवर्षी विविध शासकीय योजना, मुद्रा योजना, स्टँडअप इंडिया योजना, प्रधानमंत्री आवास योजना या सर्व




योजनाची उद्दिष्टे पूर्ण करत आली आहे. तसेच बँक नाबार्ड व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनानुसार वित्तीय सामावेशन व साक्षरता अभियान राबवत आहे. त्याअंतर्गत बँकेने एकूण १२५९ बँक मित्र व बँक सखीची नेमणूक करत अनबँक एरियात बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक ही महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत बचतगटांना कर्ज पुरवठा करण्यात आघाडीवर आहे. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज वाटपातदेखील अग्रेसर आहे.

## विविध योजनांचा लाभ

ग्रामीण बँकेच्या शाखा ग्रामीण भागात असल्यामुळे शेतकरी, ग्रामीण उद्योजक, ग्रामीण कारागीर यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ बँकेमार्फत दिला जातो. महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळाच्या कर्ज योजनांची अंमलबजावणी बँकेमार्फत

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेविषयी...




महाराष्ट्र ग्रामीण बँकेची स्थापन २० जुलै २००९ रोजी मराठवाडा ग्रामीण, औरंगाबाद जालना ग्रामीण व ठाणे ग्रामीण बँकेच्या विलीनीकरणातून झाली आहे. भारत सरकार, महाराष्ट्र राज्य सरकार व पुरस्कृत बँक : बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त मालकीची ही बँक पूर्णपणे सरकारी मालकीची असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या शेड्युल दोनमध्ये या बँकेचा समावेश आहे. बँकेचे भागभांडवल हे ५०:१५:३५ या प्रमाणात भारत सरकार, महाराष्ट्र राज्य सरकार व पुरस्कृत बँक : बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यात विभागलेले आहे. या बँकेच्या संचालक मंडळात महाराष्ट्र शासनाचे अतिरिक्त आयुक्त दर्जाचे दोन अधिकारी असून त्या शिवाय रिझर्व्ह बँक, नाबार्ड व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे अधिकारीदेखील नियुक्त केले जातात. या बँकेचे अध्यक्ष हे बँक ऑफ महाराष्ट्रचे उप महाप्रबंधक दर्जाचे अधिकारी असतात. सध्या मिलिंद घारड हे बँकेचे अध्यक्ष आहेत.

केली जाते. तसेच निराधार, दिव्यांग इत्यादी व्यक्तींना जे शासनामार्फत अनुदान दिले जाते ते देखील बँकेच्या शाखामार्फत वितरित केले जाते.

## तांत्रिकदृष्ट्या सक्षम

महाराष्ट्र ग्रामीण बँक ही पूर्णपणे संगणीकृत असून बँकेच्या सर्वच्या सर्व शाखा या सी.बी.एस. प्रणालीने जोडलेल्या आहेत. बँकेने एटीएम कार्ड, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिग, क्यूआर कोड तसेच आरटीजीएस व एनईएफटी या अत्याधुनिक सुविधा आपल्या ग्राहकांच्या सोयीसाठी सर्व शाखांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ग्रामीण बँक ही इतर राष्ट्रीयकृत व खासगी बँकेच्या बरोबरीने ग्राहक सेवा देण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे.

## विविध कर्जांचे वाटप

महाराष्ट्र ग्रामीण बँकेला महाराष्ट्र शासनाने शासकीय व्यवहार करण्याची परवानगी दिलेली आहे. तसेच शासकीय/निमशासकीय कर्मचारी अधिकारी यांचे पगार व निवृत्तिवेतन खाते उघडण्याबाबतही बँकेला अधिकृत केलेले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत पगारदारांच्या पगार बचतखात्यावर २० लाख रुपयांच्या अपघात विम्याची मोफत सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. बँकेमार्फत शेती व शेतीपूरक कर्जासोबतच गृह कर्ज, वाहन कर्ज, सोने तारण कर्ज, व्यक्तिगत कर्ज, प्रॉपर्टी तारण कर्ज इत्यादी कर्ज सुविधा अत्यल्प व्याजदरात आणी चांगल्या ग्राहक सेवेसह व त्वरित निर्णयासह उपलब्ध आहेत. तसेच बँकेमार्फत शैक्षणिक कर्ज, डॉक्टर्स विशेष कर्ज, व्यवसाय व उद्योजक कर्ज सुविधादेखील अत्यल्प व्याजदरात व सहज उपलब्ध करून दिल्या आहेत. बँकेमार्फत वेअर हाऊस रिसीटवरदेखील कर्ज हे शेतकरी व इतर ग्राहकांना उपलब्ध करून दिलेले आहे.

## सर्वसामान्यांसाठी कॉल सेंटर

अलीकडेच केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या उपस्थितीत नाबार्ड पुणे यांच्यामार्फत वित्तीय साक्षरता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नाबार्डमार्फत वित्तसाहाय्य दिलेल्या पाच मोबाईल एटीएम व्हॅनचे लोकार्पण करण्यात आले. यामुळे ग्रामीण भागात एटीएम कार्डचा वापर व उपयोग, आर्थिक साक्षरता याबाबत जनजागृती केली जाणार आहे. बँकेचे कॉल सेंटर 'हॅलो एमजीबी' या नावाने औरंगाबाद येथे सुरू असून या कॉल सेंटरचे संपूर्ण व्यवस्थापन बँकेचे दिव्यांग कर्मचारी करत आहेत. हा एक विशेष उपक्रम आहे. या कॉल सेंटरमधून ग्राहकांना त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे मिळत आहेत. बँकेमार्फत सामाजिक सुरक्षा म्हणून प्रधानमंत्री जीवनज्योती व सुरक्षा विमा योजना तसेच अटल पेन्शन योजना राबवण्यात येतात. यामुळे अत्यल्प विमा हप्त्यात ग्राहकाला दोन लाख रुपये अपघात विमा व जीवनविम्याचे कवच उपलब्ध झालेले आहे.

(लेखक हे महाराष्ट्र ग्रामीण बँक, औरंगाबाद येथे मुख्य सरव्यवस्थापक आहेत.)

**सध्याच्या काळात कार्बन डायऑक्साइड हा वायू प्रदूषणासाठी जबाबदार महत्त्वाचा घटक मानला जातो. यामुळेच कार्बन सिंक ही संकल्पना उदयास आली. कार्बन सिंक म्हणजे कार्बन शोषून घेणारे नैसर्गिक घटक; यात कांदळवनांचा मोठा हातभार आहे. कांदळवने कार्बन डायऑक्साइड शोषून प्राणवायू देतात. कांदळवनांचे अनेक फायदे आहेत.**

# कांदळवन संरक्षण व संवर्धन

**विरेंद्र तिवारी**

कांदळवन जंगले साधारणपणे समुद्रकिनारी, खाड्या, नदीमुख आणि खाऱ्या दलदलीमध्ये बहरतात. खाऱ्या मचूळ पाण्यात क्षारांसोबत वादळ-वारा आणि ऊन-पाऊस या सगळ्यांच्या प्रकोपाला सामोरे जाऊन देखील कांदळवने रुबाबात वाढतात. समुद्रातून येणाऱ्या लाटांना रोखतात आणि सागरी किनारपट्टीचे संरक्षण करतात.

कांदळवने खाडी परिसरात चांगली वाढतात. कारण खाडी परिसरात नदीचे पाणी मिसळल्यामुळे पाण्याची क्षारता कमी असते आणि त्यामुळे खाडी ही माशांच्या प्रजननासाठी उत्तम जागा असते. समुद्रातील अन्न-साखळी सुरळीत चालू राहण्यासाठीदेखील फार मोठी भूमिका ही कांदळवने पार पाडतात. कांदळवनांची पाने जेव्हा खाली पाणथळ जमिनीवर पडतात, तेव्हा तिथे असलेले खेकडे त्या पानांचा भुगा करतात आणि मग इतर काही जीव तेथे आकर्षित होतात. खाण्यासाठी मुबलक प्रमाणात अन्न असल्यामुळे समुद्रातील अनेक मोठे मासे भरतीच्या पाण्याबरोबर खाडी परिसरात येतात, तेथे अंडीही घालतात. माशांची पिल्ले मोठी झाली की, ती पुन्हा समुद्रात झेप घेतात. जमिनीवर तसेच सागरी परिक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या जिवांना आसरा देतात.

## कांदळवनाचे फायदे

कांदळवनांचे अनेक फायदे आहेत, हे जागतिक पातळीवर मान्य झालेले आहे. सध्याच्या काळात कार्बन हा वायू प्रदूषणातील महत्त्वाचा घटक मानला जातो. यामुळेच कार्बन सिंक ही संकल्पना उदयास आली. कार्बन सिंक म्हणजे कार्बन शोषून घेणारे नैसर्गिक घटक; यात कांदळवनांचा मोठा हातभार आहे. कांदळवने कार्बन डायऑक्साइड शोषून प्राणवायू देतात. जागतिक वन परिसंस्थेत कार्बन शोषून घेण्यासाठी कांदळवनांचा वाटा केवळ एक टक्का असला, तरी सागरी परिसंस्थेत त्यांचा वाटा १४ टक्के इतका मोठा आहे. वैज्ञानिक अभ्यासातून असे समजले आहे की, कार्बन शोषून घेण्याची सगळ्यात जास्त क्षमता कांदळवनात आहे.

भारतात एकूण दहा राज्यांमध्ये कांदळवनांची जंगले आढळतात. सगळ्यात मोठे आणि जास्तीत जास्त कांदळवन प्रजाती जागतिक वारसा मिळालेल्या सुंदरबनच्या जंगलात दिसून येतात. भारतात पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर साधारण ४० प्रजाती आढळतात आणि महाराष्ट्रात यामधल्या २० प्रजाती आढळतात.

## राखीव वने व त्यांचे संरक्षण

महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. आज राज्यात १६,९८४ हेक्टर जमिनीवरील कांदळवने 'राखीव वने' म्हणून घोषित केलेली आहेत आणि एकूण ३२,४०० हेक्टर एवढी जागा कांदळवनाने व्यापलेली आहे. या कांदळवनांच्या रक्षणाकरिता राज्य सरकारने वन विभागांतर्गत २०१२ मध्ये कांदळवन कक्ष या स्वतंत्र कक्षाची निर्मिती केली. कांदळवन रक्षणासाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले



राज्य आहे. त्यानंतर २०१५ मध्ये कांदळवन कक्षाच्या अंतर्गत कांदळवन प्रतिष्ठानची स्थापना केली.

## ‘संवर्धन व उपजीविका निर्माण’ योजना

कांदळवन संवर्धनासाठी लोकसहभाग मिळावा या संकल्पनेतून, महाराष्ट्र शासनाने २० सप्टेंबर २०१७ पासून महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ‘कांदळवन संवर्धन व उपजीविका निर्माण’ ही योजना सुरू केली. कांदळवन प्रतिष्ठानातर्फे ही योजना गावांमध्ये तयार केलेल्या ‘कांदळवन सह-व्यवस्थापन समिती’मार्फत राबवली जात आहे. या अंतर्गत खेकडेपालन, जिताडा पालन, शोभिवंत मासे पालन असे शाश्वत उपजीविका उपक्रम चालवण्यात येतात. ही योजना यशस्वीपणे किनाऱ्यालगत असलेल्या १२२ हून अधिक गावांमध्ये कांदळवन कक्ष आणि कांदळवन प्रतिष्ठान राबवत आहे. अशा अनेक प्रकल्पामधून लाभार्थींना जवळपास २०२०-२१ मध्ये ३५.८३ लाख रुपये व २०२१-२२ मध्ये ५७ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न लाभार्थींना मिळाले. याबरोबरच ९ गावांमध्ये कांदळवन निसर्ग पर्यटन अर्थात कांदळ प्रजातींची ओळख, पक्षी प्रजातींची ओळख, पक्षी निरीक्षणाचे तंत्र, किनारी आणि सागरी जैवविविधतेची ओळख, निसर्ग पर्यटनाची संकल्पना व त्यामधील तत्त्वे, स्थानिक पदार्थांना अधिक बाजारयोग्य बनवण्याचे प्रशिक्षण, तारका निरीक्षण आणि जीवरक्षण प्रशिक्षण आदी उपक्रम गावकऱ्यांमार्फत राबवले जातात. ज्यामुळे स्थानिक जैविविधता जोपासण्याचा वारसा गावकऱ्यांकडून पर्यटकांना मिळू लागला आहे.

## अतिक्रमण व डेब्रिज डम्पिंगची समस्या

मुंबई, नवी मुंबई व ठाणे या महानगरांमध्ये जिथे कांदळवन क्षेत्रावर अतिक्रमण व डेब्रिज डम्पिंगची मोठी समस्या आहे, यावर वेळीच आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याकामी लागणारे ३५ कोटी रुपयांचे अनुदान कांदळवन प्रतिष्ठानमार्फत खर्च करण्यात येईल. तसेच अशा डम्पिंग होणाऱ्या ठिकाणी तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश शासनातर्फे देण्यात आले आहेत. या कार्यवाही अंतर्गत गेल्या दोन वर्षात ३० वाहनांवर दंडात्मक व वाहन जप्तीची कार्यवाही केली गेली व त्यात सहभागी असणाऱ्या ४१ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

## पांढरी चिप्पी : राज्य कांदळवन वृक्ष

कांदळवन संवर्धन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासनातर्फे राज्य कांदळवन वृक्ष घोषित करण्याचे ठरवले व २२ सप्टेंबर २०२० रोजी ‘पांढरी चिप्पी’ या कांदळवन वृक्षाला राज्य कांदळवन वृक्ष म्हणून घोषित केले, असे करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

## कांदळवन रोपण व लागवड

राज्याच्या किनारपट्टीवर असलेली कांदळवन अधिक सक्षम करण्यासाठी वन विभागांतर्गत कांदळवन लागवडीचे कार्य गेल्या ६ वर्षांपासून सुरू आहे. किनाऱ्याच्या जवळ असलेल्या ठाणे, मुंबई, पालघर, डहाणू, रत्नागिरी, रायगड या ठिकाणी असलेल्या कांदळवनांच्या जागांची पाहणी करून अवनत कांदळवन क्षेत्रांची निवड केली. २०१२ ते आतापर्यंत १९११ हेक्टर अवनत क्षेत्रावर जवळपास ८५ लाखांहून अधिक कांदळवन रोपे लावण्यात आली. या सर्व कामांचा सकारात्मक परिणाम आपल्याला वेळोवेळी प्रकाशित झालेल्या भारतीय वन सर्वेक्षण अहवालात दिसून आला. २०१३ मध्ये जे क्षेत्र १८६ चौ. कि.मी. होते ते २०२१ मध्ये ३२४ चौ. कि.मी. इतके झाले आहे. गेल्या ६ वर्षांत तर तब्बल ७४ टक्के वाढ कांदळवन क्षेत्रात दिसून आली आहे.

## कांदळवन संशोधन

सध्या कांदळवन व त्यासोबत निगडित जैविविधता जसे स्थलांतरित पक्षी, पाणमांजरे, समुद्री साप, मगर, सागरी कासवे, प्रवाळ अशा अनेक जिवांवर संशोधनाचे काम कांदळवन प्रतिष्ठान अंतर्गत सुरू आहे. तसेच त्यांच्या संवर्धनासाठी अनेक कार्यक्रम राबवले जातात.

काही वेळा संरक्षित प्रजाती मच्छिमारांच्या जाळ्यात अडकतात. प्रसंगी जाळे कापून या संरक्षित जिवांना पुन्हा समुद्रात सुरक्षितरीत्या सोडल्यास मच्छीमारांना कापलेल्या जाळ्याची भरपाई म्हणून या योजनेंतर्गत कमाल २५ हजार रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते. गेल्या दोन वर्षांत १९३ सागरी प्राण्यांची सुटका करण्यासाठी मच्छीमारांना नुकसान भरपाई म्हणून ३०,३१,३०० लाखांचे अनुदान देण्यात आले.

त्यातील अजून एक भाग म्हणजे समुद्री कासव संवर्धन. २०२०-२१ मध्ये २३,००० समुद्री कासवांची पिल्ले समुद्रात सुरक्षितपणे सोडण्यात आली. तसेच किनाऱ्यावर वाहून आलेल्या ३२ जखमी कासवांवर पशुवैद्यकीय उपचार करण्यात आले. जखमी कासवांच्या उपचारासाठी महाराष्ट्रातील रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात कासव संक्रमण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे, त्यासाठी निविदा काढण्यात आल्या असून काम सुरू झाले आहे. तीन जिल्ह्यांमध्ये कासव उबवणी केंद्राच्या देखभालीसाठी समुद्रकिनारी ५६ व्यवस्थापकांची (बीच मॅनेजर्स) नियुक्ती करण्यात आली असून त्यांना २७ लाख रुपये इतके मानधन देण्यात आले आहे.

## सागरी अभयारण्ये

मालवण सागरी अभयारण्य १३ एप्रिल १९८७ रोजी एकूण २९.१२२ चौरस किलोमीटर (३. १८२ चौरस किमी कोअ आणि २५.९४ चौरस किमीचे बफर क्षेत्र) अधिसूचित करण्यात आले. मुख्य क्षेत्राच्या



हद्दीत छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ला (भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने स्मारक म्हणून ओळखला जाणारा), पद्मगड बेट, पाण्याखालील

### ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य

६ ऑगस्ट २०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रजातींना त्याच्या पर्यावरणीय, प्राणी, फुलांचा, भूरूपशास्त्रीय, नैसर्गिक किंवा प्राणीशास्त्रीय महत्त्वामुळे ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. अभयारण्याचे एकूण क्षेत्र १६९०.५२५५ हेक्टर आहे. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य व्यवस्थापन आराखड्यास मंजुरी मिळालेली आहे (२०२०-२१ ते २०२९-३०). ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य इको-सेन्सिटिव्ह झोनची अधिसूचना १४ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य रामसर साइट म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव एमओईसीसीला सादर करण्यात आला आहे. ऐरोली येथे किनारी व सागरी जैवविविधता केंद्र २०१७ मध्ये उभारण्यात आले जिथून लोकांना खूप चांगली माहिती कांदळवनांबद्दलची मिळते व नोव्हेंबर पासून आपल्याकडे येणारे प्रवासी पक्षी आहेत त्यांची भेट घेता येते. ९९८७६७३७३७ या नंबरवरून तुम्ही बोटसाठी बुकिंग करता येऊ शकते.



खडकाळ भाग आणि वालुकामय समुद्रकिनारे यांचा समावेश केला आहे. संपूर्ण सिंधुदुर्ग किनारी आणि सागरी परिसंस्थेसह नोंदवलेल्या १८ प्रवाळ प्रजातींसह ३६७ सागरी प्रजातींपैकी ३३१ प्रवाळ खडक, आंतरभरती क्षेत्र आणि खारफुटीसह वैविध्यपूर्ण अधिवास आहेत. तसेच प्रथम अधिसूचित झाल्यानंतर ३३ वर्षांनी, महाराष्ट्र वन विभागाच्या अंतर्गत राज्य कांदळवन कक्षाने वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडून यांना सागरी मालवण अभयारण्याच्या गंभीर सागरी अधिवासांचे अवकाशीय मॅपिंग करण्यासाठी नियुक्त केले आहे व त्यानुसार त्याच्या हद्दीची पुनर्रचना करण्यात येईल. मागील वर्षी मालवण सागरी अभयारण्यचा १० वर्षाचा (२०२०-२१ ते २०२९-३०) व्यवस्थापन आराखड्यास मंजुरी मिळाली.

### कांदळवन जनजागृती उपक्रम

कांदळवनांची ओळख, कांदळवनांचे औषधी गुणधर्म, कांदळवनांचे परिस्थितिकीय महत्त्व, कांदळवन निसर्ग पर्यटन (बोटिंग, कयाकिंग, पक्षी निरीक्षण इत्यादी.) यांची माहिती दिली जाते, जेणेकरून ते स्वतः ही माहिती इतरांना देऊ शकतील. त्यातीलच एक उदाहरण म्हणजे, जागतिक खारफुटी दिनानिमित्त एक विशिष्ट ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. हे ॲप्लिकेशन वापरून तसेच कांदळवन प्रतिष्ठानच्या संकेतस्थळाला भेट देऊन लोक डिजिटलरीत्या खारफुटीचे झाड लावू शकतात, यासाठी त्यांना प्रमाणपत्रसुद्धा वितरित करण्यात आले. तसेच प्रश्नमंजुषा, शब्दकोडे, पोस्टर, पक्षी छायाचित्रण स्पर्धा आणि प्रदर्शने, पक्षी सप्ताह आणि इतर काही उपक्रम वर्षभर राबवले गेले.

### 'मॅन्ग्रोव्ह फाऊंडेशन ॲवॉर्ड्स'

'मॅन्ग्रोव्ह फाऊंडेशन ॲवॉर्ड्स' सुरू करण्याचे कारण म्हणजे जी व्यक्ती अथवा संस्था कांदळवन संवर्धनाचे काम करतात त्यांना प्रोत्साहन देणे. या योगदानाची दखल घेऊन २६ जुलै २०२१ पासून अंतरराष्ट्रीय कांदळवन दिनाचे औचित्य साधून कांदळवन पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत उत्तम काम करणारे 'वन अधिकारी व कर्मचारी, स्वयंसहायता गट, प्रकल्प सहयोगी/सहायक, उपजीविका तज्ज्ञ आणि विशेष उलेखनीय कामगिरी' या ५ गटांमध्ये पुरस्कार देण्यात आले.

जनजागृती आणि आउटरीच कार्यक्रमांसाठी कांदळवन प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकाशन प्रकाशित करण्यात आले, जसे की सोनराशिया वृत्तपत्र, इशानचा खजिना, मासे जाणून घेऊ या, कॉफी टेबल बुक-बायोसेंटिनेल्स ऑफ महाराष्ट्र.

आज जागतिक पातळीवर कांदळवन संवर्धन प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र एक पाऊल पुढेच आहे. युएनडीपी-जीसीएफ प्रकल्पासाठी देखील महाराष्ट्र राज्याची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पात ५ वर्षांत कांदळवन पुनर्जीवन, प्रवाळ संवर्धन, श्री पद्धतीची भात शेती, वॉटरशेड डेव्हलपमेंट असे अनेक उपक्रम आहेत.

कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग यांना कांदळवन संवर्धन व संरक्षण तसेच किनारपट्टी आणि राज्यातील सागरी जैवविविधता संरक्षण मधील महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेण्यात आली आणि नेटवेस्ट ग्रुप अर्थ हिरोज अंतर्गत 'अर्थ गार्डियन ॲवॉर्ड - २०२०' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कांदळवन कितीही महत्त्वाचे असले तरी आज कांदळवनाचे धोके टळलेले नाही, सायक्लोन्स, पूर, समुद्र सपाटी वाढ यापासून आज कांदळवन व तिथले जीव यांना मोठा धोके आहे आणि आपल्यापासून वाढत्या कचऱ्याचा. भरतीच्या पाण्यासोबत घनकचरा हा कांदळवनामध्ये येतो आणि त्यामुळे कांदळवनाची मुळे झाकली जातात, हवेची अदलाबदल होत नाही, यासाठीच सध्या स्वच्छ कांदळवन अभियान राबवत आहोत. विविध शासकीय व अशासकीय व्यक्ती अथवा संघटनांना एकत्रित आणून आपण नियमितपणे कांदळवन स्वछता अभियान राबवून त्यामध्ये असणारा घनकचरा गोळा केला जात आहे व कांदळवनांना घनकचरा मुक्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

(लेखक हे कांदळवन कक्ष, मुंबई येथे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आहेत.)

**महानगरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रोसारखी जलद वाहतूक प्रणाली फायदेशीर ठरणार आहे. मुंबई मेट्रोच्या २-अ या दहिसर ते डहाणूकरवाडी आणि मेट्रो-७ च्या दहिसर ते आरे या दोन मार्गिकांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच लोकार्पण झाले. मेट्रोच्या या मार्गिका म्हणजे राज्य शासनाने मुंबईकरांना दिलेली गुढीपाडव्याची भेट असून मेट्रोच्या या दोन नव्या मार्गिकांचा घेतलेला वेध..**

# जलद व सुखकर प्रवास

**किशोर गांगुर्डे**

मुंबईची लाईफलाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उपनगरी रेल्वे सेवेला समांतर अशी दुसरी 'लाईफलाईन' मेट्रो रेल्वेच्या रूपाने उदयास येत असून मुंबई महानगरात मेट्रोच्या विविध प्रकल्पांचे गतीने काम सुरू आहे. मुंबईमध्ये सुरक्षित, आरामदायक रेल्वे आधारित सार्वजनिक जलद परिवहन सेवा पुरविण्याच्या दृष्टीने तसेच प्राधान्यक्रम असलेल्या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने २००३ मध्ये दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची नेमणूक केली होती, त्यांना टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि आयआयटी मुंबईने सहकार्य केले होते. त्यांनी तयार केलेल्या मेट्रो बृहत आराखड्याची अंमलबजावणी होऊन ८ जून २०१४ रोजी ११.४ किलोमीटरचा वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा मेट्रो मार्ग कार्यान्वित झाला. त्यानंतर मेट्रो मार्ग २-अ, ३ आणि ७ ची कामे मुंबईत युद्धपातळीवर सुरू असून त्यातील मेट्रो मार्ग २-अ आणि मार्ग ७ च्या पहिल्या टप्प्याचे २ एप्रिल रोजी गुढीपाढव्याच्या शुभमुहुर्तावर लोकार्पण करण्यात आले आहे. दरम्यान, मेट्रो मार्गिकांचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री आणि मान्यवरांनी आरे ते कुरार आणि परतीचा मेट्रोमधून प्रवास केला.



'मेट्रो २- अ' आणि 'मेट्रो ७' या मार्गिकांचे लोकर्पण केल्यानंतर मेट्रो प्रवासाचा अनुभव घेताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सोबत उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आदी.

## डहाणूकरवाडी ते आरे मार्ग मेट्रो सुसाट

मेट्रो मार्ग २-अ आणि मार्ग-७ च्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण झाल्यानंतर या मार्गांचा डहाणूकरवाडी ते आरे हा पहिला टप्पा प्रवाशांकरिता सुरू करण्यात आला आहे. या दोन्ही मार्गांवर सध्या ११ ट्रेन्स कार्यरत असून या दोन्ही मार्गिकांवर एकूण ३० स्थानके आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात मेट्रोसेवा आरे ते डहाणूकरवाडी या दरम्यानच्या १८ स्थानकांवर सुरू असून या प्रवासासाठी एकूण ४१ मिनिटांचा वेळ लागतो. मेट्रोचे हे संपूर्ण मार्ग सुरू झाल्यानंतर सुरुवातीला सुमारे ९ लाख प्रवाशांना याचा फायदा होईल, असा मेट्रो व्यवस्थापनाचा अंदाज असून त्यामुळे रस्त्यांवरील व उपनगरीय रेल्वेमधील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे.

## मेट्रो २-अ मार्गिका

मेट्रो २-अ ची लांबी १८.६ कि.मी. असून मेट्रो २-अ ही मेट्रो सेवा दहिसर पूर्व ते अंधेरी पश्चिम दरम्यान असून या मार्गावर दहिसर (पूर्व), आनंद नगर, कांदरपाडा, मंडपेश्वर, एकसर, बोरिवली (पश्चिम), पहाडी एकसर, कांदिवली (पश्चिम), डहाणूकरवाडी, वळनई, मालाड (पश्चिम), लोअर मालाड, पहाडी गोरेगाव, गोरेगाव (पश्चिम), ओशिवरा, लोअर ओशिवरा, अंधेरी (पश्चिम) ही स्थानके आहेत.

## मेट्रो मार्ग- ७

या मार्गाची लांबी १६.५ कि.मी असून ही मेट्रो सेवा दहिसर (पूर्व) ते गुंदवली या १६.५ कि.मी. लांबीच्या मार्गावर धावणार आहे. या मार्गावर १३ स्थानके असून त्यात गुंदवली, मोगरा, जोगेश्वरी (पूर्व), गोरेगाव (पूर्व), आरे, दिंडोशी, कुरार, आकुर्ली, पोईसर, मागाठाणे, देवीपाडा, राष्ट्रीय उद्यान, ओवरीपाडा, दहिसर (पूर्व) या स्थानकांचा समावेश आहे.

## मेट्रो स्थानकांवर प्रवाशांसाठी सुविधा

- मेट्रो स्थानकांवर अंध प्रवाशांसाठी

## मेट्रोचे खरे श्रेय मुंबईकरांना

मुंबईचा विकास सातत्याने होत असून वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत सुविधा वाढवायच्या कशा हे आव्हान आहे. मात्र महाविकास आघाडी सरकारचा सामान्य मुंबईकरांना सुविधा देण्याचा निश्चय आहे. कारण मुंबईच्या विकासात खरे योगदान सामान्य मुंबईकरांच्या कष्टाचे आहे. त्यामुळे मेट्रोचे खरे श्रेय मुंबईकरांना आहे. मुंबईत अनेक विकास प्रकल्पांतर्गत पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर दिला आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, कोस्टल रोड, न्हावा शेवा ते शिवडी अशा अनेक प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे मुंबईकरांना आनंदाने आणि जलद गतीने प्रवास करता येईल.

**- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**

## पायाभूत विकासासाठी भरीव तरतूद

राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी महाविकास आघाडी शासन कटाक्षाने लक्ष देत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. येत्या तीन वर्षांत यासाठी चार लाख कोटी रुपयांची तरतूद केली जाईल. मुंबईचा विकास करणे महाविकास आघाडी सरकारचे ध्येय आहे. मात्र हा विकास करताना मुंबईचे मुंबईपण हरवणार नाही, याची काळजी घेतली जाणार आहे. मुंबई बरोबरच पुणे, ठाणे, नवी मुंबई, नागपूर येथील मेट्रो विकासालाही चालना देणार आहोत. राज्यातील विकासकामांसाठी निधी कधीही कमी पडू देणार नाही.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

## मेट्रोमुळे वाहतूक गतिमान

मेट्रो ही मुंबईकरांसाठी राज्य शासनाने दिलेली गुढीपाडव्याची भेट आहे. मेट्रोमुळे वाहतूक गतिमान व्हायला मदत होईल. एमएमआरडीएने मुंबई विकासाला गतिमान करण्यावर भर दिला आहे. मुंबईच्या विकासाचे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. नजीकच्या काळात मेट्रो, मोनो, बेस्ट आणि लोकल यासाठी एकच तिकीट चालू शकेल, अशी प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**- एकनाथ शिंदे, नगरविकास मंत्री**

## जीवन सुसह्य करण्यावर भर

राज्य शासन मुंबईतील नागरिकांचे जीवन सुसह्य (ईज ऑफ लिव्हिंग) कसे होईल यावर भर देत आहे. यासाठी छोट्या कामात लक्ष घालत असून यामध्ये फुटपाथ सुधारणा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यांचा समावेश आहे.

**- आदित्य ठाकरे, पर्यटन, पर्यावरण मंत्री तथा पालकमंत्री, मुंबई उपनगर**

स्पर्शाने जाणवणारा मार्ग (Tactile Path) ची सोय.

- प्रत्येक ट्रेनचा एक डबा महिलांसाठी राखीव.
- ९० सें.मी. पेक्षा कमी उंचीच्या मुलांना विनामूल्य प्रवासाची सवलत. त्यासाठी प्रत्येक तिकिट खिडकीजवळ उंची मोजण्यासाठी जिराफ स्टिकर्स उपलब्ध.
- ग्राहक सेवा कार्यालय, प्रथमोपचार कक्ष, स्वच्छतागृह, सुरक्षा तपासणी बिंदू, सीसीटीव्ही, हरवलेल्या-सापडलेल्या व्यक्तींसाठी केंद्र, अग्निशमन यंत्रणा, सामान तपासणी यंत्रणा, धातुशोधक यंत्र आदींची सुविधा.

## तिकिटांसाठी विविध सुविधा

प्रवाशांच्या सोयीसाठी तिकिट यंत्रणेत स्वयंचलित तिकिट भाडे संकलन प्रणाली. तिकिट ऑफिस मशीन, व्हेंडिंग यंत्रे बसवण्यात आली असून एकेरी, परतीचे तसेच समूह तिकिट आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भविष्यात अधिक सोपा, सुखकर प्रवास करण्यासाठी स्मार्ट कार्ड सुविधा सुरू करण्याचा मेट्रोचा मानस आहे.

## मेट्रोच्या कामांना गती



कुलाबा-बांद्रा-सीप्झ हा ३३.५ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग-३ हा पूर्णतः भूमिगत असून जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीच्या साहाय्याने मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशन लिमिटेडमार्फत स्थापत्य कामे गतीने सुरू आहेत. गेल्या वर्षी ३१ मे रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते चारकोप डेपो ते आरेपर्यंत १९.७ कि.मी. लांबीच्या मार्गाची पहिली चाचणी करण्यात आली.

मेट्रो मार्ग-२ तसेच डी. एन. नगर ते मंडाळे व मेट्रो मार्ग-४ वडाळा घाटकोपर- मुलुंड-ठाणे-कासारवडवली मार्गांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. जानेवारी २०१९ मध्ये मार्ग २-ब व एप्रिल २०१८ मध्ये मार्ग ४ साठी कंत्राटदार नेमण्यात आले असून स्थापत्य कामे सुरू आहेत. या दोन्ही प्रकल्पांचा सुरुवातीला सुमारे १८ लाख प्रवाशांना फायदा होणार आहे. मेट्रो मार्ग ५, मार्ग ६, मार्ग ९ आणि ७अ बांधकामाच्या विविध टप्प्यात असून मेट्रो मार्ग १० व मार्ग १२ करिता साधारण सल्लागारांच्या नियुक्तीसाठी मागवण्यात आल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा मेट्रो मार्ग ८ आणि शिवाजी चौक (मीरा रोड) ते विरार हा मार्ग १३ आणि कांजूरमार्ग ते बदलापूर मार्ग १४ चे सविस्तर प्रकल्प अहवाल बनवण्याचे काम सुरू असून या सर्व मेट्रो मार्गांची एकूण लांबी ३३७ कि.मी. राहणार आहे. यापैकी बहुतांश मेट्रो मार्ग २०२४-२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले असून सर्व मेट्रो मार्गांचे काम पूर्ण झाल्यावर मेट्रो रेल्वेच्या या पूरक जीवनवाहिनीचा दररोज सुमारे १०० लाख प्रवाशांना फायदा होईल, असा अंदाज आहे. एकूणच देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे चित्र बदलवण्यात मेट्रो रेल्वे सेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा १२ मे हा जन्मदिवस दरवर्षी 'परिचारिका दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. परिचारिका दिनाचे यंदाचे ब्रीद हे 'परिचारिका या भविष्यातील आरोग्य यंत्रणेचा मूलभूत पाया आहेत. त्यांना सन्मान दिला पाहिजे आणि त्यांचे हक्क सुरक्षित केले पाहिजे, तरच जागतिक आरोग्य संतुलित राहण्यास मदत होईल,' असे आहे.**

# 'सेवाव्रतीं'चा सन्मान

**प्रेरणा दळवी**

गेल्या दोन वर्षांत जगभरात कोरोनाने धुमाकूळ घातला आणि आरोग्य सुविधेचे सगळे समीकरण बदलून गेले. आता कोरोनाचा प्रकोप कमी झाला असून जीवन पूर्वपदावर येत आहे. परंतु गेल्या दोन वर्षातील कोरोना काळात सर्वच लक्ष हे आरोग्य व्यवस्थेवर केंद्रित झाल्याचे पाहायला मिळाले असून आरोग्यसेवक ही एक नवीन संकल्पना समोर येत आहे. त्यात परिचारिकांचा अर्थात नर्सेसचा वाटा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

## आरोग्य क्षेत्रात परिचारिकांची गरज

आरोग्य सेवेत परिचारिकांचा मोलाचा वाटा असला तरीही आज रुग्ण आणि परिचारिका यांचे गुणोत्तर (रेशो) बघता भारतात २०२४ पर्यंत किमान ४.३ कोटी परिचारिकांची गरज भासणार आहे. ही गरज पूर्ण झाली तरच जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमावलीचे आपण लक्ष्य गाठू शकणार आहोत. हे लक्ष्य गाठण्यासाठी परिचारिका प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या राहिल्या पाहिजे. ज्या संस्था नियमांचे पालन करत आहेत आणि ज्यांच्याकडे स्वतःचे रुग्णालय आहे किंवा वैद्यकीय शिक्षण देणारे महाविद्यालय आहे, त्या संस्थांना प्रवेशसंख्या वाढवून दिल्या गेल्या पाहिजे. दरवर्षी २५,००० ते ३०,००० नर्सेस आपले पदविका किंवा पदवी पूर्ण करत असतात. आरोग्य क्षेत्राला आज परिचारिकांची गरज आहे.

## मानसिक तणावात वाढ

कोरोनाच्या काळात नर्सेसचे बाधित होण्याचे प्रमाण जास्त होते. एका आकडेवारीनुसार ३१ डिसेंबर २०२० पर्यंत जगभरातील ३४ देशातील १.६ दशलक्ष आरोग्यसेवक कोरोनाबाधित झाले होते. कोरोनामुळे जगभरात जवळपास तीन हजाराच्या आसपास नर्सेसचे मृत्यू झाले आहेत. आज सर्व हॉस्पिटलमध्ये नर्सिंग स्टाफ हा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पण बहुतांशी देशात कोविडमध्ये काम करणाऱ्या नर्सेसमध्ये मानसिक तणाव वाढलेला दिसून आला आहे. कारण सतत वाढणारी रुग्ण संख्या, कौटुंबिक चिंता, सतत धावपळ, कामाचा वाढलेला ताण, रुग्णांच्या



नातेवाइकांनी केलेला हल्ला आणि त्यानंतर येणारी विफलता यासारखे अनेक घटक हे मानसिक तणावाचे कारण बनले होते.

## प्रचलित सुविधांची गरज

कोविड-१९ काळात गेली दोन वर्ष अविरत सेवा देऊनही नर्सेस ताकदीने उभ्या आहेत. आपल्याकडे असणारा एक हीन दृष्टिभाव आजही ह्या क्षेत्रातील आधुनिकीकरण दूर ठेवत आहे, असे दिसून येते. या व्यवसायात येणारा वर्ग हा मध्यमवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेला वर्ग आहे. तांत्रिकदृष्ट्या आजही नर्सिंग प्रशिक्षण अद्ययावत होणे गरजेचे आहे. जगभरात जवळपास १.३ कोटी नर्सेस येत्या दोन ते तीन वर्षांत सेवानिवृत्त होत आहेत. आज जगभरात ६० लाख, तर भारतात ३० लाख नर्सेसची कमतरता आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी जास्तीत जास्त परिचारिका महाविद्यालयांना परवानगी देणे, नर्सिंग प्रशिक्षणासाठी विद्यार्थी आकर्षित होतील अशी सुविधा देणे, अशा गोष्टी अमलात आणणे गरजेचे आहे. तांत्रिकदृष्ट्या विदेशात नर्सिंग सक्षम झाले आहे. तशी सुविधा भारतात शासकीय रुग्णालयात प्रचलित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली गेली पाहिजे.

## वैद्यकीय शिक्षणाला प्राधान्यक्रम

फ्लोरेन्सचे नर्सिंग शास्त्र कोविड-१९ काळात इतक्या वर्षांनी अमलात येत आहे. 'चेकलिस्ट मेनिफेस्टो' या डॉक्टर अतुल गावंडे यांच्या बेस्ट सेलर पुस्तकात त्यांनी डॉक्टर्सची चेकलिस्ट बनवताना नर्सिंग चार्टपासून प्रेरित होऊन बनवली आहे,

नर्स ही जन्मल्याबरोबरच पहिला आणि मृत्यूपूर्वीच्या शेवटच्या श्वासाची साक्षीदार असते. विविध स्वभावाचे रुग्ण, बरे-वाईट अनुभव याची शिदोरी ती रोज बांधत असते. भावनिक भाग वगळता या पुढे आपल्या देशातील आरोग्य व्यवस्था सुधारणे आणि पुढचे संभाव्य धोके टाळायचे असतील, तर नर्सिंग आणि वैद्यकीय शिक्षण यांना प्राधान्यक्रम देणे हे देशासमोरचे आव्हान आहे.

**(लेखिका या महात्मा गांधी मिशन मदर तेरेसा परिचारिका महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्रशासकीय अधिकारी आहेत.)**

शासन स्तरावर घेण्यात आलेले निर्णय व त्यांची अंमलबजावणी, विविध प्रकल्पांचे भूमिपूजन, शुभारंभ होत आहेत. तसेच योजनांच्या कार्यपूर्तीचा, प्रकल्पांचे लोकार्पण, नवीन वास्तूंचे उद्घाटन, विकासकामांचा आढावा घेण्याचे काम मंत्रिमंडळातील सदस्य करत आहेत. अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री

# पाऊल पडते पुढे

## मेट्रोच्या मार्गिकाचे लोकार्पण

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई मेट्रोच्या २-अ या दहिसर ते डहाणूकरवाडी मार्गावरील आणि मेट्रो ७ दहिसर ते आरे या दोन मार्गिकांचे उद्घाटन झाले. या वेळी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, खासदार गजानन किर्तीकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, एमएमआरडीएचे आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवासन आदी उपस्थित होते.

## सायबर गुन्हे प्रतिबंध केंद्र

वर्ल्ड ट्रेड सेंटरयेथील सेंट्रल हॉलमध्ये महाराष्ट्र पोलिसांच्या डायल ११२ आणि महिला व बालक सायबर गुन्हे प्रतिबंध केंद्र प्रकल्पाचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, गृह राज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराज देसाई, गृह राज्यमंत्री (शहरे) सतेज पाटील, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव गृह आनंद लिमये, अपर मुख्य सचिव सुरक्षा आणि अपील नितीन गद्रे, पोलीस महासंचालक रजनीश शेठ आदी उपस्थित होते.



मुंबई मेट्रोच्या २-अ या दहिसर ते डहाणूकरवाडी मार्गावरील आणि मेट्रो ७ दहिसर ते आरे या दोन मार्गिकांचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार. सोबत नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, खासदार गजानन किर्तीकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, एमएमआरडीएचे आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवासन आदी

## मराठी भाषा भवनाचे भूमिपूजन

मरिन ड्राइव्ह समोरील चर्नी रोड येथील मराठी भाषा भवनाचे भूमिपूजन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई, मुंबई शहर जिल्ह्याचे पालक मंत्री अस्लम शेख, मराठी भाषा विभागाचे राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, खासदार अरविंद सावंत, खासदार अनिल देसाई, राहुल शेवाळे, आमदार दिवाकर रावते, सुनिल शिंदे, आशिष शेलार, मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव, मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मराठी भाषा भवनचे भूमिपूजन आणि फलकाचे अनावरण करण्यात आले.

## वस्तू आणि सेवा कर भवनाचे भूमिपूजन

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली वडाळा येथे वस्तू आणि सेवा कर भवनाच्या नवीन वास्तूचे भूमिपूजन झाले. या वेळी नगर विकासमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) एकनाथ शिंदे, दूरदृश्यप्रणालीद्वारे तर वस्त्रोद्योग,

मत्स्यव्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री, मुंबई शहर अस्लम शेख, खासदार राहुल शेवाळे, आमदार कॅ. आर. तमिळ सेल्वन, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, सीजीएसटीचे मुख्य आयुक्त अशोक कुमार मेहता तसेच वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, पोर्ट ट्रस्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक राजीव जलोटा, आयुक्त वस्तू आणि सेवा कर राजीव मित्तल, नियोजन विभागाचे प्रधान सचिव राजगोपाल देवरा, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## महामंडळ कार्यालयाचे उद्घाटन

पुणे येथे सामाजिक न्याय भवन परिसरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या कार्यालयाचे दूरदृश्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तथा समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे आदी उपस्थित होते.

## परिसंवादाचे उद्घाटन

पुणे येथे पर्यायी इंधन क्षेत्रातील उद्योजक आणि गुंतवणूकदारांच्या परिषदेचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार, उद्योगमंत्री सुभाष देसाई, ऊर्जामंत्री नितीन राऊत, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, पर्यावरण राज्यमंत्री आदिती तटकरे (दूरदृश्यप्रणालीद्वारे), परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अनबलगन, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष सुधीर मेहता आदी उपस्थित होते.

## पावसाळापूर्व कामांचा आढावा

येत्या पावसाळ्यात पाणी साचून पूरस्थिती उद्भवणार नाही, यासाठी महानगरातील सर्व राडारोडा (डेब्रिज) काढण्याची कामे आणि नालेसफाईची कामे संबंधित यंत्रणांनी ३१ मे २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. मुंबई महानगरातील पावसाळापूर्व कामांचा विशेषतः राडारोडा (डेब्रिज) व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा या शासकीय निवासस्थानी बैठक घेण्यात आली. बैठकीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबाल सिंह चहल आदी मान्यवर उपस्थित होते.

## विकासकामांचा, योजनांचा आढावा

राज्याच्या अर्थसंकल्पात विकासाची पंचसूत्री मांडण्यात आली असून या पंचसूत्रीच्या अंमलबजावणीसाठी कामाला लागा, मिशनमोड स्वरूपात जनहिताच्या योजनांची अंमलबजावणी करून सर्वसामान्य माणसाला दिलासा द्या, तसेच जिल्ह्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे गतीने पूर्ण करा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या. त्यांनी बैठकीत मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेऊन पूर, अतिवृष्टी तसेच दरड कोसळणे अशा आपत्तीच्या प्रसंगाचा सामना करण्यासाठी योग्य ती पुर्वतयारी व उपाययोजना राबवण्याचे निर्देशही या वेळी दिले.

मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पोलीस अधीक्षक आदी क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. यात त्यांनी राज्याच्या प्राधान्यक्रमावरील कामांचा आणि योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

या वेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सल्लागार सीताराम कुंटे यांच्यासह सर्व विभागांचे सचिवस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

## जलजीवन मिशन आढावा

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जलजीवन मिशन योजनेचा आढावा घेतला.

या वेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री संजय बनसोडे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री यांचे सल्लागार सीताराम कुंटे, सचिव संजीव जयस्वाल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, जलजीवन मिशन अभियान संचालक हृषिकेश यशोद तसेच पाणी पुरवठा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## संकल्पकक्षाच्या माध्यमातून आढावा

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन त्याचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा तसेच सुरू केलेल्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यादृष्टीने संकल्पकक्षाच्या माध्यमातून नियमित आढावा घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. या योजना तसेच प्रकल्पांचा आपण स्वत:ही दर आठवड्याला आढावा घेणार असल्याचे मुख्यमंत्री या वेळी म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी संकल्पकक्षाला भेट दिली. या वेळी त्यांनी सागरी किनारा मार्गाच्या कामाच्या प्रगतीचा आढावाही घेतला.

या वेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्री सचिवालयाचे प्रधान सल्लागार सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक इकबालसिंह चहल (दूरदृश्यप्रणालीद्वारे) यांच्यासह इतर मंत्रालयीन अधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांची विविध विभागांना भेट

गतिमान कारभार करताना अधिकाधिक पेपरलेस काम आणि तंत्रज्ञानाचा उपयोग कसा वाढेल ते पाहण्याच्या सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या. मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातल्या काही विभागांना भेटी दिल्या तसेच कर्मचाऱ्यांशी चर्चा करून ई-टपाल, पेपरलेस कामकाज प्रणाली विषयी सूचना केल्या व अडचणी विचारल्या. या वेळी कर्मचाऱ्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करताना एका दिव्यांग कर्मचाऱ्याची त्यांच्यासमवेत छायाचित्र घेण्याची इच्छाही पूर्ण केली आणि त्याची विचारपूसही केली. प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना फुले वाहून अभिवादन केले.

## दर्शक गॅलरीचे लोकार्पण

गिरगाव चौपाटीवरील दर्शक गॅलरीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या पत्नी सौ. रश्मी ठाकरे, पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, खासदार अनिल देसाई, खासदार अरविंद सावंत, आमदार मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक इकबालसिंह चहल, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.संजीव कुमार आदी उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्य विभागाचा आढावा

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांस्कृतिक कार्य विभागाच्या विविध विषयांचा आढावा घेतला. यामध्ये प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार, नवीन लेणी खोदणे, महावारसा सोसायटीची स्थापना करणे, गडकिल्ल्यांचे संवर्धन इ. विषयांचा समावेश होता. या बैठकीस नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री अमित देशमुख, सांस्कृतिक कार्य विभागाचे राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार उपस्थित होते.

मंदिरे, गडकिल्ले आणि संरक्षित स्मारके यांच्या जतन आणि संवर्धनाचे काम त्यांचे मूळ रूप, स्थान महात्म्य आणि इतिहास लक्षात घेऊन केले जावे, असे करताना हे काम शास्त्रोक्त पद्धतीने व कालबद्धरीत्या करण्यात येईल याचीही काळजी घेण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. मुख्यमंत्री संकल्पकक्षाच्या माध्यमातून विविध विभागांच्या २५ योजनांचा आपण स्वत: पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

## ऊर्जा विभागाचा आढावा

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ऊर्जा विभागाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये त्यांनी राज्याची सध्याची वीज निर्मिती, कोळशाचा साठा, विजेची आजची आणि भविष्यातील मागणी आणि याअनुषंगाने करावयाच्या उपाययोजना याचा आढावा घेतला. बैठकीस ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थाकीय संचालक विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय खंदारे यांच्यासह विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

राज्याला विजेबाबत स्वयंपूर्ण करण्यासाठी विभागाने तात्कालिक स्वरूपात करावयाच्या तसेच दीर्घकालीन स्वरूपात करावयाच्या कामांचे धोरण निश्चित करावे, सध्याची विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन ८ हजार मेगावॅट औष्णिक वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेऊन तातडीच्या उपाययोजना कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

## वीज बचतीबाबत जागरूकता

वीज तुटवड्याची स्थिती देशभर आहे. हे संकट केवळ आपल्यावर नाही. ही परिस्थिती समजून घेऊन सर्वांनीच वीज बचत करायला हवी. विजेची उधळपट्टी होऊ नये, यासाठी काळजी घ्यायला हवी. याबाबत सर्वांना सतर्क करा. जागरूकता निर्माण करा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. याशिवाय महानिर्मितीने राज्यासाठी आवश्यक वीज उपलब्ध व्हावी यासाठी खासगी वीज कंपन्या तसेच अन्य पर्यायी मार्गांबाबतचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. खासगी वीज कंपन्यांनी अतिरिक्त वीज निर्मिती करावी. त्यासाठीच्या लागणाऱ्या परवानग्यांसाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. वीज बचतीबाबत ग्रामपंचायत, नगरपालिका ते महापालिकास्तरांपर्यंत जागरूकता निर्माण होण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

वर्षा येथील समिती सभागृहात मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली वीज निर्मितीच्या नियोजनाबाबत ऊर्जा विभागाची बैठक झाली. बैठकीस ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, खासदार अनिल देसाई, खासदार विनायक राऊत, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय खंदारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्यासह ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

## एनसीएमसी–कार्ड सुविधेचे लोकार्पण

बेस्टच्या कुलाबा आगारातील इलेक्ट्रिक हाऊसच्या प्रांगणात मुंबई महानगरपालिकेचा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम - बेस्टच्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड एनसीएमसीचे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, खासदार अरविंद सावंत, मुंबईच्या महापौर किशोरीताई पेडणेकर, मुंबई महानगर पालिकेचे प्रशासक आयुक्त इक्बालसिंह चहल, बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र, बेस्ट समितीचे माजी अध्यक्ष आशिष चेंबुरकर आदी उपस्थित होते.

### धरणग्रस्तांसाठी जमीन वाटपाची प्रक्रिया

कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या अद्ययावत संकलन यादीचे बहुतांश काम पूर्ण झाले असून महाराष्ट्र दिनापासून पात्र प्रकल्पग्रस्तांच्या जमीन वाटपाच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात येणार आहे. कोयना धरणाच्या वर्धापनदिनी प्रातिनिधिक स्वरूपात प्रलंबित पात्र प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे प्रत्यक्ष वाटप करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासह त्यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी दिले.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, गृह राज्यमंत्री शंभूराज देसाई (दूरदृश्यप्रणालीद्वारे), वन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, श्रमिक मुक्तीदलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, कार्याध्यक्ष संपत देसाई आदी मान्यवरांसह प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### संकल्प निरोगी महाराष्ट्राचा

आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करून निरोगी महाराष्ट्राचा संकल्प करु या, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई महानगरपालिका आणि मेडस्केप इंडिया यांच्या वतीने संकल्प निरोगी महाराष्ट्राचा (फिट महाराष्ट्र) उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. त्या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे आवाहन केले. या वेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. जागतिक आरोग्य दिनानिमित्त गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या या कार्यक्रमात संकल्प निरोगी महाराष्ट्राचा उपक्रमाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

### राज्य शिखर प्रशिक्षण केंद्र

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या राज्य शिखर प्रशिक्षण केंद्रामुळे बँकेतील संचालक, अधिकारी, कर्मचारी यांना चांगले प्रशिक्षण मिळून सहकार चळवळ अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

बालगंधर्व नाट्यगृहात पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या 'राज्य शिखर प्रशिक्षण केंद्र' उद्घाटन आणि उत्कृष्ट नागरी बँकांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते, उपाध्यक्ष साहेबराव टकले, मानद सचिव संगीता कांकरिया आणि संचालक मंडळातील सदस्य उपस्थित होते.

### अनुकंपा योजनेचा लाभासाठी सकारात्मक

राज्यातील नगरपालिका - नगरपंचायतींमधील समावेशन पात्र पण समावेशनापूर्वी निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा योजनेचा लाभ देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

राज्यातील नगरपालिका नगरपंचायतींमध्ये कार्यरत संवर्ग कर्मचारी, सफाई कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे संचालक किरण कुलकर्णी यांचेसह नगरविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि विविध कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.



**एकनाथ शिंदे**
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री

या वेळी नगरविकास मंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले की, सातव्या वेतन आयोगाच्या पहिल्या तीन हप्त्याची थकबाकी म्हणून ४५० कोटी रुपये वितरित करण्यात येणार आहेत. याशिवाय आश्वासित प्रगती योजनेंतर्गत १०-२०-३० धोरणानुसार कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळावी, यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव आणि नव्याऐवजी जुन्या पेन्शन योजनेनुसार पेन्शन द्यावी, ही मागणीदेखील वित्त विभागाकडे पाठवण्यात आल्याचे या वेळी स्पष्ट करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात वित्त विभागाशी चर्चा करून त्या लवकरात - लवकर मार्गी लावण्याची ग्वाहीदेखील नगरविकास मंत्र्यांनी या वेळी दिली.

### सांगली जिल्ह्यात ड्रायपोर्ट उभारणार

सांगली जिल्ह्यातील रांजणी येथे ड्रायपोर्ट उभारण्याबाबत व्यवहार्यता तपासणी करावी. यासाठी महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, जेएनपीटीच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित पाहणी करावी, अशा सूचना जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिल्या.

सांगली जिल्ह्यातील रांजणी येथे ड्रायपोर्ट उभारण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उद्योग



**जयंत पाटील**
जलसंपदा मंत्री

मंत्री सुभाष देसाई, राज्यमंत्री आदिती तटकरे, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे प्रधान सचिव जगदीश गुप्ता, सांगलीतील उद्योग संघटनेचे पदाधिकारी सुरेश पाटील आदी उपस्थित होते. या बैठकीमुळे जिल्ह्यातील ड्रायपोर्ट उभारण्याच्या हालचालींना वेग मिळाला आहे.

## महसूल विभागाचा आढावा

राज्य शासनाने वाळू उत्खनन करण्याबाबत नवीन सुधारित धोरण आणले आहे. या धोरणानुसार सर्व निकष पूर्ण असलेल्या वाळू गटांचे लिलाव सुरू करावे. तसेच महसूल विभागाशी संबंधित कामांना गती द्यावी, असे निर्देश महूसल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले. श्री. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांची आढावा बैठक झाली. त्या वेळी त्यांनी हे निर्देश दिले. या बैठकीला महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, जमाबंदी आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद विभागीय आयुक्त, नोंदणी महानिरिक्षक आणि महसूल विभागाचे सह सचिव उपस्थित होते.

राज्यातील अनेक भागात वाळू अभावी बांधकामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नवीन सुधारित धोरण राबवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या धोरणानुसार राज्यातील वाळू, दगड गटांचे लिलाव सुरू करण्याची गरज आहे. सर्व निकषांची पूर्तता असलेल्या ठिकाणी लिलाव प्रक्रिया तातडीने सुरू करून नागरिकांना वाळू उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल व वाळूचोरीसारख्या प्रकारांना आळा बसेल. लिलाव प्रक्रिया वेळेत पूर्ण होतील, यासाठी देखरेख करावी. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणातील प्रकरणांविषयी राज्य शासनाने प्रभावी आणि मजबुतीने भूमिका मांडण्याचे निर्देशही श्री. थोरात यांनी अधिकाऱ्यांना दिले.

ई-पीक पाहणी संदर्भात माहिती घेताना येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या पिकांची अचूक नोंद करण्यासंदर्भात राज्यव्यापी ई-पीक पाहणी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होईल, याकडे प्रशासनाने कटाक्षाने लक्ष केंद्रित करावे, अशा सूचना श्री.थोरात यांनी या वेळी केल्या.



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

हरकत नसलेली प्रलंबित नोंदणीकृत फेरफारची प्रकरणे ठरावीक कालावधीत निकाली काढावीत. सातबारा संगणकीकरण बहुतांशी पूर्ण झाले असले तरी ही प्रणाली टिकवण्यासाठी नवनवीन संशोधन करून या प्रणालीमध्ये वेळोवेळी बदल किंवा सुधारणा करण्यात यावी. नवीन उपविभागीय अधिकारी कार्यालय सुरू करणे. क्षेत्रीय स्तरावरील महसूल कार्यालयांमध्ये स्वच्छतेच्या सुविधा, दिव्यांग आणि वयोवृद्ध नागरिकांसाठी रॅम्प आणि लिफ्टची सुविधा उपलब्ध करण्याबाबत विभागाने विशेष मोहीम राबवण्याचे निर्देशही महसूल मंत्री श्री. थोरात यांनी दिले.

## नियामक मंडळाच्या सदस्यांची बैठक

मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा विभागांतर्गत असलेल्या राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाच्या नवनिर्वाचित सदस्यांची बैठक सह्याद्री अतिथिगृह येथे झाली. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार आणि संवर्धनाबाबत या वेळी सांगोपांग चर्चा करण्यात आली. या वेळी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, भाषा विभागाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित आदी उपस्थित होते.

या वेळी श्री. देसाई म्हणाले की, मराठी भाषा विभागाने मागील दोन वर्षांत अनेक चांगले उपक्रम राबवले. मराठी भाषेचे संवर्धन अधिक चांगल्या प्रकारे कसे करता येईल, यासाठी विशेष प्रयत्न केले. यामध्ये सर्व भाषांच्या शाळांमध्ये मराठीची सक्ती, दुकानांवरील मराठी भाषेतील पाट्यांचा कायदा केला. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात मराठीचा वापर प्रभावीपणे व्हावा, यासाठी देखील कायदा केला. आगामी काळात दैनंदिन कामकाजात मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी सर्व नगरपालिका आणि महामंडळ प्राधिकरणात कार्यशाळा घेतली जाईल. याशिवाय दुकानांच्या पाट्यांचे निरीक्षण करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्री. देसाई यांनी केले.



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

## मराठी भाषेचा वापर वाढवावा

आकाशवाणी, दूरदर्शनसह सर्व खासगी रेडिओ वाहिन्यांनी प्राइम टाइममध्ये (महत्त्वाच्या वेळेत) मराठी भाषेतील कार्यक्रमांना प्राधान्याने स्थान द्यावे, मुंबईतील रेडिओवरील कार्यक्रमात मराठी

भाषेचा वापर वाढवावा, अशा सूचना मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी दिल्या. दृक श्राव्य माध्यमातील प्रतिनिधींची बैठक मंत्रालयात मंत्री श्री. देसाई यांच्या दालनात घेण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी माजी मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्यासह दृक्श्राव्य माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. देसाई म्हणाले, राज्यात मराठी भाषेतील कार्यक्रम सुरू राहणे आवश्यक आहे. आकाशवाणीसह विविध खासगी रेडिओ वाहिन्यांवरील मराठी कार्यक्रमांची संख्या कमी झाली आहे. आकाशवाणी व दूरदर्शनवरून अनेक मराठी कार्यक्रम हद्दपार झाले आहेत. या ठिकाणी हिंदी, इंग्रजी कार्यक्रमांना अधिक प्राधान्य दिले जात आहे. यापुढे आकाशवाणीने मराठी कार्यक्रमांची संख्या वाढवावी, खासगी रेडिओंनीदेखील किमान दोन तास मराठी कार्यक्रम प्रसारित करावेत, असेही श्री. देसाई यांनी सांगितले.

## अर्धवार्षिक परिषद

सामान्यातील सामान्य माणसाला न्याय मिळवून देणे हे पोलिसांचे प्रमुख कर्तव्य आहे. जनतेच्या मनात पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करण्याबरोबच सामाजिक सौहार्द टिकविण्यावर भर द्या, असे गृहमंत्री दिलीप



**दिलीप वळसे–पाटील**
गृहमंत्री

वळसे-पाटील यांनी सांगितले. पोलीस महासंचालक कार्यालयात आयोजित राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या अर्धवार्षिक परिषदेत ते मार्गदर्शन करत होते. या वेळी अपर मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश शेठ, मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे, अपर पोलीस महासंचालक राजेंद्र सिंह व्यासपीठावर उपस्थित होते. गृहमंत्र्यांनी राज्यातील गुन्हे आणि कायदा व सुव्यवस्था आणि पोलिसांच्या एकूण कामकाजाचा आढावा घेतला.

## उष्माघात टाळण्यासाठी उपाययोजना

राज्यात उष्णतेची तीव्रता वाढू लागली आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम मानवी आरोग्यावर होऊ नये, उष्माघाताचे प्रमाण वाढू नये, तापमान वाढीमुळे वाढणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिले.



**राजेश टोपे**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

वातावरणातील बदल व मानवी जीवन या संदर्भात आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीपकुमार व्यास, आयुक्त रामास्वामी एन. आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील वाढत्या तापमानामुळे उष्माघात, रोगांचा प्रादुर्भाव अशा समस्यांचा सामना करावा लागतो. या समस्यांवर मात करण्यासाठी आरोग्य यंत्रणा, जिल्हा प्रशासन यांनी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. आरोग्य विभाग आणि हवामान खात्याने योग्य समन्वय राखून माहितीचे आदानप्रदान करावे. यामुळे वातावरणातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या समस्या कमी होण्यास मदत होईल. उष्माघाताचे प्रमाण वाढू नये, तापमान वाढीमुळे वाढणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी जिल्हास्तरावर प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी. जनजागृती करावी. आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण, हवामान खाते आदी विभागांनी सतर्क राहून समन्वय ठेवावा, असे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी या वेळी स्पष्ट केले.

## सामंजस्य करार

महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांना आता पिडिलाईट इंडस्ट्रीजच्या वतीने आधुनिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य शासनाचा कौशल्य विकास विभाग आणि पिडिलाईट इंडस्ट्रीज दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

राज्याचे कौशल्य विकास मंत्री राजेश टोपे, प्रधान सचिव मनीषा वर्मा, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे संचालक दिगंबर दळवी, आणि पिडिलाईट इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष डॉ. पी. के. शुक्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या वेळी कौशल्य विकास विभागाचे उपसचिव डॉ. नामदेव भोसले, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे सहसंचालक योगेश पाटील, पिडिलाईट इंडस्ट्रिजचे संजीव सिन्हा, डॉ. प्रदीप गाडेकर, हर्षद देशपांडे, अरुण चमणकर, हिना शहा आदी उपस्थित होते.

## राष्ट्रीय पंचायत पुरस्कार

राष्ट्रीय पंचायतराज दिनाचे औचित्य साधत केंद्र सरकारने राष्ट्रीय पंचायत पुरस्कार जाहीर केले आहेत. दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार २०२२ (पडताळणी वर्ष २०२०-२१) करिता सर्व उत्कृष्ट जिल्हा परिषद पुरस्कारात कोल्हापूर जिल्हा परिषद अव्वल ठरली असून, पंचायत समिती पुरस्कारामध्ये राहता (जि.अहमदनगर) आणि मालवण (जि.सिंधूदुर्ग) पंचायत समित्यांची निवड करण्यात आली आहे. उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारात १७ ग्रामपंचायती समावेश झाला आहे. त्याचबरोबर बालसुलभ ग्रामपंचायत पुरस्कार कोल्हापूर जिल्ह्यातील शृंगारवाडी

ग्रामपंचायतीस आणि ग्रामपंचायत विकास आराखडा पुरस्कार अहमदनगरच्या लोहगाव या ग्रामपंचायतीला मिळाला आहे. तसेच नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार २०२२ हा राज्यातून उस्मानाबाद जिल्ह्यातील भंडारवाडी या ग्रामपंचायतीला मिळाला असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास, कामगार मंत्री

## स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता निधी

१५व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयाने ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता दुसऱ्या हप्त्यापोटी ८६१.४० कोटी रुपये इतका निधी राज्याला प्राप्त झाला आहे. हा निधी ग्रामीण स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी वित्त विभागाने मान्यता दिली असल्याने आता राज्यातील प्रत्येक गावागावात विकासकामे त्याचप्रमाणे स्थानिक गरजेची कामे हाती घेण्यात येतील, अशी ग्वाही ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

केंद्र सरकारकडून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय वर्ष २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये एकूण ४,३०७ कोटी रुपये निधीपैकी अबंधित/अनटाईड ग्रँडचा पहिला हप्ता ८६१.४० कोटी रुपये वितरित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या बंधित ग्रँडच्या (टाईड) पहिल्या हप्त्याचे १२९२.१० कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे. १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना एकूण निधीच्या ८० टक्के, तर पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांना प्रत्येकी १० टक्के निधीची वाटप करण्यात येते. त्यानुसार या त्रिस्तरीय ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना पहिल्या हप्त्यापोटी एकूण २१५३.५० कोटी रुपये आणि दुसऱ्या हप्त्यापोटी ८६१.४० कोटी रुपये असे एकूण ३०१४.९० कोटी रुपये वितरित झाले असल्याची माहिती मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

## कामगार पुरस्कार प्रदान सोहळा

केंद्र सरकारच्या कामगार कायद्यांची अंमलबजावणी करताना कामगारांच्या हिताला बाधा येऊ दिली जाणार नाही, असे कामगार व ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन येथे आयोजित ३४व्या गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान सोहळ्यात मंत्री हसन मुश्रीफ बोलत होते.

या वेळी 'हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळा'स रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार २०१९ देऊन गौरवण्यात आले. ७५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे, तर ५० हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे स्वरूप असलेला २०१९चा कामगार भूषण पुरस्कार राजेंद्र हिरामण वाघ, कमिन्स इंडिया लिमिटेड, कोथरूड पुणे यांना देण्यात आला. तसेच २५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे स्वरूप असलेल्या गुणवंत कामगार कल्याण पुरस्काराने ५१ कामगारांना गौरवण्यात आले.

या कार्यक्रमास कामगार राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. अश्विनी जोशी, कामगार आयुक्त सुरेश जाधव, कामगार विभागाचे उपसचिव डॉ. श्रीकांत पुलकुंडवार, कामगार विभागाचे उपसचिव शशांक साठे, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुनर्विकास प्रकल्पाची पाहणी

ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळीचे काम कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही, अशी ग्वाही गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी दिली. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी ते प्रकल्पस्थळी आले होते. या वेळी उपस्थित चाळवासीयांसोबत त्यांनी संवाद साधला. या वेळी आमदार सुनील शिंदे, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलींद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे उपस्थित होते.



**डॉ. जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

## पुनर्वसन प्रकल्पाचा आढावा

वरळी येथील बिडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रहिवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केले.

गृहनिर्माण मंत्री डॉ. आव्हाड यांनी वरळी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्वसन प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेतला आणि स्थानिकांसोबत चर्चा करून अडचणी जाणून घेतल्या. या वेळी माजी राज्यमंत्री सचिन अहिर, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलींद म्हैसकर, म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे व अन्य मान्यवर मंचावर उपस्थित होते.

## पशुवैद्यकीय पदवीधरांची नेमणूक

नोंदणीकृत खासगी पशुवैद्यकीय पदवीधरांची कत्तलखान्यांनी त्यांच्या कत्तलखान्याच्या कत्तलीच्या क्षमतेनुसार नेमणूक करण्यात येणार असल्याचे पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री सुनील केदार यांनी सांगितले. मंत्रालयात पशुवैद्यकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळेस पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे .पी. गुप्ता यांच्यासह राज्यातील पशुवैद्यक अधिकारी उपस्थित होते.

केंद्र आणि राज्य शासनाच्या तत्सम प्राधिकरणाद्वारे प्राधिकृत असलेल्या राज्यातील अधिकृत कत्तलखान्यांमध्ये नोंदणीकृत असलेल्या खासगी पशूवैद्यकांना संबंधित कत्तलखान्याकरिता प्राण्यांच्या कत्तली संदर्भात कत्तलपूर्व तपासणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्य आणि राज्याबाहेरील पशू कत्तलखान्यामध्ये कत्तलीसाठी मोठ्या प्रमाणात येतात. राज्यातील काही भागात निर्यातीसाठी मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात येतात. मनुष्यबळ अपुरे असल्याने टँगिंगकरिता अडचणी येतात या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे श्री. केदार यांनी या वेळी सांगितले.



**सुनील केदार**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

## जलतरणपटूंना सहकार्य करणार

राज्यातील जलतरणपटूंना भावी उपक्रमांसाठी राज्य शासन आणि क्रीडा विभागाचे नेहमी सहकार्य राहील, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी सांगितले.

'आजादी का अमृत महोत्सव' या उपक्रमांतर्गत नागपूर जिल्हा हौशी जलतरण संघटना, नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ स्विमिंग, सागरी साहसी जलतरण प्रशिक्षण केंद्र, जुहू बीच, मुंबई, इंडियन डायव्हर अ‍ॅण्ड एक्सप्लोरर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ओपन वॉटर स्विमिंगचा प्रसार-प्रचार करण्याच्या दृष्टीने आयोजित सागरी साहशी जलतरण अभियानाचा प्रारंभ गेट वे ऑफ इंडिया येथून झाला, त्या प्रसंगी ते बोलत होते.

या वेळी इंडियन नेव्हीचे, जिलेट कोशी, मुंबई महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष दळवी, क्रीडा विभागाचे अधिकारी, नेव्हीचे अधिकारी जलतरणपटूंचे पालक उपस्थित होते. या सागरी जलतरणाचे नेतृत्व नागपूरचे आंतरराष्ट्रीय सागरी जलतरणपटू जयंत जयप्रकाश दुबळे यांनी केले. या देशातील सर्वात मोठे आणि पहिले सागरी जलतरण अभियान राज्याच्या क्रीडा विभाग, स्काऊट गाईड विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग तसेच मेरिटाईम बोर्ड, मुंबई पोर्ट ट्रस्ट, स्विमिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या सर्वांच्या सहकार्याने राबवण्यात आले.

## घरकूल योजना राबवण्याबाबतचा प्रस्ताव

विमुक्त जाती, भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले.

मंत्रालयातील दालनात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्याबाबत मंत्री श्री. वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी इतर मागास प्रवर्ग विभागाचे अपर मुख्य सचिव नंदकुमार, वित्त विभाग, नियोजन विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना



**विजय वडेट्टीवार**
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

राबवण्याबाबत २०२१-२२ या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घोषणा केली आहे. तसेच अन्न, नागरी पुरवठा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना ही स्वतंत्र योजना राबवण्याची शिफारस केलेली आहे. सध्या विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबवण्यात येत असल्याने विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता विभागाने या योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देशही मंत्री श्री. वडेट्टीवार यांनी दिले.

## विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन

जागतिक वारसा दिनानिमित्त मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात छायाचित्र आणि चित्र प्रदर्शनाचे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी आमदार संजय दौंड, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण आयुक्त वीरेंद्र सिंह, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## आरोग्य सेवा प्रणालीचा अभ्यास

वैद्यकीय शिक्षण संशोधन विभागाच्या कार्यप्रणालीत सुलभता आणि एकसमानता आणण्यासाठी आरोग्य सेवा व शैक्षणिक व्यवस्थापन प्रणालीचा (एच.एम.आय.एस.)

अभ्यास करण्यात यावा, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले.

मंत्रालयात आरोग्य सेवा व शैक्षणिक व्यवस्थापन प्रणाली (एच.एम.आय.एस.) याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी वैद्यकीय शिक्षण आयुक्त विरेंद्र सिंह यांनी एच.एम.आय.एस याबाबत सादरीकरण केले. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण आयुक्त वीरेंद्र सिंह, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, उपसचिव प्रकाश सुरवसे उपस्थित होते.



**अमित देशमुख**

वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री

## वैद्यकीय सेवांचे बळकटीकरण

सर्वसामान्यांना गुणवत्तापूर्ण आणि किफायतशीर दरात वैद्यकीय सेवा देण्याचे उद्दिष्ट २०३० पर्यंत ठेवण्यात आले आहे. येणाऱ्या काळात हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वैद्यकीय सेवा क्षेत्राचे खासगीकरण न करता सार्वजनिक-खासगी भागीदारीने राज्यातील वैद्यकीय क्षेत्रातील सेवांचे बळकटीकरण करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वैद्यकीय शिक्षण व तृतीयक आरोग्य सेवेचे सार्वजनिक खासगी भागीदारीच्या माध्यमातून बळकटीकरण करण्यासाठी गुंतवणूकदारांची परिषद ताज लॅण्ड्स ॲण्ड येथे आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेचे उद्घाटन उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्त विरेंद्र सिंह, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, आयएफसीचे भारताचे प्रमुख व्हेन्डी वर्नर, दक्षिण आशियाचे विभागीय संचालक थॉमस लुबेक यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात वैद्यकीय शिक्षण विभागाच्या 'व्हिजन डॉक्युमेंट'चे प्रकाशन करण्यात आले.

## राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान कार्यक्रम

मुंबईत श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ येथे उच्च व तंत्रशिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत २०१६-१७ ते २०२०-२१ या काळातील राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या



**उदय सामंत**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

अध्यक्षतेखाली झाला. या वेळी एस. एन. डी. टी महिला विद्यापीठ मुंबईच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविद्यापीठ, नागपूर डॉ. ए. एम. पातुरकर, राष्ट्रीय सेवा योजना राज्य सल्लागार समितीचे सदस्य अंकित प्रभू, अमित गुप्ता, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशाला आणि महाराष्ट्राला अभिमान वाटावा असे कार्य राज्यातील एन.एस.एस च्या विद्यार्थ्यांनी कोविड-१९ काळात कोविडयोद्धा म्हणून कार्य केले आहे. या विद्यार्थ्यांचा सन्मान हा झालाच पाहिजे, यासाठी मागील ५ वर्षांतील सर्व पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या विद्यार्थ्यांचा आदर्श घेऊन सामाजिक कार्य केले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेमधून विद्यार्थ्यांना मिळणारे मानधन कमी असल्याने यामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवला आणि यामध्ये जवळपास ६५ टक्के वाढ करण्यात आली. तसेच राज्यांच्या अर्थसंकल्पामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेसाठी ७ कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला, अशी माहिती श्री. सामंत यांनी या वेळी दिली.

## पीएमएफएमई योजनेची अंमलबजावणी

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत (पीएमएफएमई) देशामध्ये ३२१८ अर्जांना मंजुरी देण्यात आली असून यामध्ये महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. महाराष्ट्रात एकूण ५७९ अर्जांना मंजूरी देण्यात आली आहे. महाराष्ट्रापाठोपाठ आंध्र प्रदेश ३२१, कर्नाटक २९५, मध्य प्रदेश २९२, उत्तर प्रदेश २२९, तमिळनाडू २०६, मणिपूर १८३, तेलंगणा १७०, हिमाचल प्रदेश १५८, ओडिसा १५०, पंजाब १४३ व राजस्थान १०७ असे इतर राज्यात मंजुरीचे प्रमाण आहे, असे कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे. औरंगाबाद, सांगली व पुणे जिल्ह्यांनी या योजनेच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या आर्थिक वर्षांत योजनेची माहिती पात्र व गरजू लाभार्थीपर्यंत पोहोचवून दर्जेदार कामगिरी करावी, असे निर्देशही कृषी मंत्री श्री. भुसे यांनी दिले आहेत.

## धोरण निश्चितीसाठी बैठक

राज्यात कापूस आणि सोयाबीनचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. कापूस आणि सोयाबीनची उत्पादकता वाढवणे हा मुख्य उद्देश समोर ठेवून राज्यात कापूस, सोयाबीन आणि गळीत धान्याच्या

उत्पादकता वाढ आणि मूल्यसाखळी विकासासाठी धोरण निश्चित करण्यात येत असल्याचे कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

मंत्रालय येथील दालनात राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकास या संदर्भात धोरण निश्चितीसाठी बैठक झाली. या वेळी सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरज कुमार (दूरदृश्यप्रणालीद्वारे) महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक रूचेश जयवंशी, अवर सचिव श्रीकांत आंडगे, कृषी उपसंचालक पांडुरंग शिगेदार, शिवकुमार सदाफुले, नांदेड कापूस संशोधन केंद्राचे कापूस विशेषज्ञ डॉ. विजय बंग, डॉ. एस. पी म्हेत्रे, श्री जयेश महाजन व अन्य अधिकारी उपस्थित होते.



**दादाजी भुसे**
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

### ‘अमृत जवान अभियान’ राबवणार

राज्यातील विविध शासकीय कार्यालयात शहीद जवान, माजी सैनिक, शहिदांच्या विधवा, कर्तव्यावर कार्यरत असणारे सैनिक यांचे कुटुंबीय यांची अनेक शासकीय कामे असतात. शासन दरबारी अशा प्रलंबित असणाऱ्या कामांचा तत्काळ निपटारा करण्यासाठी देशाच्या ७५व्या स्वातंत्रदिनाच्या महोत्सवानिमित्त ‘अमृत जवान अभियान २०२२’ हे अभियान १ मे २०२२ ते १५ जून २०२२ या कालावधीत संपूर्ण राज्यात राबवण्यात येणार आहे, अशी माहिती माजी सैनिक कल्याण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

या संदर्भातील शासन निर्णय १३ एप्रिल रोजी निर्गमित करण्यात आला आहे. महसूल, भूसंपादन, पुनर्वसन, विविध प्रकारचे दाखले, पोलीस विभागाकडील तक्रारी, ग्रामविकास विभागाच्या विविध योजना, कृषी विभागाकडील विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठीचे प्रस्ताव, सहकार विभागाकडील कर्ज प्रकरणे इ., परिवहन विभागाचे परवाने अशा कामांसाठी विशेष मेळावे घेऊन शहीद जवान, माजी सैनिक व सेवेत कार्यरत सैनिकांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी अभियान राबवण्यात यावे, असे निर्देश श्री.भुसे यांनी दिले होते. त्यानुसार हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

### जीवन प्राधिकरणाची बैठक

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या संचालक मंडळाची १५२वी बैठक पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अध्यक्ष गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



**गुलाबराव पाटील**
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

मंत्रालय येथे झालेल्या बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे राज्यमंत्री, संजय बनसोडे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जयस्वाल, जलसंधारण विभागाचे सचिव डॉ. दिलीप पांढरपट्टे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, मुख्य प्रशासकीय अधिकारी दीपाली देशपांडे-सावर्डेकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंजुरीसाठी विविध विषय ठेवण्यात आले होते. जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करणे व योजना काळातील कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीतील सातवा वेतन आयोग सुधारित वेतन संरचना मंजूर करणे आदी विषयांवर या वेळी चर्चा झाली.

### संस्थांच्या सक्षमीकरणासाठी सकारात्मक

राज्यातील बलुतेदार संस्थांच्या अडचणी सोडवण्याबाबत शासन सकारात्मक असून या संस्थांच्या सक्षमीकरणासाठी मदत करण्यात येईल, असे सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.



**बाळासाहेब पाटील**
सहकार व पणन मंत्री

महाराष्ट्र राज्य बलुतेदार ग्रामीण कारागीर सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्यासंदर्भात सहकार व पणन मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी सहकार आयुक्त अनिल कवडे, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंशु सिन्हा, मेधा वाफे, श्री.हिरमुखे उद्योग विभागाचे सहसचिव संजय देगांवकर, सहकार विभागाचे उपसचिव श्री.अंबिलपुरे संघर्ष समितीचे शिवाजी आदमाने, हनुमंत सुतार, सचिव काळूराम सपकाळ, जत तालुका

विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाचे चेअरमन सुरेश व्हनखंडे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

बलुतेदार संस्थांमध्ये सचिवांची संख्या कमी आहे या सचिवांच्या नेमणूका लवकरच करण्यात येतील. परंतु सचिवांच्या नेमणुका होत नाहीत म्हणून कामकाज बंद ठेवणे योग्य नाही. त्यामुळे कामकाज लवकर सुरू करावे. ३१ मार्च २००८ अखेर संस्थांना थकीत कर्जमाफीसाठी सभासदांना कर्जमाफीची रक्कम मंजूर केली, परंतु बँकांना रक्कम २०१६ मध्ये मिळाली. त्यामुळे बँकांनी २००८ ते २०१६ पर्यंत व्याज आकारणी केली आहे. यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून २००८ ते २०१६ पर्यंतची व्याज आकारणी संदर्भात सहकार आयुक्त यांनी माहिती घेऊन अहवाल सादर करावा, असे निर्देशही सहकार मंत्री श्री.पाटील यांनी दिले.

## कार्यशाळेची जागा रुग्णालयासाठी

ठाणे शहरातील कळवा रुग्णालयाजवळील एसटी कार्यशाळेच्या जागेवर पालिकेचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभे करण्यास तसेच ठाणे रेल्वे स्थानकाजवळील एसटी स्थानकाची जागा भूमिगत वाहनतळासाठी देण्यास परिवहन विभागाने अखेर मंजुरी दिली आहे. त्यामुळे लवकरच या दोन्ही जागा ठाणे महानगरपालिकेला हस्तांतरित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांच्यामध्ये मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.



**ॲड. अनिल परब**
परिवहन मंत्री

या वेळी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्यासह नगरविकास, एसटी आणि ठाणे महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पोषण पंधरवड्यात महाराष्ट्र अव्वल

‘सुपोषित भारत’ या संकल्पनेखाली आता पोषणाची चळवळ सर्वत्र पसरू लागली आहे. या चळवळीत महाराष्ट्राने सातत्याने अग्रेसर राहत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. नुकत्याच झालेल्या पोषण पंधरवड्यात महाराष्ट्र राज्याने देशात पुन्हा एकदा पहिला क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या कार्यक्रमांची संख्या व सहभागी



**ॲड. यशोमती ठाकूर**
महिला व बालविकास मंत्री

लाभार्थींची संख्या या दोन्हीही प्रकारात महाराष्ट्राने हे यश मिळवले आहे. विशेष म्हणजे कार्यक्रमांच्या संख्येत गुजरात आणि उत्तर प्रदेशला तर लाभार्थींच्या संख्येतही कर्नाटक आणि गुजरातला मागे टाकले आहे. महिला व बालविकास विभागाच्यावतीने राबवण्यात आलेले विविध उपक्रम, अधिकारी आणि अंगणवाडी सेविकांनी घेतलेली मेहनत या सर्वांचा हा परिपाक असल्याची प्रतिक्रिया राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

पोषण पंधरवडा आणि माहे सप्टेंबर २०२१ मध्ये साजरा करण्यात आलेल्या पोषण माह या दोन्ही कार्यक्रमांमध्ये राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर घेतलेल्या कार्यक्रमांच्या संख्येत आणि सहभागी लाभार्थींच्या संख्येतही प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल मंत्री ॲड. ठाकूर यांनी विभागाच्या सर्व अधिकारी आणि अंगणवाडी सेविकांसह राज्यातील सर्व महिला, स्तनदा माता आणि गरोदर माता यांचे कौतुक केले आहे. तसेच या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्वांचे अभिनंदन केले आहे.

## सिंचनक्षमतेच्या योजनांचा आढावा

मृद् व जलसंधारण विभागामार्फत कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर मंडळांतर्गत सर्व जिल्ह्यातील मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रम, राज्यस्तर योजना, जिल्हा नियोजन समिती व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत ० ते ६०० हेक्टर सिंचनक्षमतेच्या सर्व योजनांचा आढावा मृद् व जलसंधारण मंत्री



**शंकरराव गडाख**
मृद् व जलसंधारण मंत्री

शंकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात घेण्यात आला. या वेळी या विभागाचे सचिव डॉ.दिलीप पांढरपट्टे यांच्यासह विभागाचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून या योजनेंतर्गत करण्यात येणारी कामे पूर्ण करताना कामाची गुणवत्ता, दर्जा सांभाळूनच कामे वेळेवर पूर्ण करण्यात यावीत असे निर्देश मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## नेवासा येथे उपविभागाची निर्मिती

मृद् व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय

कार्यालयाची फेररचना करण्यात आली आहे. कामात सुसूत्रता राखण्यासाठी आणि विभागांतर्गत सर्व तालुक्यांतील कामे अधिक गतीने पूर्ण होण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा या नवीन उपविभागाची नव्याने निर्मिती करण्यात आली असल्याची माहिती मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी दिली.

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या नेवासा या उपविभागांतर्गत नेवासा, शेवगाव आणि पाथर्डी या तीन तालुक्यांचे कार्यक्षेत्र येणार आहे. श्रीगोंदा तालुक्यासाठी स्वतंत्र नगर व पारनेर, श्रीरामपूर- राहता- कोपरगाव- राहुरी, संगमनेर व आकोले, जामखेड व कर्जत आणि आता नव्याने फेररचना करण्यात आलेला नेवासा हे ६ उपविभाग अहमदनगरचे जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात येतील.

जलसंधारण विभागाची राज्ययंत्रणेची १७७ उपविभागीय कार्यालये, तर जिल्हा परिषदेची उपविभागीय १८९ उपविभाग मंजूर आहेत. आता फेररचनेंतर्गत जिल्हा परिषदसाठी २ तालुक्यांकरिता १ उपविभाग याप्रमाणे २१ उपविभाग मंजूर करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता यापूर्वीच दिलेली आहे.

## इंधन परिषदेचे उद्घाटन

नवीन कृषी मैदान येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रायोजित आणि महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चर पुणेच्या सहयोगाने आयोजित पहिल्या पुणे पर्यायी इंधन परिषदेच्या उद्घाटन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री सचिवालयातील प्रधान सचिव आशिष कुमार सिंह, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अनबलगन, पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त राजेश पाटील, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे सुहास दिवसे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य सचिव अशोक शिनगारे, परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे, एमसीसीआयएचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत गिरबाने, संचालक एस.एच. कोपर्डेकर आदी उपस्थित होते.



**आदित्य ठाकरे**
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

**टीम लोकराज्य**

## एमएडीसीला पुरस्कार

नागरी उड्डयन मंत्रालय, भारत सरकार (एमओसीए) आणि फिक्कीद्वारे आयोजित विंग्स इंडिया-२०२२ इव्हेंट आणि ॲवॉर्ड्स समारंभात महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीला (एमएडीसी) अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरवण्यात आले.

सर्वोत्कृष्ट नागरी उड्डयन पद्धती, नवीनतम कल आणि नवकल्पना प्रदर्शित करणे आणि आदान-प्रदान करणे या उद्देशाने २४ ते २७ मार्च २०२२ या कालावधीत बेगमपेट विमानतळ, हैदराबाद येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (एमएडीसी) ने विंग्स इंडिया-२०२२ इव्हेंट आणि विंग्स इंडिया ॲवॉर्ड्समध्ये भागीदार राज्य (पार्टनर स्टेट) म्हणून महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधित्व केले. एमएडीसीने महोत्सवाच्या ठिकाणी अतिशय प्रशस्त, नावीन्यपूर्ण आणि माहितीपूर्ण दालनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विमान वाहतूक क्षेत्रातील ठळक वैशिष्ट्ये, एमएडीसी, मिहान प्रकल्प, मिहानमधील प्रमुख विमान वाहतूक प्रकल्प आणि मिहानमधील कंपन्यांची माहिती प्रदर्शित करत विमान वाहतूक क्षेत्रातील राज्याच्या लक्षणीय कामगिरीचे प्रदर्शन केले. मान्यवर आणि व्यावसायिक ग्राहकांना हाताळण्यासाठी आणि बिझनेस टू बिझनेस मिटिंग आयोजित करण्यासाठी एअरसाइडवर आणखी एक सुंदर दालन उभारण्यात आले होते.



**राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी 'बेस्ट स्टेट विथ अ डेडिकेटेड आउटलुक फॉर दि एव्हिएशन सेक्टर' या श्रेणीतील पुरस्काराबद्दल एमएडीसीचे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांचे अभिनंदन केले. या वेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव उपस्थित होते.**

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंदीया यांच्या हस्ते, प्रामुख्याने शिर्डी आणि नागपूर विमानतळांसाठी महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांना 'बेस्ट स्टेट विथ अ डेडिकेटेड आउटलुक फॉर दि एव्हिएशन सेक्टर' या श्रेणीतील पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात आला.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या पुरस्काराबद्दल एमएडीसीचे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांचे अभिनंदन केले असून एमएडीसी भविष्यातही उत्तम कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**राज्य मंत्रिमंडळाच्या ७, ८, २० आणि २८ एप्रिल २०२२ रोजीच्या बैठकीत ऊर्जा, नगरविकास, इतर मागास बहुजन कल्याण, महसूल, शालेय शिक्षण, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, वने, उच्च व तंत्रशिक्षण, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, गृह, सहकार, इतर मागास बहुजन कल्याण आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..**



# मंत्रिमंडळात ठरले

## सौर ऊर्जा पार्क

राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेपर्यंत अल्ट्रामेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनीस एनटीपीसी लि.सोबत संयुक्त कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेपर्यंतचे अल्ट्रामेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क विकसित करण्याकरिता नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (किंवा त्यांचे साहाय्यक/सहयोगी कंपनी) व महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (महानिर्मिती) यांच्या दरम्यान अनुक्रमे ५०:५० या प्रमाणात भांडवली गुंतवणूक राहील. ही संयुक्त उद्यम कंपनी राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेपर्यंत अल्ट्रामेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क विकसित करेल. त्यासाठी राज्य शासनाच्या ऊर्जा विभागास राज्य सुकाणू अभिकरण म्हणून घोषित करण्यात आले. या समितीवर राज्य शासनाच्या अपारंपरिक ऊर्जा धोरणाशी सुसंगत अशा बाबींचे पालन करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. सौर ऊर्जा पार्कमधील प्रकल्पधारकाकडून एकरकमी शुल्क व वार्षिक संचलन व देखभाल शुल्क इ. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुज्ञेय करण्यात आले आहे



## वीज खरेदी करण्यास मान्यता

राज्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन भारनियमन टाळण्यासाठी महावितरणला वीज खरेदी करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.



उन्हाळा आणि सिंचनासाठी राज्यातील विजेची मागणी दिवसेंदिवस वाढू लागली आहे. त्यातच कोळसा टंचाईमुळे अपुरी वीज निर्मिती होऊ लागली आहे. पॉवर एक्सचेंजमध्ये उपलब्ध होणारी वीजही महागडी ठरू लागली आहे. अशा परिस्थितीत राज्यातील विजेचे भारनियमन टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग केंद्रीय विद्युत मंत्रालयाने ठरवल्याप्रमाणे वीज

खरेदी करार करण्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या संचालक मंडळाला घेता येईल, असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

## तिरुपती देवस्थानास जमीन

नवी मुंबईतील उलवे नोड येथे व्यंकटेश्वराचे मंदिर उभारण्यासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानास भाडेपट्ट्याने जमीन देण्यास मान्यता देण्यात आली.

शहर पातळीवरील सुविधा (सिटी लेवल फॅसिलिटी) म्हणून विशेष प्रकल्पांतर्गत श्री व्यंकटेश्वराचे मंदीर उभारणीसाठी उलवे नोडमधील सेक्टर-१२, भूखंड क्र.३ येथे जमीन देण्यात येणार आहे. त्यानुसार उलवे नोडमधील सेक्टर-१२, भूखंड क्र.३ (एकूण क्षेत्र ४०,४०० चौ.मी.) १.०० चटईक्षेत्र निर्देशांकासह एक रुपया प्रतिचौरस मीटर या नाममात्र दराने भाडेपट्ट्याने थेट वाटप करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डातर्फे देशात हैद्राबाद, चेन्नई, कन्याकुमारी, बंगलुरू, विशाखापट्टणम, भुवनेश्वर, जम्मू, नवी दिल्ली, कुरुक्षेत्र व ऋषिकेश या ठिकाणी शहर पातळीवरील सुविधा म्हणून भगवान श्री व्यंकटेश्वराचे मंदिर उभारणी करण्यात आली आहे. या धर्तीवर नवी मुंबईमध्ये मंदिर उभारण्यासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानाने जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

नवी मुंबईतील श्री व्यंकटेश्वराचे मंदिर भाविकांसाठी तसेच पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. त्यामुळे त्या परिसराला धार्मिक व सामाजिक महत्त्व प्राप्त होऊन स्थानिक परिसरात रोजगार संधी निर्माण होतील. या देवस्थानामार्फत या परिसरात अनेक समाज उपयोगी उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. सर्व बाबींचा विचार करून एक विशेष बाब म्हणून हा भूखंड उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## भुयारी रेल्वे प्रकल्पास मान्यता

पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील स्वारगेट ते कात्रज या भुयारी रेल्वे प्रकल्पास मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प एप्रिल २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत हा प्रस्ताव शासनाकडे सादर केला. यामध्ये महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील स्वारगेट ते कात्रज ही टप्पा-१ ची विस्तारित मार्गिका भुयारी पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ३ हजार ६६८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

स्वारगेट ते कात्रज (कॉरिडोर-२ए) या ५.४६४ कि.मी. लांबीच्या मार्गावर ३ स्थानके असतील. पुणे शहरातील स्वारगेट व कात्रज प्रमुख उपनगरे असून त्यादरम्यान गुलटेकडी, पद्मावती, मार्केट यार्ड, बिबवेवाडी, धनकवडी, बालाजी नगर, साईबाबा नगर, आंबेगाव अशी महत्त्वाची ठिकाणे आहेत. या परिसरातील वारंवार होणारी वाहतुकीची कोंडी टळून रस्त्यावरील दुर्घटना, प्रदूषण, इंधन खर्च, प्रवास कालावधी यामध्ये बचत होणार आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील प्रवाशांना वातानुकूलित, सुरक्षित, आरामदायक प्रवासासाठी स्वारगेट ते कात्रज ही भुयारी मेट्रो रेल्वे मार्गिका उपयोगी ठरणार आहे.

प्रकल्पासाठी शासनाकडून अनुदान स्वरूपात ४५० कोटी ९५ लाख व केंद्र व राज्य शासनाचे कर, शुल्क यावरील खर्चासाठी बिनव्याजी दुय्यम कर्ज स्वरूपात ४४० कोटी ३२ लाख रुपये असा एकूण ८९१ कोटी २७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. पुणे महानगरपालिकेकडून ६५५ कोटी ९ लाख रुपयांचे वित्तीय साहाय्य महामेट्रोला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ३०० कोटी ६३ लाख रुपयांचे अनुदान मिळावे यासाठी विनंती करण्यात येणार आहे. द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थेमार्फत १८०३ कोटी ७९ लाख रुपयांचे अल्प व्याज दराचे कर्ज घेण्यास, या कर्जाचा कोणताही भार राज्य शासनावर येणार नाही या अटीवर, महामेट्रो यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली.

## महामंडळास भागभांडवल

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल १०० कोटी रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला. शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची कोकण विभागाची उपकंपनी आहे.



यापूर्वी महामंडळाचे अधिकृत भागभांडवल १५ कोटी रुपये होते. त्यामध्ये भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## भाडेपट्ट्याचे नुतनीकरण

मुंबईतील मौजे मनोरी (ता. बोरीवली) येथील परमपूज्य स्वामी गगनगिरी महाराज आश्रम चॅरिटेबल ट्रस्टला दिलेल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्ट्याचे पुढील ३० वर्षांसाठी नुतनीकरण करण्यास मान्यता देण्यात आली.

## जिल्हा वार्षिक योजनेतून निधी राखीव

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या योजनांची पुनर्रचना करून त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेमध्ये (सर्वसाधारण) किमान ५ टक्के निधी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा उपविभाग वगळून) विभागाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधील सध्या अस्तित्वात असलेल्या शालेय शिक्षणाशी संबंधित चार योजनांची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात आली.

## नवीन दोन श्रेणी

राज्यात सिलबंद विदेशी मद्याच्या किरकोळ विक्रीच्या परवान्यासाठी क्षेत्रफळ तसेच सुविधांच्या आधारे नवीन दोन श्रेणी तयार करण्यास मान्यता देण्यात आली. यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या एफ. एल.-२ परवान्यांचे क्षेत्रफळ तसेच सुविधांच्या आधारे नवीन दोन श्रेणी तयार करून विद्यमान परवानाधारकांना त्यांच्याकडील परवान्याची श्रेणीवाढ करण्यास मुभा देण्यात येणार आहे. यात अतिउच्च दर्जाची मद्यविक्री अनुज्ञप्ती व

उच्च दर्जाची मद्यविक्री अनुज्ञप्ती अशा दोन श्रेणी निर्माण होऊन शासनास अतिरिक्त महसूल मिळेल.

## मद्यार्क निर्मितीच्या धोरणास मान्यता

काजूबोंडे, मोहाफुले यांपासून उत्पादीत केलेल्या मद्याची वर्गवारी देशी मद्य याऐवजी विदेशी मद्य अशी करून या पदार्थांसह फळे, फुलांच्या मद्यार्काद्वारे स्थानिक मद्य निर्मितीच्या धोरणास मान्यता देण्यात आली.

काजूबोंडे व मोहाफुलांच्या मद्यार्कापासून बनवण्यात येणाऱ्या मद्याचे वर्गीकरण हे २००५ पासून देशी मद्य असे करण्यात आले होते. या वर्गीकरणामुळे या मद्याच्या विपणनास व मूल्यवृद्धीस मर्यादा येत होत्या. त्यामुळे काजूबोंडे, मोहाफुले या पदार्थांसह स्थानिकरीत्या उत्पादित होणाऱ्या फळे, फुले यापासून तयार होणाऱ्या मद्यार्कापासून जे मद्य तयार केले जाईल त्यास 'देशी मद्य' याऐवजी 'विदेशी मद्य' असा दर्जा देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## नवीन आयटीआयला मान्यता

पुणे जिल्ह्यातील येरवडा येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था-आयटीआय सुरू करणे व या संस्थेसाठी पदनिर्मितीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार या संस्थेसाठी ४० पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यामध्ये औद्योगिक आस्थापना, औद्योगिक समूह यांची मोठी संख्या आहे. येरवडा व नगररोड या क्षेत्रात रांजणगाव, चाकण एम.आय.डी.सी. हे आशिया खंडातील नामांकित उद्योगक्षेत्र आहेत. या ठिकाणी फियाट, बजाज इलेक्ट्रिकल, एल.जी. इलेक्ट्रॉनिक्स, हायर इंडिया लि. येझाकी, बेकर गेजेस आदी ऑटोमोबाईल, मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध क्षेत्रातील उद्योग आहेत.



पुणे शहर व जिल्ह्यातील अनेक होतकरू उमेदवारांना या परिसरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सध्याच्या मंजूर संख्येवरील जागांवर प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळणे दुरपस्त होत आहे. त्यानुसार स्थानिक गरजा तसेच मागणी विचारात घेऊन येरवडा येथे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या आयटीआयमधील १८ तुकड्या व त्यासाठी आवश्यक २३ शिक्षकीय व १७ शिक्षकेतर अशा एकूण ४० पदनिर्मितीच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली.

## महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प

देशातील पहिल्याच अशा महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प राबवण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पातील शिफारशीनुसार राज्यभरात अंमलबजावणी केल्यास राज्यातील जैवविविधतेचे संवर्धन होऊन येणाऱ्या पिढीकरिता नैसर्गिक संसाधने जतन करणे शक्य होणार आहे. त्यामुळे राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाने २०१४ ते २०१९ पर्यंत राबवलेल्या प्रकल्पातून आतापर्यंत तयार झालेली यंत्रणा आणि संसाधने कायमस्वरूपी चालू ठेवण्याच्या दृष्टीने आणि जनुक कोषाची व्याप्ती वाढवण्यासाठी हा प्रकल्प राज्यभर राबवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पांतर्गत जनुकीय संपत्तीचे जतन करण्याच्या अनुषंगाने सागरी जैवविविधता, पीकांचे स्थानिक वान, पशुधनाच्या स्थानिक जाती, गोड्या पाण्यातील जैवविविधता, गवताळ, माळरान आणि कुरणांमधील जैवविविधता, वनहक्क क्षेत्रासाठी संरक्षण व व्यवस्थापन योजना, वन परिसर पुनर्निर्माण हे ७ महत्त्वाचे घटक निश्चित करण्यात आले आहेत. वरील ७ घटकांना पूरक असे माहिती व्यवस्थापनाकरिता भक्कम व्यासपीठ निर्माण करण्यात येणार आहे.

## सौर ऊर्जा कुंपण

वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी राज्यातील संवेदनशील गावांमध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेची व्याप्ती वाढवून त्यामध्ये सौर ऊर्जा कुंपण उभारण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली.

वनक्षेत्राचे प्रभावी संरक्षणामुळे वन्यप्राण्यांच्या संख्येत अलीकडे लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचबरोबर मानव-वन्यजीव संघर्ष वाढून विशेषत: शेतपीक नुकसानीच्या घटना घडू लागल्या आहेत. वन्यजीवांमुळे शेतपिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना पिकाचे रक्षणाकरिता रात्रीच्या वेळी शेतावर पिकाचे संरक्षण करावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय तर होतेच, पण वन्यजीवांच्या हल्ल्याचा धोकादेखील असतो. त्यावर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर वैयक्तिक सौर ऊर्जा कुंपण उभारण्याची योजना राबवण्यात आली. यातून या भागात गेल्या काही वर्षात पिक नुकसानीचे प्रकार कमी झाल्याचे दिसून आले. तसेच सौर ऊर्जा कुंपण हटवता येण्यासारखे असल्याने वन्य प्राण्यांचे भ्रमणमार्गदेखील मुक्त राहतात, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन या योजनेची व्याप्ती वाढवून त्याअंतर्गत अशा संवेदनशील गावांमध्ये शेतकऱ्यांना सौर ऊर्जा कुंपण उभारण्याकरिता अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली.

## महाविद्यालयांना अनुदान

प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक महाविद्यालय किंवा विद्याशाखा अनुदानावर आणण्याच्या योजनेंतर्गत २० तालुक्यातील २१ विद्या शाखांना १०० टक्के अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यबल गटाने शिफारस केलेल्या १८



महाविद्यालयांतील १८ विद्या शाखांना १०० टक्के अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. उर्वरित ३ तालुक्यातील ३ विद्या शाखांसाठी नव्याने जाहिरात मागवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. दक्षिण सोलापूर, मुरुड-जंजिरा, दोडामार्ग, तलासरी, सिरोंचा, मुलचेरा, भामरागड, कोरची, जिवती, मूल, मेहकर, मोहाडी, पारशिवनी, भिवापूर, कुही, म्हसळा, मालवण आणि भामरागड हे ते तालुके आहेत. कोरची, एटापल्ली, विक्रमगड या तालुक्यांसाठी जाहिरात मागवण्यात येणार आहे.

## महामंडळांच्या भागभांडवलात वाढ

सामाजिक न्याय विभागाच्या आधिपत्याखालील महामंडळांकडे असणाऱ्या अपुऱ्या भागभांडवलामुळे अनुसूचित जातीतील घटकांना कर्ज मिळण्यास स्वयंरोजगार उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झालेल्या होत्या त्या दूर करण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाला. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या भागभांडवलाची मर्यादा ५०० कोटी रुपयांवरून १००० कोटी रुपये करण्यात आली. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या भागभांडवलाची मर्यादा ३०० कोटी रुपयांवरून १००० कोटी रुपये करण्यात आली. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या भागभांडवलाची मर्यादा ७३.२१ कोटी रुपयांवरून १००० कोटी रुपये करण्यात आली. महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलाची मर्यादा ५० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये इतकी करण्यात आली.

या भागभांडवल मर्यादा वाढवल्यामुळे आता अनुसूचित जातीतील घटकांना कर्ज उपलब्ध होऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मिळतील. तसेच महामंडळांनाही त्यांच्याकडील बीज भांडवल योजना, मुदत कर्ज योजना यशस्वीपणे राबवता येतील. त्यामुळे अनुसूचित जातीतील घटकांचे जीवनमान नक्कीच उंचावणार आहे.

## वैद्यकीय सोयी सुविधा

राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला. विमा कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारानुसार राज्य आरोग्य हमी सोसायटीस उपलब्ध झालेल्या २७२.७१ कोटी इतक्या निधीतून या वैद्यकीय सोयी सुविधा उभारण्यात येतील. यामध्ये ठाणे, रत्नागिरी, बारामती, जालना येथे रेडिएशन



ऑन्कॉलॉजीची युनिट स्थापन करण्यात येतील. त्याचप्रमाणे जिथे वैद्यकीय महाविद्यालये नाहीत, अशा १९ जिल्ह्यांमध्ये कॅथलॅब, सीव्हिटिएस ऑपरेशन थिएटर, लॅमिनार ऑपरेशन थिएटर, ईएसडब्ल्युएल मशिन व २५ ते ३० डायलेसिस मशिन्स स्थापन करण्यात येतील. या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात येईल.

## पोलिसांना घरबांधणीसाठी अग्रिम

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार यांना पूर्वीप्रमाणेच शासकीय घरबांधणी अग्रिम योजनेतून अग्रिम देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील पोलीस दलातील अधिकारी, अंमलदारांना घरबांधणीसाठी अग्रिम मिळणे सुलभ होणार आहे.

## अतिरिक्त ऊसाच्या गाळपासाठी अनुदान

गळीत हंगाम २०२१-२०२२ मधील अतिरिक्त ऊसाचे गाळप करण्यासाठी वाहतूक अनुदान व साखर घट उतारा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाप्रमाणे १ मे २०२२ पासून गाळप होणाऱ्या व साखर आयुक्तालयाने अनिवार्य वितरित केलेल्या ऊसासाठी ५० किमी अंतर वगळून वाहतूक खर्च प्रतिटन प्रतिकिमी दर ५ रुपयांप्रमाणे मंजूर करण्यात आला आहे. तसेच ज्या सहकारी व खासगी (शासन निर्णय २१ ऑक्टोबर २०११ ला एकवेळचा अपवाद म्हणून) साखर कारखान्यांच्या (इथेनॉलसाठी बी हेवी मोलॅसेस/ऊसाचा रस वर्ग केलेला विचारात घेतल्यानंतर) प्रमाणित केलेल्या साखर उताऱ्यामध्ये ०.५ (अर्धा) टक्के किंवा त्यापेक्षा जास्त घट आल्यास व अंतिम साखर उतारा १० टक्के पेक्षा कमी आल्यास सरसकट सर्व कारखान्यांना प्रतिटन २०० रुपये दराने १ मे २०२२ नंतर गाळप होणाऱ्या सर्व ऊसासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## सवलतींबाबत शिफारशी

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग समाजाच्या आरक्षण व आतापर्यंत शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलतींचा अभ्यास करून सादर करण्यात आलेल्या शिफारशी राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारल्या. मंत्री सर्वश्री छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार, गुलाबराव पाटील या सदस्यांची एक समिती १६ ऑक्टोबर २०२० रोजी नेमली होती.



या समितीने विविध संवर्गातील रिक्त पदे, महाज्योतीस निधी वाढवून देणे, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृहे सुरू करणे अशा स्वरूपाच्या विविध शिफारशी केल्या होत्या. या शिफारशींवर संबंधित विभाग पुढील कार्यवाही करतील, असे मंत्रिमंडळ बैठकीत ठरले.

**टीम लोकराज्य**

**राज्य शासनाने कोविड–१९ काळातही विकासकामांमध्ये खंड पडू न देता सर्व क्षेत्रात चौफेर कामगिरी केली आहे. राज्य शासनाने राबवलेल्या विविध लोककल्याणकारी योजना आणि विकासकामांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी, यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने १ ते ५ मे दरम्यान राज्यभरात 'दोन वर्षे जनसेवेची, महाविकास आघाडीची' या संकल्पनेवर आधारित सचित्र प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

# विकासकामांचे प्रतिबिंब

गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती देणाऱ्या या सचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन १ मे रोजी वरळी सी-फेस येथे पर्यटन व पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री आदित्य ठाकरे व मुंबई शहरचे पालकमंत्री तथा वस्त्रोद्योग मंत्री अस्लम शेख यांच्या हस्ते झाले.

मुंबई शहरात वरळी सी-फेस येथे तर मुंबई उपनगरात जुहू बीच येथे ठाण्यासह, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे या महसुली विभागांच्या मुख्यालयात या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

**पुणे** : राज्य शासनाच्या विविध योजना आणि गेल्या दोन वर्षांतील ठळक कामगिरीचे सचित्र दर्शन घडवणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या पुणे विभागीय प्रदर्शनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आले. या वेळी विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, अपर जिल्हाधिकारी विजयसिंह देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी हिम्मत खराडे, माहिती उपसंचालक डॉ. राजू पाटोदकर उपस्थित होते.

**औरंगाबाद** : शासनाच्या द्विवर्षपूर्तीनिमित्त शासन योजनांची माहिती देणाऱ्या चित्रमय प्रदर्शनाचे आयोजन सिमंत मंगल कार्यालय, औरंगपुरा, औरंगाबाद येथे



'दोन वर्षे जनसेवेची, महाविकास आघाडीची' या सचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना पर्यटन व पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री आदित्य ठाकरे व वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख.
सोबत विधान परिषदेचे सदस्य सुनील शिंदे, माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, या वेळी आमदार अंबादास दानवे, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्यासह माहिती व जनसंपर्क विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**नाशिक** : मीडिया सेंटर, बी.डी.भालेकर मैदान, कवी कालिदास कलामंदिरासमोर येथे आयोजित 'दोनवर्ष जनसेवेची महाविकास आघाडी' ची मोहिमेंतर्गत सचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार किशोर दराडे, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, विशेष पोलीस महानिरीक्षक बी.जी. शेखर पाटील, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., पोलीस आयुक्त जयंत नाईकनवरे, उपसंचालक (माहिती) ज्ञानेश्वर इगवे, जिल्हा माहिती अधिकारी रणजितसिंह राजपूत आदी उपस्थित होते.

**ठाणे** : येथील नुतनिकृत टाऊन हॉलमध्ये कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित विकास प्रदर्शनाचे उद्घाटन सार्वजनिक बांधकाम तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी खासदार राजन विचारे, आमदार रवींद्र फाटक, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर, ठाणे महापालिका आयुक्त विपीन शर्मा, जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे, निवासी उप जिल्हाधिकारी सुदाम परदेशी, माहिती व जनसंपर्क विभागाच्या कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे आदी उपस्थित होते.

**नागपूर** : सीताबर्डी मेट्रो जंक्शन येथे





## शासनाची कामे जनतेपर्यंत पोहोचवण्यात माध्यमांचा हातभार

शासनाच्या प्रसिद्धीसाठी स्थानिक दैनिके नेहमीच सकारात्मक प्रतिसाद देत असतात. लघू व मध्यम दैनिकांच्या पत्रकारांच्या अनेक समस्या आहेत. त्या समस्या सोडवण्यासाठी तसेच पत्रकारांसाठी कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व माहिती व जनसंपर्कच्या राज्यमंत्री कु. आदिती तटकरे हे प्रयत्नशील आहेत, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर यांनी केले.



कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या वतीने ठाणे येथील टाऊन हॉल येथे भरवण्यात आलेल्या प्रदर्शनास भेट देऊन पाहणी करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर, कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे आदी.

कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या वतीने ठाण्यातील टाऊन हॉल येथे भरवण्यात आलेल्या प्रदर्शनास भेट देऊन श्री. कपूर यांनी पाहणी केली, तसेच उपस्थित पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकारांना येणाऱ्या अडचणी, त्यांच्याशी संबंधित योजना याबद्दल या वेळी चर्चा झाली.



## योजनांची माहिती मिळाली

'बार्टी'कडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सवलतींचा दिव्यांगांना निश्चितच लाभ मिळतो. येथील प्रदर्शनामुळे मला इतरही योजनांची माहिती मिळाली.

**- विलास पांडुरंग पोकळे, वाशिम**

दोन वर्षातील विकास योजनांवर आधारित 'दोन वर्षे जनसेवेची, महाविकास आघाडीची' या प्रदर्शनाचे उद्‌घाटन ऊर्जा मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या करण्यात आले. या वेळी आमदार ॲड. अभिजीत वंजारी, विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे-चवरे, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, मनपा आयुक्त राधाकृष्णन बी, जिल्हाधिकारी श्रीमती आर. विमला, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती मनोज सुर्यवंशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर, माहिती संचालक हेमराज बागुल, स्मार्ट सिटीचे प्रकल्प संचालक चिन्मय गोतमारे, मेट्रोचे संचालक अनिल कोकाटे उपस्थित होते.

**अमरावती :** संत ज्ञानेश्वर सभागृह येथे शासनाच्या लोककल्याणकारी योजना व विकास कामांची माहिती देणाऱ्या छायाचित्राच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन महिला व बालविकास मंत्री तथा अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार सुलभाताई खोडके, माजी लेडी गव्हर्नर कमलताई गवई, विभागीय आयुक्त पियूष सिंह, जिल्हाधिकारी पवनीत कौर, विभागीय माहिती कार्यालयाचे प्र. उपसंचालक हर्षवर्धन पवार आदी मान्यवर उपस्थित होते.










**जग आता हळूहळू आर्थिक पेमेंट्सच्या अत्यंत गुंतागुंतीच्या जगाकडे वाटचाल करत आहे, जे जागतिक राजकीय व्यवस्थेवर आधारलेले आहे. वित्तीय क्षेत्र आता इतक्या वेगाने बदलत आहे की, आज बँकांपेक्षा बिगर बँका अधिक शक्तिशाली झाल्या आहेत. आर्थिक पेमेंट किंवा कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहारांबाबत तुमच्या मनातील शंकांचे समाधान जी. लिब्रान्ड आणि नताशा डी तेरां या लेखकांनी लिहिलेल्या 'दि पे ऑफ : हाऊ चेंजिंग दि वे वुई पे चेंजेस एव्हरीथिंग' हे पुस्तक वाचून होऊ शकेल.**

# क्रिप्टो करन्सीच्या मोहमयी जगाची सफर

**दीपक कपूर**

पंजाब आणि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह (पीएमसी) बँकेच्या खातेदारांची झालेली प्रचंड फसवणूक आणि त्यामुळे हजारो लोकांचे जीवन कसे प्रभावित झाले, हे आपल्या सगळ्यांच्या स्मरणात असेलच! २०१५ मध्ये बांगलादेश सेंट्रल बँकेकडून झालेल्या अब्जावधी डॉलरच्या घोटाळ्याचे प्रकरणही फारसे जुने नाही... बँकांची अर्थव्यवस्था रुळावरून घसरल्यास क्षणार्धात जीवन कसे उद्ध्वस्त होऊ शकते, हे ही दोन्ही प्रकरणे अधोरेखित करतात. पीएमसी बँकेचा थोड्याच काळानंतर युनिटी स्मॉल फायनान्स बँकेने ताबा घेतला आणि या कठीण काळात हजारो लहान ठेवीदारांना नवीन आशा दिली, हे सुद्धा आपल्याला विसरून चालणार नाही. नोकिया ही जगातील तत्कालीन सर्वात मोठी मोबाईल कंपनी विकली गेली आणि त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न केले गेले, तेव्हा ती कधीही पूर्वीचे स्थान मिळवू शकली नाही. आता जरा कल्पना करा, की पीएमसी बँकेसारखीच परिस्थिती बिट कॉईन आणि इतर क्रिप्टो करन्सी वापरकर्त्यांच्या बाबतीत घडली असती, तर? तर असे संशयास्पद व्यवहार रद्दही करता आले नसते आणि परतावाही मिळाला नसता.




'दि पे ऑफ: हाऊ चेंजिंग दि वे वुई पे चेंजेस एव्हरीथिंग' या पुस्तकात ही तथ्ये अगदी स्पष्टपणे आणि ओघवत्या भाषेत मांडण्यात आली आहेत. आर्थिक व्यवहारांमध्ये पैसे अदा करताना अर्थात पेमेंट करताना घ्यावयाच्या खबरदारीबद्दल जागरूक आणि सावध दृष्टी यातून देण्यात आली असून क्रिप्टो चलनांची जी एक ट्रूम निघाली आहे, त्याचे अभ्यासू विश्लेषणदेखील करण्यात आले आहे. पेमेंट उद्योगाच्या भवितव्याबद्दल यात सखोलपणे विवेचन करण्यात आले आहे.

## पुस्तकाची मांडणी

आर्थिक व्यवहार आणि ते व्यवहार करण्याच्या पद्धती, यातून होणारे अब्जावधी डॉलर्सचे आर्थिक घोटाळे, वित्तीय संस्थांची हाव, यंत्रणांना फसवणारे धूर्त लहान-सहान घोटाळेबाज यांच्या रंजक कथनामुळे पुस्तकाची मांडणी एखाद्या रहस्यमय कादंबरीसारखी झाली आहे. वाचकांना कल्पना असेलच की, स्विफ्ट अर्थात सोसायटी फॉर वर्ल्डवाइड इंटर बँक फायनान्शियल टेलिकम्युनिकेशन ही जागतिक पेमेंट उद्योगातील निर्णायक संस्था आहे. वित्तीय संस्थांना आर्थिक व्यवहारांमधील बारकावे समजण्यासाठी तसेच ठेवी आणि रोख रकमेच्या व्यवहारांमध्ये साह्य करणारी स्विफ्ट

वाचू आनंदे

ही संगणकीय व्यवस्थापन प्रणाली आहे. पुस्तकाचे दोन्ही लेखक हे स्विफ्टचे माजी उच्च अधिकारी आहेत.

## क्रिप्टो करन्सीचा जन्म

पेमेंट्सच्या रुक्ष पद्धतींसंबंधीचे एखादे पुस्तक बहुतेक बँकर्सनादेखील फारसे आकर्षक किंवा खिळवून ठेवणारे वाटत नाही. वॉल स्ट्रिटवर लेहमन ब्रदर्सने आणलेल्या आर्थिक संकटाच्या वेळी, वित्तीय क्षेत्र इतके उद्ध्वस्त झाले की, त्याने जागतिक अर्थव्यवस्था जवळजवळ नष्ट केली. हा गोंधळ सावरण्यासाठी अनेक सरकारांना कठोर पावले उचलावी लागली आणि त्यांना लक्षात आले की, अगदी अयशस्वी बँकांकडेदेखील अतोनात रोख रक्कम होती. तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक कंपन्यांना पेमेंटमध्ये रस निर्माण झाला आणि त्यातूनच फिनटेक क्रांतीला सुरुवात झाली. त्यातूनच क्रिप्टो करन्सी नावाचे महाकाय अपत्य जन्माला आले, ज्याला बँकांची अजिबात गरज नसल्याचे त्याने दाखवून दिले आहे. क्रिप्टो करन्सी बूम आणि त्याच्या फायद्या - तोट्यांबद्दल एक अंतःस्थ आणि स्पष्ट दृष्टी हे पुस्तक देते.

वित्तीय क्षेत्रातील सर्वात बहुमोल आणि मागणी असलेल्या कंपन्या या बँका नसून पेमेंट संबंधित कंपन्या आहेत. क्रिप्टो चलनांच्या मोहक जगाच्या सामान्य विश्लेषणापेक्षा हे पुस्तक कितीतरी अधिक माहिती देते. आपण सामान्य वाचक, नेहमीच क्रेडिट कार्ड्स, डेबिट कार्ड्स आणि पेटीएम सारख्या संस्थांशी व्यवहार करत असतो. या प्रणाली कशा काम करतात, याविषयी तसेच मोबाईल पेमेंट ॲप्स आणि कार्ड्सच्या रम्य जगाचे एक सुंदर विहंगावलोकन करण्याची संधी हे पुस्तक वाचकाला देते.

(पुस्तकाचे नाव : 'दि पे ऑफ: हाऊ चेंजिंग दि वे वुई पे चेंजेस एव्हरीथिंग', लेखक : जी. लिब्रान्ड आणि नताशा डी तेरां, प्रकाशक : इलियट अँण्ड थॉम्प्सन)

(लेखक हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आहेत.)





# राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी

## कृतज्ञता पर्व विशेष

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व लाखो नव्हे, तर करोडो लोकांत उठून दिसावे असे होते. एवढेच नव्हे, तर त्यांच्यासारखा थोर मानवतावादी राजा शतकातच नव्हे, तर सहस्रकात एखाद दुसराच होत असतो. शिवछत्रपतींबद्दल अनेकदा असे जाणवते की, त्यांच्या चरित्राचा जसजसा अभ्यास करत जावे, तसतसे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे नवनवीन पैलू दृश्यमान होत जातात. छत्रपती शाहू महाराजांबाबतही त्यांच्या चरित्र अभ्यासकांना हाच अनुभव येतो. त्यांच्या बहुरंगी आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या काही ठळक पैलूंचा हा परामर्श.**

# राजर्षी शाहू : लोकराजा

**डॉ. जयसिंगराव पवार**

लोकराजा कोणास म्हणावे? त्याची व्यवच्छेद लक्षणे कोणती? अशा सर्व प्रश्नांची उत्तरे शाहू महाराजांच्या चरित्रात मिळतात. लोकराजा सर्व प्रजाजनांस आपली लेकरे मानतो. त्यांच्या कल्याणाची अहर्निश काळजी वाहतो. विशेषत: दीनदुबळे, वंचित-शोषितांना तो आधार देतो, जगण्याची उमेद निर्माण करतो. ही लोकराजाच्या व्यक्तिमत्त्वाची सर्व व्यवच्छेदक लक्षणे शाहू महाराजांच्या ठिकाणी होती. हीच लक्षणे ध्यानात घेऊन ग. त्र्यं.माडखोलकरांनी त्यांची शिवछत्रपतींशी तुलना करताना म्हटले आहे, छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्याविषयी तत्कालीन शाहिराने आपल्या एका पोवाड्यात,

'शिवाजीच्या तळ्यात पाणी पिती सर्व जीव, नाही भेदभाव!' असे जे उद्‌गार काढले आहेत. ते उद्‌गार त्यांच्या वंशातल्या कोणत्या एका कर्तृत्ववान राजपुरुषाला लागू पडत असतील तर ते छत्रपती शाहू महाराजांनाच!

## भीमकाय तेजस्वी पुरुष

इतिहासातील अजब शरीर सामर्थ्याचा पुरुष म्हणून शाहू महाराजांकडे पाहिले जाते. त्या काळातही त्यांची तशी ख्याती होती. सुप्रसिद्ध साहित्यिक ग.त्र्यं. माडखोलकरांनी महाराजांना अनेकदा पाहिले होते. त्यांनी म्हटले आहे, आपल्या पौराणिक ग्रंथातून वर्णन केलेला भीमकाय, तेजस्वी आणि उग्र, असा पुरुषश्रेष्ठ मी त्यापूर्वी व त्यानंतर आजपर्यंत कधीही पाहिलेला नाही.

नटश्रेष्ठ बाबूराव पेंढारकर हे कोल्हापूरचेच. त्यांनी महाराजांना जवळून पाहिले होते. ते आपल्या आठवणीत लिहितात, शाहू महाराज दिसण्यात ओबडधोबड, पण देहाने दणकट, मनाने मजबूत होते. त्यांचा पोलादी देह सव्वा सहा फूट उंच नि तसाच रुंदही होता. भव्य धिप्पाड शरीरयष्टीप्रमाणेच त्यांचा स्वभावही उदार, उमदा होता... श्यामल वर्ण, भेदक डोळे, भरदार देहयष्टी ह्यामुळे त्यांचे प्रचंड व्यक्तिमत्त्व हजार लोकांत उठून दिसत असे. परका माणूस जवळ येण्यास थोडासा कचरायचाच. त्यांचा आवाजही आभाळ गडगडल्याप्रमाणे भरदार, मोठा होता. कुस्ती आणि शिकार या दोन गोष्टींचा त्यांना दांडगा शौक. त्यांच्या अंगी ताकदही तशीच प्रचंड होती. शिकार करण्यात व घोड्यावर बसण्यात अखिल महाराष्ट्रात त्यांच्या तोडीचा कोणी नव्हता. चार बैलांची मोट एकट्याने ओढण्याचे तर त्यांना काहीच वाटत नसे. सावज अंगावर घेऊन त्याची शिकार करण्याची त्यांना भारी हौस.

आपल्या अफाट शक्तिसामर्थ्यामुळे शाहू महाराज त्या काळात आणि आजही दंतकथा बनून राहिले आहेत. ऐन ज्वानीत कोल्हापूर-महाबळेश्वर हे अंतर एका दमात घोडेस्वारीने काटणारे महाराज, भरधाव मोटार आपल्या अंगातील रगीने रोखून धरणारे महाराज, पागेला आग लागली तेव्हा मजबूत घोडी खांद्यावर घेऊन त्यांना आगीतून बाहेर काढणारे महाराज, खवळलेल्या वाघावर नि:शस्त्र चाल करून केवळ त्याचा गळा घोटून ठार मारणारे महाराज, कुस्तीच्या आखाड्यात पैलवान नाठाळपणा करून लागले, तर त्यांच्या जांघेत हात घालून त्यांना अलगद उचलून बाजूला ठेवणारे महाराज, क्लोरोफॉर्म न घेताच दीड-दोन तासांचे टॉन्सिलचे ऑपरेशन डॉक्टरकडून करवून घेणारे महाराज, अशा महाराजांच्या अचाट शक्तीच्या कथा त्यांच्या चरित्रातही नोंदल्या गेल्या आहेत. महाराजांच्या या कृत्यांनी



राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राज्यारोहण समारंभाचे छायाचित्र.

त्या काळातील लोकही अचंबित होत असत.

## साधी राहणी

शंभर वर्षांपूर्वीचे हिंदुस्थानातील राजेरजवाडे म्हणजे आपल्या वैभवाचे व श्रीमंतीचे प्रदर्शन करणारे लोक समजले जात. शाहू महाराजांना अशा प्रदर्शनाचा तिटकारा होता. सामान्य माणसांबद्दल त्यांना अंतःकरणापासून प्रेम असल्याने आपली राहणीही सामान्य माणसांप्रमाणेच असली पाहिजे, असे त्यांना वाटायचे. साध्या राहणीमुळे अर्थातच ते सर्वसामान्य रयत लोकांत, जंगलपाड्यातील धनगर लोकांत अथवा गावकुसाबाहेरच्या महारवाड्यातील अस्पृश्य समजले गेलेल्या समाजात सहजासहजी मिसळत.

बाबूराव पेंढारकर म्हणतात, शिकारीला गेल्यावर ते शेतकरी बांधवात हटकून मिसळत. त्यांची कण्याकोंड्याची भाकर खात आणि गावच्या तरुण पोरांना तालमीत जमवून त्यांच्याशी दोन हातही करत. इंग्रजी पोशाख, इंग्रजी खेळ व इंग्रजी चालीरिती यापासून ते कटाक्षाने नेहमी दूरच राहिले. त्यांची राहणी अतिशय साधी होती. लांब सैलसा मलमलचा सदरा, साधी तुमान किंवा लुंगी आणि भगवा फेटा हा त्यांचा पोशाख, बसायला घोड्यांचा साधा खटारा, त्याला खडखडा म्हणत. त्यांचे जेवणसुद्धा साधे असे. तोंडी लावायला लसणाची चटणी असली की, झाले खमंग जेवण. भाकरी व कांद्याचे पिठले त्यांना फार आवडायचे. अधूनमधून ते मांसाहार करत, पण मद्याला मात्र त्यांनी चुकूनही कधी स्पर्श केला नाही.

## संन्यस्त जीवन

१९१८ साली त्यांच्यावर पुत्राच्या-प्रिन्स शिवाजींच्या अपघाती मृत्यूचे संकट कोसळले. तेव्हापासून त्यांनी राजवाड्याचा व तेथील राजवैभवाचा त्याग करून कोल्हापूर बाहेरच्या सोनतळी कॅम्पवरच आपला निवास ठेवला. हा कॅम्प म्हणजे एक आश्रमच होता. तेथे ते एखाद्या विरक्त साधूप्रमाणे राहू लागले. बैठकीच्या ठिकाणी काथ्यांनी विणलेली तीन-चार खाटली ठेवलेली असत. त्यावर सांबरांची सात-आठ कातडी एकावर एक घालून गादीवजा बैठक तयार केलेली असे. त्या एकावर महाराज बसत आणि बाकीच्या खाटल्यांवर त्यांचे आवडते चित्ते पहुडलेले असत. भेटावयास येणाऱ्या व्यक्तींसाठी समोर एखादा कोच व चार-सहा खुर्च्या ठेवलेल्या असत. पावसाळा सोडून इतर काळ महाराज उघड्या जागेत, आकाशाच्या छताखाली, खाटल्यावरच झोपत. पहाटे उठून थंडगार पाण्याने स्नान करून दैनंदिन कामाची सुरुवात होई.

## प्लेटोच्या कल्पनेतील तत्त्वज्ञ राजा

शाहू महाराजांची साधी राहणी, साधी बोली पाहून अनेकांना ते युरोपियन संस्कृती व ज्ञान यांचा परिचय नसणारे अशिक्षित गृहस्थ वाटत. वास्तविक त्यांना शिक्षण देणारे गोखले, सबनीस, फ्रेजर आदी व्यक्ती निष्णात शिक्षक व पंडित होते. त्यामुळे त्यांचा शिक्षणाचा पाया मजबूत झाला होता. इंग्रजी साहित्य, सामाजिक शास्त्रे, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. ते उत्तम अस्खलित इंग्रजी बोलत. पण केव्हा तरी भेटणाऱ्या परक्या इसमास महाराज राकट व अडाणी वाटत. प्रबोधनकार ठाकरे यांनी म्हटले आहे की, सुशिक्षितपणाचा टेंभा मिरवणारी पांढरपेशी मंडळी महाराजांच्या भेटीस गेली की, ते जाणूनबुजून हेंगाड्यासारखे वागत व मुद्दाम हेंगाडी भाषा बोलत, पण याच हेंगाडी रूपाच्या मागे अनेक गंभीर विषयांचा अभ्यास केलेली केवढी व्यासंगी व्यक्ती लपलेली आहे, याची फक्त त्यांच्याशी वैचारिक व तात्त्विक चर्चा करणाऱ्या विद्वानासच प्रचिती येत असे.

एक मोठे अभ्यासक पत्रकार प्रबोधनकार ठाकरे महाराजांना भेटले व या भेटीत त्यांनी आपण 'भिक्षुकशाहीचे बंड' हा ग्रंथ लिहित असल्याचे सांगितल्यावर, महाराजांनी चटकन त्यांना सॅव्हेल व इंगरसॉल या पाश्चात्त्य विद्वानांचे ग्रंथ वाचले का, म्हणून विचारले. प्रबोधनकार आपल्या आठवणीत सांगतात, किती तरी संदर्भ ग्रंथांची नावे महाराज भडाभड सुचवत होते आणि कशात काय विषय आहे, यावर जिव्हाळ्याचे प्रवचन करत होते. या क्षणाला प्रथमच महाराजांच्या व्यापक ज्ञानसंग्रहाचा मला साक्षात्कार झाला. फार काय, पण कित्येक पुस्तकांतले काही महत्त्वाचे इंग्लिश परिच्छेद त्यांनी मला पाठ म्हणून दाखवले. वरवर पाहणाऱ्यांना महाराज अडाणी नि हेंगाडे वाटले, तरी अंतरंगाचा, मुख्यत्वे त्यांच्या परिपक्व ज्ञानाचा, मागमूस इतरेजनांना सहसा लागतच नसे. आज तो मला लागला नि मी अगदी चाट पडलो.

अशाच प्रकारची एक आठवण तोफखाने यांनी सांगितली आहे. प्रोफेसर आठवले हे महात्मा गांधींच्या आश्रमातील त्यांचे एक सहकारी आणि संस्कृतचे प्रकांड पंडित होते. ते कोल्हापुरी आल्यानंतर तोफखान्यांनी त्यांची महाराजांशी भेट घडवून आणली. ही भेट प्रदीर्घ होऊन उभयतांनी अनेक विषयांवर गहन चर्चा केली. त्यामध्ये दिसून आलेल्या महाराजांच्या अभ्यासू वृत्तीने प्रोफेसर साहेब अत्यंत प्रभावित झाले. वर्ध्यास गेल्यानंतर त्यांनी तोफखान्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, तुमच्यामुळे मी अशा एका राजास भेटू शकलो की, ज्याला दिलेला महाराज हा किताब सार्थ ठरला आहे! खरोखरच तो एक महाराजा आहे. अगदी प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजाच्या (Philosopher King) कल्पनेत बसणारा!

महात्मा गांधींच्या एका विद्वान सहकाऱ्यास कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात महान तत्त्वज्ञ प्लेटोच्या संकल्पनेतील आदर्श राजाचे रूप दिसावे, यासारखा एखाद्या राजाचा ज्ञानाच्या क्षेत्रात अन्य कोणता गौरव असू शकेल!

## धर्मावर श्रद्धा, पण अंधश्रद्धेस नकार

शाहू महाराजांची ईश्वरावर व धर्मावर श्रद्धा होती. तसेच त्यांनी आर्य समाजाचे अनुयायित्व स्वीकारले असले, तरी मूर्तिपूजेचा त्याग केला नव्हता. संस्थानातील

देवदेवतांचे ते श्रद्धेने दर्शन घेत. हिंदूंच्या देवळांप्रमाणे मुस्लिमांच्या दर्ग्यालाही जात, राजवाड्यात व संस्थानात पूर्वापार चालू असलेले धर्मविधी ते निष्ठेने पार पाडत. संस्थानातील महालक्ष्मी, तुळजाभवानी, टेंबलाई, जोतिबा इत्यादी देवदेवतांचे उत्सव व यात्रा मोठ्या शाही वैभवाने साजरे केले जात. राजा म्हणून प्रजेप्रति आपले ते कर्तव्यच आहे, अशी त्यामागची त्यांची भूमिका होती. त्यात ते कसूर करत नसत.

असे जरी असले तरी धार्मिक कर्मकांड म्हणजे धर्म अशी त्यांची भावना नव्हती. माणसाने माणसाशी मनुष्यत्वाच्या भावनेने, बंधुत्वाच्या भावनेने वर्तन ठेवणे, म्हणजे धर्म अशी त्यांच्या अंतरीची श्रद्धा होती. या श्रद्धेमुळेच त्यांनी अंधश्रद्धेला थारा दिला नाही. समुद्रपर्यटन केले की, धर्म बुडतो ह्या हास्यास्पद अंधश्रद्धा तत्कालीन वरिष्ठ समाजाच्या इतक्या हाडीमासी भिनल्या होत्या की, सात समुद्र पार करून हजारो मैलांवरून गोरे लोक इकडे आले व त्यांनी आमच्या गळ्यात गुलामीचा खोडा घातला, ही वस्तुस्थितीसुद्धा त्यांना शुद्धीवर आणत नव्हती.

महाराज जेव्हा १९०२ मध्ये इंग्लंडहून मायदेशी परतले तेव्हा त्यांनी सिंधुबंदीचा धार्मिक दंडक तोडल्याबद्दल प्रायश्चित घ्यावे व मगच महालक्ष्मीचे दर्शन घ्यावे, अशी धर्माज्ञा कोल्हापुरातील सनातनी ब्राह्मणांनी काढली. विशेष म्हणजे मराठ्यांमधील काही सनातनी मंडळींनी त्या धर्माज्ञेस माना डोलावल्या. तथापि बहुसंख्य मराठे महाराजांच्या बाजूने उभे राहिले. खुद्द महाराजांनी ती धर्माज्ञा धुडकावून लावून देवीचे दर्शन घेतले. ही गोष्ट त्या काळात सामान्य नव्हती. त्याकाळी भल्याभल्यांना ब्रह्मवर्गाच्या आज्ञेचे पालन करावे लागले होते. त्यातून बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, लोकमान्य टिळक यांसारख्या विभूतींचीही सुटका झालेली नव्हती.

## स्व-संस्कृती, स्व-भाषेचा अभिमान

विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात पाश्चात्त्य लोक सर्व जगात श्रेष्ठ होते. सामाजिक शास्त्रे, तत्वज्ञान, राजनीती आदी प्रांतांतही त्यांनी मोठी प्रगती केली होती. पाश्चात्त्यांचे अनुकरण करून जपानी लोकांप्रमाणे आपण आपली सुधारणा केली पाहिजे, असे शाहू महाराजांना वाटे, पण असे करत असताना, आपल्या सांस्कृतिक परंपरांकडे पाठ करून पाश्चात्त्यांच्या संस्कृतीचे सरसकट अंधानुकरण करावे, असे त्यांना वाटत नसे. त्या काळी संस्थानिकांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी युरोपियन



राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राज्यारोहणावेळचे छायाचित्र.

गव्हर्नेस ठेवण्याची पद्धती होती. या गव्हर्नेसकडून राजकुमार व राजकन्या यांना पाश्चात्य शिक्षण व संस्कृतीचे ज्ञान दिले जाई, पण याचबरोबर जर त्यांना भारतीय शिक्षण व संस्कृतीचे ज्ञान देण्याची व्यवस्था केली गेली नाही, तर ही मुले आपल्या संस्कृतीची, धर्माची व पर्यायाने देशबांधवांची हेटाळणी करणारी निर्माण होतात आणि हा पाश्चात्त्य शिक्षणाचा सर्वांत धोकेबाज परिणाम आहे, असे महाराजांना वाटत असे. खुद्द महाराजांना दोन्ही पद्धतीचे शिक्षण दिले गेले होते व त्याचा त्यांच्या आयुष्यात किती उपयोग होतो आहे, याचा अनुभव ते घेत होते. संस्थानिकांच्या मुलांसाठीच नव्हे, तर मुलींसाठी अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. एवढेच नव्हे, तर मुलींच्यासाठी त्याची अधिक गरज आहे, असे त्यांचे ठाम मत होते.

शाहू महाराजांना माय मराठीचाही मोठा अभिमान होता. इंग्लंडच्या दौऱ्यावर असताना या गोष्टीचा प्रत्यय त्यांच्या सोबतच्या लोकांना व इंग्रज यजमानांना आला. केंब्रिज विद्यापीठाने एल.एल.डी. पदवीने त्यांचा गौरव केल्यावर पुढे दोनच दिवसांनी महाराजांनी ग्वाल्हेरचे महाराज, आगाखान, सर जमशेटजी जीजीभाई आदी बड्या मंडळींसह विंचेस्टर ह्या प्राचीन नगरीस भेट दिली. विंचेस्टर ही सॅक्सन लोकांची राजधानी म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. तेथील विंचेस्टर कॉलेजात या हिंदी पाहुण्यांचा भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी पाहुण्यांचे स्वागत इंग्रजीतून न करता लॅटिन भाषेतून केले गेले. एक प्रकारे विंचेस्टरमधील इंग्रज लोकांनी आपल्या प्राचीन भाषेविषयीच्या व संस्कृतीविषयीच्या अभिमानानेच ते प्रदर्शन केले होते. चाणाक्ष महाराजांच्या हे लक्षात येताच त्यांनी उत्तम इंग्रजी येत असूनही त्यांनी मराठीत भाषण केले. महाराजांच्या पित्यांचे स्नेही विल्यम लीवॉर्नर त्यांच्यासोबत होते. त्यांना मराठी भाषा अवगत होती. त्यांनी या मराठी भाषणाच्या इंग्रजीत अनुवाद करून उपस्थितांना सांगितला. इंग्रजांनी हिंदी पाहुण्यासमोर आपल्या प्राचीन बोलीच्या प्रेमाचे प्रदर्शन केले, तर महाराजांनी त्या सॅक्सनांच्या वंशजांसमोर ज्ञानदेव-तुकारामांच्या बोलीमध्ये त्यांना प्रत्युत्तर दिले.

## शोधक वृत्ती, प्रयोगशीलतेचा संगम

शाहू महाराजांच्या कारकिर्दीकडे दृष्टिक्षेप टाकला. तर असे दिसून येते की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शोधक वृत्ती व प्रयोगशीलता या दोन गुणांचा विलक्षण संगम झाला होता. त्यामुळे त्यांनी मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत नवनवीन प्रयोग केले. कला, क्रीडा, उद्योग, कृषी एवढेच नव्हे, तर समाजशास्त्र यांसारख्या अनेक विषयांत त्यांनी आपल्या प्रयोगशीलतेचे

दर्शन घडवले. त्याची काही मोजकी उदाहरणे सांगता येतील.

महाजारांनी होमिओपॅथी हे शास्त्र काय आहे. याची केवळ माहिती करून घेतली नाही, तर महाराष्ट्रातील पहिला सार्वजनिक होमिओपॅथीचा दवाखाना त्यांनी कोल्हापुरात स्थापन केला. युरोपच्या दौऱ्यावर असताना रोममधील आखाडे व नाट्यगृहे त्यांनी केवळ प्राचीन प्रेक्षणीय वास्तू म्हणून पाहिल्या असे नाही, तर तसा आखाडा व नाट्यगृह अशा वास्तू कोल्हापुरात निर्माण केल्या. युरोपातील धरणे त्यांनी पाहिली आणि त्याप्रमाणे आपल्या संस्थानात राधानगरी धरणासारखा मोठा प्रकल्प हाती घेतला. शेती, उद्योगधंदे, कारखानदारी आदी क्षेत्रांत अनेक नवे उपक्रम सुरू केले.

संस्थानच्या जंगलात हत्तींची पैदास, डोंगर उतारावर चहा-कॉफीची व रबराची लागवड, मधुमक्षिकापालन, निरनिराळ्या प्रकारच्या सुगंधी द्रव्यांचे उत्पादन असे अनेक नवनवीन उपक्रम त्यांनी राबवले. पाळीव प्राण्यांचे संकर घडवून त्यांनी नवीन संकर जाती निर्माण करण्याचे प्रयोग केले. त्यांची ही प्रयोगशील वृत्ती सामाजिक क्षेत्रातही दिसून आली. शिक्षणाच्या क्षेत्रात वतनी शिक्षक नेमणे, प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन करणे, धार्मिक क्षेत्रात मराठा पुरोहित आणि क्षात्र जगद्गुरु निर्माण करणे या गोष्टी म्हणजे त्यांचे विविध सामाजिक प्रयोगच होते. त्यापैकी बरेच यशस्वी झाले, तर काही अयशस्वी झाले, पण त्या अपयशातूनही त्यांनी यशाचे मार्ग निर्माण केले.

## लोकांमध्ये रमणारा राजा

शाहू छत्रपती हा एक मुलखावेगळा राजा होता आणि म्हणूनच तो लोकराजा होऊ शकला. हा राजा शेतकऱ्यांमध्ये, कष्टकऱ्यांमध्ये, दलित पतितांमध्ये, रमत असे. त्यांच्यापैकीच एक होऊन जात असे. मी तुमच्यापैकीच एक आहे. मला मजूर समजा अगर शेतकरी समजा, असे उद्‌गार तो या लोकांच्या मेळाव्यात काढत असे. असे उद्‌गार हे सभा जिंकण्यासाठीचे उद्‌गार नसत, तर तो एक समतावादी विभूतीच्या हृदयस्थ झालेल्या भावनांचा प्रामाणिक आविष्कार असे.

मुंबईतील कामगार मेळाव्यात महाराजांनी म्हटले होते, मी कोल्हापूरच्या राजपदावर असतानाही शिपाई, शेतकरी किंवा मजूर म्हणवून घेण्यात मला अभिमान वाटतो. माझी जनक आई, दत्तक आई, दत्तक वडील, असे शेतकरी वर्गातीलच होते. हलक्या दर्जाच्या व अशिक्षित लोकांशी सहवास ठेवणे बरे नाही, अशी पुष्कळांची समजूत आहे. मलाही तसा उपदेश होत असे, परंतु ज्या शेतकरी व मजूर वर्गात माझे कूळ वाढले, त्यांच्याविषयी प्रेम व अगत्य हे जन्मसिद्ध असल्याने अशा शिकवण्याचा माझ्यावर परिणाम होणार नाही. कारण माझ्या हाडीमासी शिपाईगिरी, शेतकरी यांचे रक्त खेळत आहे. म्हणून मला आपल्यात मिसळायला आनंद वाटतो. एका थोर इंग्रज साधू पुरुषाने म्हटले आहे की, राजवाड्यापेक्षा गरिबांच्या झोपडीत सद्‌गुण जास्त सापडतात. माझाही अनुभव तसाच आहे. इमानीपणा, बंधुप्रेम, देशप्रीती, राजनिष्ठा, मत्सराचा अभाव असे अनेक सद्‌गुण मला आपल्या ठायी दिसतात. म्हणून आपल्याविषयी माझ्या मनात फार पूज्यबुद्धी आहे. आपणही मला आपणापैकीच एक समजावे असे आपणांकडे माझे मागणे आहे.



रयतेत सामील होत कुस्त्या पाहताना राजर्षी छत्रपती शाहू महाराज.




छत्रपती स्वत:ला शेतकरी अथवा मजूर म्हणवून घेणे व त्यात अभिमान बाळगणे, ही काही सामान्य गोष्ट नव्हती, असे पूर्वी कोणा राजाने म्हटले नव्हते अथवा त्याप्रमाणे कृती केली नव्हती. माझ्यासारखा कुठलाही राजा गरिबांमध्ये मिसळला नाही. असे त्यांनी एका ठिकाणी अभिमानाने उद्‌गार काढले आहेत. ही काही त्यांची आत्मस्तुती नव्हती, तर ती वस्तुस्थिती होती.

या वस्तुस्थितीमुळेच शाहूरायांची जनमानसामध्ये लोकराजा अशी प्रतिमा निर्माण झाली. कधी ही प्रतिमा जंगलातील धनगराच्या झोपडीतील अंबीलकण्या खाणाऱ्या राजाची असे. कधी ती शिवारातील शेतकऱ्याच्या खोपटात अथवा बेरडाच्या वसतीवर चटणीभाकर खाणाऱ्या राजाची असे, कधी ती आपल्या खडखड्यात अस्पृश्यांना घेऊन गावभर फिरणाऱ्या राजाची असे, तर कधी ती फासेपारध्यांना आपल्या पंगतीस घेऊन त्यांच्याबरोबर सहभोजन करणाऱ्या राजाची असे, अशा नाना प्रकारच्या प्रतिमा आपणांस शाहू चरित्रात वावरताना दिसतात. या प्रतिमा अनेक असल्या तरी त्या मूळच्या लोकराजा प्रतिमेचीच प्रतिबिंबे होती, हे लक्षात घेतले पाहिजे.

## राजर्षी पदवीने गौरव

मराठी जगतात शाहू महाराजांचे स्थान अनन्यसाधारण होते. कारण ते आद्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीवर विराजमान झालेले त्यांचे वंशज होते. त्यांच्या दर्शनाने आम मराठी जनतेला शिवछत्रपतींचे स्मरण होते, तसेच त्यांच्याशी तुलना करण्याचा मोह होणे, स्वाभाविकच होते. शिवछत्रपतींचे वारसदार या नात्याने ते महाराष्ट्राचे स्वाभाविक नेते मानले गेले. तथापि, या नेतृत्वाचा महाराजांनी स्वतःच्या फायद्यासाठी उपयोग केला नाही. या नेतृत्वाचा फायदा अखिल मागासलेल्या समाजाला त्यांनी करून दिला.

महाराजांच्या या कामगिरीने मूल्यमापन त्यांच्या हयातीतील आणि त्यांच्यानंतरही अनेक विचारवंतांनी, अभ्यासकांनी तसेच विविध संस्थानी केलेले आढळते. या सर्वांमध्ये उत्तर प्रदेशातील कुर्मी क्षत्रिय समाजाने त्यांच्या कामगिरीचे केलेले मुल्यमापन अधिक गौरवशाली ठरले आहे.

१९१९ मध्ये अखिल भारतील कुर्मी क्षत्रिय समाजाकडून कानपूरच्या परिषदेत महाराजांचा राजर्षी पदवी बहाल करून मोठा गौरव केला गेला. रामायण महाभारतात काही जनक, श्रीकृष्ण, भीष्म असे अनेक राजर्षी होऊन गेले, पण त्यानंतरच्या हजारो वर्षांच्या प्रदीर्घ कालानंतर 'राजर्षी' पदास पोहोचले ते कोल्हापूरचे छत्रपती शाहू. क्षत्रिय असून जो ज्ञानी व विचारवंत असतो, जो आपल्या विचार आचारांचे आदर्श समाजांसमोर ठेवून त्याची दिशा बदलून टाकतो तो राजर्षी. तो एका परीने नव्या युगाचा प्रणेताच असतो. अशी आशयसंपन्न बिरुदावली कुर्मी क्षत्रिय समाजाने देऊन शाहू महाराजांचा गौरव करावा, यात त्या समाजाच्या सामाजिक जाणिवेची प्रगल्भता आणि परिपक्वता तर दिसतेच, पण त्या काळी अखिल हिंदुस्थानातील मागासलेला समाज महाराजांकडे कोणत्या दृष्टीने व अपेक्षेने पाहत होता, याचीही कल्पना येऊन जाते.

## राष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन करून स्वातंत्र्य पैदा केले, त्यांनाच राष्ट्रपुरुष म्हणणे अथवा त्यांनीच आपल्या राष्ट्राची जडणघडण केली, असे म्हणणे म्हणजे इतिहासाचे मोठे अज्ञान ठरेल. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे लढले ते राष्ट्रपुरुष खरेच, पण जे देशातील ९५ टक्के मागासलेल्या समाजाच्या उद्धारासाठी खपले, त्यांच्या सामाजिक समतेच्या व न्यायाच्या हक्कांसाठी लढले, ते राष्ट्रपुरुष




**पट्टेदार वाघाची शिकार करणाऱ्या आपल्या श्वानांसोबत राजर्षी शाहू महाराज.**

नव्हेत काय? राष्ट्र केवळ राजकीय स्वातंत्र्याने घडत नाही. त्या राष्ट्रांना समाज सामाजिक समतेच्या पायावर उभा करावा लागतो. त्यासाठी सामाजिक ऐक्य व बंधुभाव यांचीच गरज असते. त्यासाठी अहर्निश लढा लागतो. फुले-शाहू-आंबेडकर या त्रयींनी असा लढा दिला.

आपण सर्व हिंदी राष्ट्राचे घटकावयव असून, समसमान हक्क असणारी बरोबरीची भावंडे आहोत, ही राष्ट्रवादी समतेची भावना महाराजांनी अनेक सभा परिषदांमधून जाहीरपणे मांडली होती. नागपूरच्या बहिष्कृत समाजाच्या परिषदेत महाराजांनी म्हटले होते, 'आम्ही सर्व हिंदी आहोत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्मांची बाब महत्त्वाची असेल, पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये', महाराज पुढे म्हणतात, 'देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणे, जनी जनार्दन शोधणे व पाहणे हाच खरा धर्म आहे'.

राष्ट्र म्हणजे त्यात राहणारी माणसे. ती शीलवान आणि बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या सामर्थ्यशाली झाली पाहिजेत. त्यासाठी त्या राष्ट्रातील नागरिकांचे राष्ट्रीय शील निर्माण व्हायला हवे. हा विचार मांडताना महाराजांनी म्हटले आहे, 'समाजाची नीतिमत्ता वाढवणे, हे सामाजिक सुधारणेचे एक महत्त्वाचे अंग आहे. वाईट रीतिभाती व धर्मभोळेपणा यांच्या योगाने आमच्यामध्ये मद्यपान, बालविवाह, जुलमाचे वैधव्य, देवास मुली वाहणे, असे घातक प्रकार रूढ होऊन, त्यापासून शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवनती झाली आहे. ही अवनती दूर करण्यास आपण उपाययोजना करावी. याबाबतीत शील बनवणे हेच मुख्य कर्तव्य आहे. शीलवान नागरिकांशिवाय राष्ट्र बनणे अगर उदयास येणे, या गोष्टी शक्यच नाहीत. शारीरिक उन्नतीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे. परंतु केवळ शारीरिक शौर्य कितीही अंगात असले तरी नीतिमत्तेची अवनती झाल्याबरोबरच रोमसारखी बलाढ्य राष्ट्रेही कशी रसातळाला गेली, हे आपण विसरता कामा नये.'

## सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ

हिंदुस्थानातील ब्रिटिशांची साम्राज्यसत्ता ही काही चिरकालीन राहणार नाही. भावी काळात तिला जावेच लागेल आणि त्याबरोबरच हिंदी संस्थानिकांच्याही सत्ता लयाला जातील. याची पक्की जाणीव शाहू महाराजांना होती. ब्रिटिश गेल्यावर या देशात लोकसत्ता स्थापन होईल. पण या लोकसत्तेची फळे मागासवर्गीयांच्या हाती पडतील की नाही, याबद्दल त्यांना शंका होती. कारण त्या काळी हप्त्याहप्त्याने मिळणारे, स्वराज्याचे हक्क वरच्या वरिष्ठ वर्गाच्या हाती पडून त्याची स्वराज्याच्या

नावाखाली स्वदेशी ब्युरोक्रसी निर्माण होण्याचा आणि हे मागासलेले वर्ग तसेच उपेक्षित राहण्याचा धोका महाराजांना दिसत होता. आणि म्हणूनच टिळकपक्षीयांच्या स्वराज्य चळवळीस त्यांचा विरोध होता. हा त्यांचा विरोध स्वराज्याचे हक्क वरच्या वर वरिष्ठ वर्गाच्या हाती पडून त्याची स्वराज्याच्या नावाखाली स्वदेशी ब्युरोक्रसी निर्माण होण्याचा आणि हे मागासलेले वर्ग तसेच उपेक्षित राहण्याचा धोका महाराजांना दिसत होता. म्हणूनच शाहू महाराजांनी आपल्या चळवळीत राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाहीस अधिक महत्त्वाचे स्थान दिले. अशा सामाजिक लोकशाहीच्या निर्मितीशिवाय राजकीय लोकशाहीच्या प्रस्थापनेस मागासलेल्या वर्गाच्या दृष्टीने काही अर्थ राहणार नव्हता आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या दलितांच्या उदयोन्मुख नेत्याने शाहू महाराजांचा गौरव करताना त्यांना 'सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ' अशी बिरुदावली उपयोजित केली होती.

सामाजिक समता व न्याय यांचे अधिष्ठान असलेल्या सामाजिक लोकशाहीचा पुरस्कार करणारे शाहू महाराज हे खरे लोकशाहीचे उपासक होते, असे मद्रासच्या ब्राह्मणेतर चळवळीच्या सर त्यागराज चेट्टी यांनीही म्हटले होते. महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी त्याचे वर्णन लोकशाहीवाद्यांमधील लोकशाहीवादी असे केले आहे. हिंदुस्थानामधील एका संस्थानिकाचा लोकशाहीचा आधारस्तंभ, लोकशाहीचा पुरस्कर्ता, लोकशाहीचा उपासक अशाप्रकारे गौरव होणे, ही पारतंत्र्याच्या काळातील हिंदुस्थानाच्या इतिहासातील एक असामान्य घटना होती.

## विषयपत्रिका एकच

फूले-शाहू-आंबेडकर यांचे जीवितकार्य आणि त्याअनुषंगाने त्यांचे विचार यांचे प्रकटीकरण त्यांच्या त्यांच्या कालखंडात वेगवेगळ्या स्वरूपात झाले असले, तरी त्यांच्या कार्यातील सूत्र एकच होते. या सर्व थोर समाज क्रांतिकारांचा वैचारिक आकृतिबंध एकच होता आणि या आकृतिबंधातील विषयपत्रिका ही एकच होती. या विषय पत्रिकेवरील कार्यक्रम स्थलकाल परिस्थितीपरत्वे काहीसे भिन्नभिन्न भासले तरी त्यांच्या मुळाशी एकाच उद्दिष्टाचे सूत्र होते आणि ते म्हणजे सामाजिक समता व न्याय यावर अधिष्ठित असा शोषणमुक्त समाज निर्माण करणे, वरिष्ठ व बलिष्ठ वर्गाने लादलेल्या मानसिक व बौद्धिक गुलामगिरीतून मागासलेल्या वर्गाची मुक्तता करणे, त्यासाठी त्या वर्गास सामाजिक बंडास उद्युक्त करणे.

महात्मा फुले काय, महर्षी शिंदे काय, डॉ.आंबेडकर काय अथवा कर्मवीर भाऊराव पाटील काय या सर्वांची विषयपत्रिका एक असणे, यात नवल काहीच नव्हते. कारण ते सर्वजण मागासवर्गीयांचे प्रतिनिधी होते, परंतु राजकुलोत्पन्न शाहू महाराजांची ही विषयपत्रिका त्यांच्यासारखीच असावी, हा २०व्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील एक चमत्कार मानावा लागेल.

खरोखरच बालपणापासून राजवैभवात वाढलेल्या आणि छत्रपतींच्या गादींवर विराजमान झालेल्या या राजास समाजक्रांतींचा झेंडा खांद्यावर घेण्याची काय आवश्यकता होती? त्यांच्या आयुष्यात घडलेल्या वेदोक्त प्रकरणानंतर त्यांच्यामधील अन्यायाविरुद्ध लढणारी बंडखोर वृत्ती जागी झाली हे खरे, पण त्यावेळी त्यांनी तयार केलेली विषयपत्रिका वेदोक्तातील ब्रह्मवृंदांच्या शरणागतीने व त्यांच्या विजयाने अंतर्धान पावावयास हवी होती. पण तसे झालेले दिसत नाही. उलट त्यांच्या विषयपत्रिकेवर मागासवर्गीयांच्या आरक्षणापासून अस्पृश्यता निवारणापर्यंत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणापासून क्षात्रजगद्‌गुरूंच्या निर्मितीपर्यंतच्या नानाविध विषयांची यादी वाढत गेल्याचे दिसून येते.

वेदोक्त प्रकरणात खांद्यावर घेतलेला समाजक्रांतीचा झेंडा महाराजांनी शेवटच्या श्वासापर्यंत खाली ठेवला नाही. सर्व महाराष्ट्रात त्यांच्या शत्रूंचे गोट विखुरलेले होते. या गोटांतून त्यांच्यावर व त्यांच्या राजपरिवारावर टीकेचे शरसंधान होत होते. महाराजांचे चारित्र्यहनन करण्यापर्यंत विरोधकांनी मजल मारली होती. त्यांना या जगातून नाहीसे करण्याच्याही धमक्या




दिल्या जात होत्या. हे सर्व हाती घेतलेल्या जीवितकार्यासाठी महाराज सहन करत होते.

उंच आणि विशाल वटवृक्षांची उंची व विशालत्व नजरेत साठवण्यासाठी त्याच्यापासून काही अंतर दूर जाऊन राहावे लागते. तसेच काहीसे महापुरुषांबद्दल असते. त्यांच्या कार्याची उंची व महत्ता समजण्यासाठी काही काळाचे अंतर जावे लागते. हाच दृष्टिकोन गुरुवर्य फ्रेझर साहेबांनी शाहू महाराजांच्या निधनानंतर अवघ्या दोन वर्षांनी मांडला आहे. ते म्हणतात, आपण शाहू महाराजांच्या काळाच्या इतके जवळ आहोत की, त्यांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन आपल्याला करता येणे शक्य नाही. मात्र विकासमान भारतातील कोणताही इतिहासकार शाहू महाराजांच्या जीवनकार्याकडे दुर्लक्ष करू शकणार नाही, एवढे मात्र खात्रीने सांगता येते. संबंधित संघर्षातील कडवटपणा जेव्हा कालांतराने नाहीसा झालेला असेल तेव्हा प्रत्येक स्तरावरील भारतीय नागरिक एक लोकोत्तर पुरुष म्हणून शाहू महाराजांची स्मृती अभिमानाने आपल्या मनात जतन करून ठेवील, यात शंका वाटत नाही.

फ्रेझर साहेबांची भविष्यवाणी खरी ठरली आहे. आज महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून शाहू महाराजांची कीर्ती आसेतुहिमाचल पसरत चालली आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात एक लोकोत्तर राष्ट्रपुरुष म्हणून त्यांना अढळ स्थान प्राप्त झाले आहे.

**(महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे प्रकाशित 'राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य' या चरित्र ग्रंथातील 'व्यक्तिमत्त्व व कामगिरी' या प्रकरणाचा संपादित भाग.)**

**केवळ कोल्हापूर संस्थानातीलच नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्रातील दलित, पीडित, शोषित अशा सर्वहारा वर्गाला सन्मानाने आणि सुखाचे जीवन जगता यावे म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या हाती २ एप्रिल १८९४ रोजी राज्यकारभार आल्यापासून ते अविरतपणे धडपडताना दिसतात. जो राबतो त्याला पोटभर खाण्यास आणि अंगभर वस्त्र मिळालेच पाहिजे नव्हे, तो त्यांचा मूलभूत हक्क आहे, ही भूमिका राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आयुष्यभर, वेळप्रसंगी आपले सिंहासन पणाला लावून जोपासलेली दिसते.**

# कामगारांचा कैवारी

**डॉ. रमेश जाधव**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्वत:ला अगदी अभिमानाने शेतकरी किंवा मजूर कष्टकरी म्हणवून घेण्यात धन्यता मानताना आढळून येतात. कानपूर येथील अखिल भारतीय कुर्मी क्षत्रियांच्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना १९ एप्रिल १९१९ रोजी ते म्हणाले होते, मी तुमच्यापैकीच आहे. मला मजूर समजा अगर शेतरी समजा. माझे वाडवडील हाच धंदा करत होते. जे काम माझे पूर्वज करत होते तेच काम करणाऱ्या लोकांचा अध्यक्ष होण्याकरिता मला आज बोलवले आहे. याबद्दल मला अत्यानंद होत आहे.

घाम गाळून आपला उदरनिर्वाह चालवणाऱ्या वर्गाबद्दल अपार करुणा आणि जिव्हाळा असणाऱ्या शाहू राजेंच्या उक्ती आणि कृतीमध्ये नेहमीच कमालीची एकवाक्यता दिसून येते. त्यामुळे अगदी प्रथमपासून हा राजा साधे जीवन जगलेला पाहावयास मिळतो. राजवाड्यापेक्षा दीन दुर्बलांच्या झोपड्यांमध्ये शाहू महाराजांचा जीव अधिक गुंतलेला दिसतो. दरबारामधल्या मानकऱ्यांपेक्षा राबणाऱ्या मजुरांची सर्वहारांची काळजी घेणे, राबणाऱ्याचे जीवन अधिक सुखासमाधानाचे करणे यामध्ये शाहू महाराजांना अधिक स्वारस्य होते. या संदर्भात त्यांच्या जीवनातील काही प्रसंग आणि त्यांनी कष्टकऱ्यांसाठी केलेले काही कायदे केवळ प्रातिनिधिक उदाहरणे म्हणून या ठिकाणी लक्षात घेता येतील.

## मजूरवर्गाच्या हितासाठी प्रयत्नरत

कोल्हापूर संस्थान आणि आजूबाजूच्या प्रदेशात गुऱ्हाळमध्ये उसाचा रस काढण्यासाठी लोखंडी घाणा वापरला जात होता. अनेकदा त्यावर काम करणाऱ्या मजुरांचे अपघात होऊन त्यांना जबर दुखापत होत असे. काही वेळा त्यांना आपली बोटेही गमवावी लागत. म्हणून शाहू महाराजांनी आपल्या हाती राज्यकारभार घेऊन वर्ष होते न होते तोच



२९ मे १८९५ रोजी दरबारामार्फत पुढील जाहिरात त्यांनी प्रसिद्ध केली होती. 'घाण्यामध्ये हात सापडणार नाही, अगर सापडलाच तर त्यास इजा होणार नाही, अशा तऱ्हेची त्यात काही यांत्रिक युक्ती तारीख १ जानेवारी १८९६ च्या आत कोणी शोधून काढल्यास ज्यांची युक्ती सोपी थोडक्या खर्चात व पसंत अशी ठरेल त्यास चांगले बक्षीस देण्यात येईल.'

१८९६-९७ मध्ये कोल्हापूर प्रदेशात पडलेल्या दुष्काळात ७५ मैलाचे रस्ते तयार करून घेऊन शाहू महाराजांनी जाणीवपूर्वक कदाचित महाराष्ट्रातील पहिली रोजगार हमी योजना राबणाऱ्या हातांसाठी कार्यवाहीत केली आणि तीही या दुष्काळात काम करणाऱ्या लेकुरवाळ्या बायाबापड्यांसाठी होती इतकेच नव्हे, तर त्यांच्या मुलांचा योग्य तो सांभाळ कामाच्या वेळी व्हावा म्हणून खास शिशुगृहे उघडण्यासही ते विसरले नव्हते.

भारतात ब्रिटिश सरकारने अपघातात सापडून शारीरिक इजा झालेल्या किंवा मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक स्वरूपात नुकसानभरपाई देण्याचा सविस्तर कायदा १९२३ साली लागू केलेला होता. परंतु त्याही आधी २९ जून १९०१ रोजीचा करवीर सरकारचा खाणीत काम करणाऱ्या कामगारांच्या कामाची परिस्थिती आणि वेतनपावती याबाबत सविस्तर माहिती मालकांनी पाठवावी. म्हणून प्रसिद्ध केलेला वटहुकूम उपलब्ध आहे. त्यामध्ये खाणीत कामगारांना जे अपघात होतात, त्याची माहिती देण्याची सक्ती करण्यात आलेली पाहावयास मिळते.

## उपेक्षित घटकांविषयी कणव

लहान-मोठ्या हॉस्पिटलमधून डॉक्टरांच्या बरोबरीने काम करणाऱ्या परिचारिका (नर्सेस) या अजूनही तसा समाजातील उपेक्षित असा घटक आहे. शाहू महाराजांनी ४ जानेवारी १९१७ रोजी परिचारिकांचा मेहनताना कसा द्यावयाचा, यासंबंधी सविस्तर ठराव केलेला आढळून येतो. त्यामध्ये नर्सेस मुक्कामी राहिल्यास त्यांना जेवण व इतर आवश्यक वस्तू दिल्या पाहिजेत हे जसे नमूद करण्यात आले आहे तसे त्यांनी (नर्सेसनी) बक्षिसी घेण्यासाठी

भांडण करायचे नाही हेही सांगण्यात आले आहे.

भर दुपारच्या उन्हात शाहू महाराज बावडा बंगल्यावरून आपल्या खडखड्यामधून (रथ) गावात येत होते. तेव्हा त्यांना एक खेडूत स्त्री डोक्यावर भला मोठा शेणीने भरलेला हारा घेऊन चाललेली दिसली. त्या स्त्रीचा चेहरा घामाने डबडबलेला होता. इतके मोठे ओझे घेऊन ती त्या शेणी विकण्यास बाजारात चालली होती. तिला ते ओझे सहन होत नव्हते तरीही पोटासाठी ती रखडत रखडत चालतच होती. महाराजांना हे पाहवले नाही. त्यांनी त्या स्त्रीला थांबवून हाऱ्यातील १२ आणे किमतीच्या शेणींना दोन रुपये देऊ करून तिचा हारा गाडीत रिकामा करण्यास सांगितले. परंतु त्या प्रामाणिक स्त्रीने १२ आण्याच्या शेणी दोन रुपयास विकण्यास स्वाभिमानाने नकार दिला. तशी वरवर साधी दिसणारी ही घटना शाहू महाराजांना कष्टकऱ्यांबद्दल असणारी कणव दाखवण्यास पुरेशी बोलकी आहे.

शाहू महाराजांचे एक सांगाती गंगाराम कांबळे यांचीही आठवण माधवराव बागल संपादित 'श्री शाहू महाराज यांच्या आठवणी' या ग्रंथात वाचावयास मिळते. या काही शाहू महाराजांच्या जीवनातील प्रातिनिधिक घटना त्यांचा कष्टकरी कामगारांबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यास पुरेशा आहेत.

## कामगार चळवळींचा उगम

१७५० ते १८५० या कालखंडात इंग्लंडमध्ये प्रथमच औद्योगिक क्रांती घडून आली. विशेषत: कापड उत्पादनामध्ये वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी शोधून काढलेल्या वाफेच्या इंजिनपासून ते कापूस पिंजून तो स्वच्छ करण्यापर्यंत ज्या अनेक लहान-मोठ्या यंत्रांचा वापर सुरू झाला. त्यामधून कारागीर संघ आणि घरगुती उत्पादनाची जागा कारखाना पद्धतीने घेतली. यंत्रावर मोठ्या संख्येच्या कामगारांकडून अधिक वेगाने आणि प्रचंड प्रमाणात उत्पादन काढू लागले. त्या कारखाना पद्धतीला म्हणजेच भांडवलशाहीला राजेरजवाडे, सरंजामदार आणि धर्मसंस्थेने उचलून धरले. परिणामी कारखान्यांचे मालक असणाऱ्या भांडवलदारांनी जास्तीत जास्त नफा मिळावा म्हणून बाल, स्त्री आणि प्रौढ कामगार या सर्वांना वेठीस धरून त्यांची सर्वंकष पिळवणूक सुरू केली. राज्यसंस्था आणि धर्मसंस्थेच्या पाठिंब्यावर भांडवलदार-कारखानदारांची बेबंदशाही सुरू झाली. त्यामधून कामगारवर्गावर भयानक अत्याचार आणि अन्याय होऊ लागले आणि त्यामधून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कामगार चळवळ उभी राहिली. कामगार मोठ्या प्रमाणावर संघटित होऊ लागला.

## कामगार चळवळीचे जनक

भारतात मुंबईमध्ये १८५४ मध्ये पहिली कापड गिरणी सुरू झाली, तर कामगार चळवळ संघटनेचा आरंभ मुंबईत १८९० मध्ये झाला आणि त्याचे जनक होते महात्मा फुले यांचे एक बिनीचे शिलेदार-नारायण मेघाजी लोखंडे! म्हणून लोखंडे यांचे आद्य चरित्रकार मनोहर कदम यांच्या मते, महाराष्ट्रातील कामगार चळवळ ही तर सत्यशोधक चळवळीला फुटलेला एक धुमारा होता!

२३ सप्टेंबर १८८४ रोजी मुंबईमधील परळमध्ये सुपारी बागेत भारतातील पहिले कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांनी ४००० गिरणी कामगारांची पहिली जाहीर सभा घेऊन कामगारांना आठवड्याची सुट्टी देण्याची जोरदार मागणी केली. त्यासाठी कामगारांना जवळ जवळ ६ वर्षे झगडण्यास भाग पडले. शेवटी १० जून १८९० रोजी कामगारांना आठवड्याची सुट्टी मिळाली.

भारतातील कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा परस्पर परिचय होता की नाही, याबाबत दाखले नाहीत. परंतु मुंबईमध्ये १८९३-९४ मध्ये झालेली हिंदू-मुस्लीम दंगल शांत करून दोन्ही धर्मांच्या लोकांमध्ये सलोखा निर्माण करण्यात लोखंडे यांचा पुढाकार होता. शाहू राजे कोल्हापूरच्या गादीवर बसल्यानंतर पुण्यात सार्वजनिक सभेने त्यांचा जो सत्कार केला होता, त्या सत्कारास उत्तर देताना मुंबईमधील हिंदू-मुस्लीम दंगल मिटवण्यासाठी दोन्ही धर्मांच्या नेत्यांना ते कळकळीची विनंती करताना दिसतात.




यावरून भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांची थोडीफार माहिती त्यांच्या कानावर गेली असावी असे अनुमान केले तर ते चुकणार नाही, असे वाटते.

मुंबईमधील दुसरे कामगार नेते सीताराम केशव बोले ऊर्फ लोकहितकर्ते बोले यांच्याशी मात्र शाहू महाराजांची गाढ मैत्री होती. त्यांच्यातील परस्पर संबंधावर डॉ. धनंजय कीर यांनी आपल्या 'लोकहितकर्ते बाबासाहेब बोले' या प्रसिद्ध चरित्रग्रंथात अधिक प्रकाश टाकला आहे. वेदोक्त प्रकरणात शाहू महाराजांच्या विरोधात २२ ऑक्टोबर आणि २९ ऑक्टोबर १९०१ रोजी केसरीमध्ये 'वेदोक्ताचे खूळ' असे जे दोन अग्रलेख प्रसिद्ध झाले होते त्या संदर्भात लोकहितकर्ते बोले यांनी लोकमान्य टिळकांना जाब विचारलेला दिसतो.

## कामगार चळवळीला बळ

भारतातील कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मृत्यूनंतर म्हणजे १८९७ मध्ये मुंबईच्या कामगारांचे नेतृत्व लोकहित कर्ते सी.के.बोले यांच्याकडे आले होते. त्यांच्या जोडीला बहुजनी आद्य शिवचरित्रकार कृष्णाजी अर्जुन केळुसकर, हरिश्चंद्र तालचेकर, भिवाजी रामजी नरे, शिवराम वामन पाटील इत्यादी कामगार नेते होते. त्यांच्याच सहकार्याने लोकहित कर्ते बाबासाहेब बोले यांनी १९०९ साली कामगार हितवर्धक सभा या संस्थेची स्थापना केली होती. या संस्थेशी शाहू महाराजांचा संबंध आला. कारण या कामगार नेत्यांपैकी हरिश्चंद्र तालचेकर हे कोल्हापूर शाहू मिलचे मुंबईचे प्रतिनिधी होते.

शाहू महाराज आपल्या अभ्यासू वृत्तीनुसार युरोपमधील कामगार

चळवळीकडे लक्ष ठेवून होते. इंग्लंडसारख्या देशात राजेशाहीने कारखानदार पद्धतीला म्हणजेच भांडवलशाहीला पाठिंबा दिला असताना शाहू महाराज मात्र कामगारांच्या बाजूने उभे असल्याचे दिसतात. त्यांचे आणि लोकहितकर्ते बोले यांचे मैत्रीचे संबंध दिवसेंदिवस वाढतच गेलेले आढळून येतात. बोले यांच्या संयमी परंतु संघर्षवादी नेतृत्वाखाली कामगार हितवर्धक सभेचे कार्य जोमाने सुरू होते. १० नोव्हेंबर १९१८ रोजी त्यांनी मुंबईच्या परळ भागात कामगारांची सभा बोलावली होती. त्या सभेला १० हजार कामगार व इतर मागासवर्गीय लोक हजर होते. या सभेचे अध्यक्षस्थान शाहू महाराजांना देण्यात आले होते. प्रत्यक्ष छत्रपती आपल्या कामगारांच्या सभेला अध्यक्ष म्हणून येत आहेत हे पाहून त्यांना खूप आनंद वाटला. शाहू महाराजही अशा संधीची वाटच पाहत होते. शाहू महाराज सभास्थानी येताच कामगारांनी त्यांचा मोठ्याने जयजयकार केला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास आपण मला निमंत्रित केले आहे. हे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला विशेष आनंद व अभिमान वाटत आहे. कारण मी आपल्यापैकीच एक आहे. मागासलेल्या लोकांचा मार्गदर्शक होऊन त्यांना उच्चस्थिती प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यात मला आनंद वाटतो. गरीब लोकांसंबंधी खूप जिव्हाळा असल्याने त्यांनी त्याच भाषणात यांच्यासंबंधी कृतज्ञता व्यक्त केली आणि मग शाहू महाराज आपल्या मुख्य विषयाकडे आले. यामध्ये त्यांना पाश्चात्त्य देशात भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग आहेत. येथील कामगार प्रामुख्याने अधिक वेतन मिळावे म्हणून संघटित झाला आहे. त्यासाठीच त्याला झगडावे लागते असे प्रतिपादन करून या कामगारांना हवा असणारा दर्जा कोणत्याही अडथळ्याशिवाय मिळू शकतो. परंतु आपल्या देशातील कामगारांची परिस्थिती यांच्यापेक्षा खूपच वेगळी आहे. येथील कामगारांना हवा असणारा दर्जा प्राप्त होऊ शकत नाही. कारण तो प्राप्त करण्यात त्याची जात आडवी येते. म्हणून जातवार प्रतिनिधित्वाचा मी जोरदार आग्रह करतो आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्याच शब्दात त्यांचे हे कामगारांसंबंधीचे विवेचन वाचणे अधिक योग्य ठरेल ते पुढीलप्रमाणे :

'मुंबई शहर हे व्यापार व उद्योगधंदा याबाबतीत सुप्रसिद्ध आहे. धनिकांचे भांडवल व कारखानदारांचे व्यवस्थापन चातुर्य यावरच हा व्यापार व उद्योगधंदा अवलंबून आहे, अशी आजपर्यंत इकडच्या प्रांती समजूत होती. पाश्चात्त्य देशात भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तिकडेही भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तिकडेही भांडवलदार लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता चाले; पण आता मजूरदार लोकांनी आपले संघ बनविले आहेत. गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते, पण अशा अनेक काड्यांचा वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येते. मजूरदार लोकांना विलायतेत मजुरी वाढवावी एवढ्याकरिताच झगडावे लागते. तेथील समाजामध्ये कोणत्याही दर्जास पोहोचण्यास जन्मसिद्ध अडचणी मुळीच नाहीत. त्यामुळे ते उच्च वर्गात सहज रीतीने मिसळतात. तशी स्थिती आमच्या इकडे नाही. विलायतेत मजूरदार लोकांच्या संघांना बरेच महत्त्व आले आहे. पार्लमेंटसारख्या संस्थांमध्ये व प्रधान मंडळात त्या लोकांतीलच प्रतिनिधी शिरले असून ते आपल्या वर्गाच्या हिताचे योग्य रीतीने संरक्षण करीत आहेत.'

पुढे ते सांगतात, 'आजचा मुंबईतील हा कामगारवर्ग त्यापूर्वी मागासलेला असा शेतकरीच होता. मीही याच वर्गातील आहे. परंतु आपल्या सर्वांच्या प्रगतीच्या आड आपले जातिभेद येत आहेत. इंग्लंडमध्ये मजूर आणि भांडवलदार यांच्या प्रतिनिधींकडून कामगारांच्या कल्याणाची काळजी घेतली जाणार नाही. तोच प्रकार आपल्या देशात आहे. पुढारलेल्या लोकांकडून (वर्ग) मागासलेल्या वर्गाच्या हितसंबंधाची जोपासना होणार नाही. म्हणूनच वर्गवार किंवा जातवार




**कर्नाटक ब्राम्हणेत्तर सामाजिक परिषदेला उपस्थित असताना हुबळी येथील सिद्धारूढ स्वामी यांच्यासमवेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज.**

प्रतिनिधी निवडण्याचे हक्क मिळावेत, यासाठी मी खटाटोप करत आहे. शेवटी ते कामगारांना संघटित होण्याची पुढील शब्दात हाक देतात. इंग्लडात मजूरदारांनी आपल्या उन्नतीकरिता आपले संघ स्थापन करून स्वावलंबनाचे मार्ग स्वीकारले. त्याप्रमाणे आपण आपले सुव्यवस्थित संघ तयार केले पाहिजेत. आपल्या मुलाबाळांस शिक्षण देऊन आपले आरोग्य वाढवण्याचे प्रयत्न करून आपली उन्नती आपणच करून घेतली पाहिजे. दुसरा आपल्याकरिता काही करील अशी अपेक्षा करणे काहीही कमीपणाचे आहे. ही गोष्ट अहर्निश लक्षात ठेवा. परळची ही कामगार सभा यशस्वी झाल्याचा वृत्तांत छत्रपती शाहू महाराजांनी गव्हर्नर विलिंग्डन यांना कळवला.

परळ येथील यशस्वी सभेनंतर शाहू महाराजांच्या विनंतीनुसार लोकहितकर्ते सी.के.ऊर्फ बाबासाहेब बोले यांनी लोकसंघ या संस्थेची स्थापना केली. या लोकसंघाचे कार्यवाही म्हणून बोले काम पाहू लागले, त्यांच्या जोडीला रामचंद्र विठ्ठल वंडेकर, परशरामराव शिंदे, दामोदर सावळाराम यंदे, भास्करराव जाधव, हरिश्चंद्र तालचेरकर इत्यादी बहुजन समाजातील नेते खांद्याला खांदा लावून काम करत होते.

मागासवर्ग आणि कामगारवर्गाची आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक अशी सर्वांगीण प्रगती करणे हाच लोकसंघाचा प्रमुख उद्देश होता. शाहू महाराजांनी कामगार कल्याणासाठी कटिबद्ध असणाऱ्या या लोकसंघाला ५,००० रुपयांची देणगी जाहीर करून त्यापैकी १००० रुपये बाबासाहेब बोले यांच्याकडे लगेच सुपुर्द केले होते.

१९१८ च्या नोव्हेंबर महिन्यात शाहू महाराजांचा मुंबई येथेच मुक्काम होता. ते कामगारांच्यात मिळून-मिसळून त्यांच्याशी सुसंवाद करत होते. त्यांचे प्रश्न समजावून घेत होते. याच महिन्याच्या २४ तारखेला लोकसंघाची स्थापना झाल्यावर मुंबईमध्ये ग्रँटरोडवर शाहू महाराजांची कामगार आणि मागासवर्गीयांना मार्गदर्शन करण्यासाठी दुपारी सभा झाली.

या उद्‌घाटनाच्या भाषणात त्यांनी इंग्लंडमध्ये भांडवलदार आणि कामगार हे परस्परविरोधी हितसंबंध असणारे वर्ग परस्परांच्या हक्कांच्या आड येत नाहीत. याउलट ते परस्पराच्या हक्कांचा आदर करतात! त्यामुळे तंटे किंवा संघर्षाचे प्रमाण कमी होते. परंतु आपल्या देशात वरिष्ठ लोकांना खालच्या लोकांना त्यांचे मूलभूत हक्क देणे मान्य नसल्यामुळे हा वर्ग अज्ञानात आणि गुलामगिरीत खितपत पडला आहे. त्यामधूनच ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद सतत पेटत राहतो. हे स्पष्ट करत त्यांनी रशिया आणि जर्मनीमधील निरंकुश राज्यसत्ता नष्ट होऊन कामगारांची प्रजासत्ताक राज्ये उदयाला येत आहेत म्हणून त्यासंबंधी आनंद व्यक्त करत इंग्लंडमध्येही मजूर पक्षाचा जोर वाढत चालला असल्याचे नमूद केले आहे. या भाषणाच्या शेवटी भारतीय



कामगारांना ते संघटित होण्याचे कळकळीचे आवाहन करताना दिसतात, येथे इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वांस हक्क काय आहेत ते कळले पाहिजे. भांडवलवाल्यांत ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे. माझी जनक आई मुधोळकर घोरपडे घराण्यातील, दत्तक आई शिर्के घराण्यातील. दत्तक वडील भोसले कुळातील, असे शेतकरी वर्गातील होते. हलक्या दर्जाचे व अशिक्षित लोकांशी सहवास ठेवणे बरे नाही, अशी पुष्कळांची समजूत आहे. मलाही तसा आदेश होत असे, परंतु ज्या शेतकरी मजूरवर्गात माझे कूळ वाढले,




त्यांच्याविषयी प्रेम व अगत्य हे जन्मसिद्ध असल्याने अशा शिकवण्याचा माझ्यावर परिणाम होणार नाही, कारण माझ्या हाडीमासी शिपाईगिरी, शेतकरी यांचे रक्त खेळत आहे. म्हणून मला आपल्यात मिळण्यास आनंद वाटतो.

थोडक्यात, शाहू महाराज आणि मुंबईचे प्रसिद्ध कामगार नेते लोकहितकर्ते सी.के. ऊर्फ बाबासाहेब बोले या उभयतांमध्ये दिवसेंदिवस सहकार्य वाढतच गेलेले दिसून येते. शाहू महाराजांनी हाती घेतलेल्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला बाबासाहेब बोले जसा मन:पूर्वक सक्रिय पाठिंबा देत होते, तसे शाहू महाराज बोले यांच्या कामगार-कल्याण चळवळीत प्रत्यक्ष सहभागी होत होते. त्यामधून त्यांचे कामगार वर्गासंबंधी असणारे प्रेम दिसून येत होते.

कष्टकरी वर्गाबद्दल आत्यंतिक जिव्हाळा असणाऱ्या शाहू महाराजांनी कष्टकऱ्यांना प्रतिष्ठा असली पाहिजे, हे आपल्या वर्तनातून अनेकदा दाखवून दिले होते. त्यामुळे शारीरिक श्रमाची लाज वाटता कामा नये हे जणू आपल्या प्रजेला कळण्यासाठी मृत झालेल्या हत्तीचे प्रचंड धूड नोकरांना गावाबाहेर हालवणे कठीण जात आहे, हे समजताच त्याजागी प्रत्यक्ष जाऊन तो हत्ती ओढण्यास मदत करून कामचुकार नोकरांना आणि बड्या खेडुतांना शाहू महाराजांनी आश्चर्यचकित केल्याची आठवण त्यांचे एक सांगती जगन्नाथ रघुनाथ आजगावकर यांनी आपल्या 'प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी' या ग्रंथात समरसतेने दिली आहे!

**(लेखक हे राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीचे माजी सदस्य सचिव आहेत.)**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या वास्तुंपैकी एक महत्त्वपूर्ण वास्तू म्हणजे कोल्हापुरातील न्यू पॅलेस आणि येथील संग्रहालय होय. शाहू महाराजांच्या स्पर्शाने पावन झालेल्या त्यांच्या वापरातील अनेक वस्तूंचा संग्रह असणारे शहाजी छत्रपती म्युझियम हे शाहू महाराजांच्या आठवणींना उजाळा देते.**

# प्रेरणादायी समृद्ध वारसा

**वृषाली पाटील**

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी, सामाजिक परिवर्तनासाठी जीवनभर झटणाऱ्या लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणून कोल्हापूरची वेगळी ओळख आहे. इथल्या मातीला लोकराजा शाहू महाराजांच्या विचारांचा व महान कार्याचा वारसा लाभला आहे. जसजसे आपण शाहू महाराजांच्या कार्याविषयी जाणून घ्यायला लागतो, तसतसे त्यांच्या कार्याची महती उलगडत जाते आणि आपण शाहूमय होऊ लागतो. कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बस स्थानकाकडून रमणमळ्याकडे जाताना अवघ्या ३ कि.मी. अंतरावर लक्षवेधक नवा राजवाडा आहे. अगदी दिमाखात उभा असणारा हा नवा राजवाडा न्यू पॅलेस म्हणून सर्वपरिचित आहे. राजवाड्याच्या वैभवात भर घालते ते ऐतिहासिक वस्तूंच्या माध्यमातून अनेक राजांच्या आठवणी जपणारे शहाजी छत्रपती म्युझियम. याठिकाणी असणारी छत्रपती शिवाजी महाराजांसह अनेक राजांची, महाराणींची व त्यांच्या काळातील घटनांची साक्ष देणारी छायाचित्रे व वस्तू लक्ष वेधून घेतात.

राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला दिसतो तो नयनरम्य तलाव. तलावाच्या काठी सांबर, हरिण, नीलगाय, शहामृग मोर, लांडोरसह विविध पक्षी आणि प्राणी अबालवृद्धांना आकर्षित करतात. प्राणी संग्रहालयापासून काही पावलावर दिसते ते नव्या राजवाड्याचे विलोभनीय दृश्य. या भव्य आणि दिमाखदार राजवाड्याकडे पाहिले की, राजघराण्याच्या वैभवाची प्रचिती येते. शाहू महाराजांचे कार्यकर्तृत्व जसे आभाळाएवढे, तसा राजवाडादेखील भव्य-दिव्य आणि आकर्षक आहे.

राजवाड्याच्या तळमजल्यावर असणाऱ्या शहाजी छत्रपती म्युझियमचे उद्घाटन करवीर संस्थानच्या महाराणी हर हायनेस श्रीमंत अ.स.सौ.सं.प्रमिलाराजे छत्रपती महाराणी यांच्या हस्ते श्रीमंत शाहू महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त ३० जून १९७४ रोजी झाले. हे म्युझियम दररोज



## शाहू महाराजांचे विचार पथदर्शी

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने कोल्हापूरला ओळखले जाते. शाहू महाराजांनी आपल्या दूरदृष्टीने करवीर संस्थानात अनेक उपक्रम आणि योजना राबवून या भागाचा विकास केला, जो आजही समाजाला पथदर्शी आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे आचार, विचार, कार्यातून समाजाची उन्नती साधणार असल्याने प्रत्येकाने राजर्षी शाहू महाराजांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. समाजसुधारणा कार्यात तत्कालीन प्रतिगामी विचारांचा विरोध त्यांना सहन करावा लागला, तरीही न डगमगता त्यांनी समाजसुधारणेचे कार्य सुरूच ठेवले. शाहू महाराजांना त्यांच्या कार्यातून जाणून घेऊन त्यांनी घालून दिलेला पुरोगामी विचारांचा वारसा आपण जतन करायला हवा.



शाहू महाराजांच्या विचारात मोठी ताकद आहे. या लोकराजांनी सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी, बहुजनांच्या न्यायासाठी लढा दिला. शाहू महाराजांचे कार्य प्रत्येक पिढीला मार्गदर्शक आहे. अतुलनीय दूरदृष्टी असलेल्या शाहू महाराजांनी कृषी, उद्योग, शिक्षण, व्यापार, जलसंपदा, वन, क्रीडा यांसारख्या महत्त्वाच्या विषयामध्ये केलेले काम आजही प्रेरणादायी व अतुलनीय आहे. समाजात समता नांदावी, यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मुल शिकावे यासाठी मुलांना शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना १ रुपये दंड आकारण्याची तरतूद केली. समाजाच्या विकासासाठी शैक्षणिक संस्थांची उभारणी, वसतिगृहे उभारून विविध धर्मियांच्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय, रुग्णालयात विविध आरोग्य सेवासुविधा, खेळाडूंना प्रोत्साहन अशी कितीतरी कामे महाराजांनी केली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्वात लोकराजा शाहू महाराजांच्या कार्याला उजाळा देण्यात येत आहे. शाहू महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांच्या संकल्पनेतील विकास घडवण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्नशील राहू या, हीच कृतज्ञता पर्वात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आदरांजली ठरेल.

**- श्री शाहू छत्रपती ( छत्रपती शाहू महाराज यांचे वंशज)**

सकाळी ९. १५ ते सायंकाळी ५.३० या वेळेत खुले राहत असून माफक प्रवेश शुल्कामध्ये ते पाहता येते.

## प्रवेश दालन

राजवाड्याच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर उजव्या बाजूला राजर्षी शाहू महाराजांचे मोठे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांचे भव्य अश्वारुढ रेखाचित्र लक्ष वेधून घेते. बाजूलाच शाहूकालीन कोरीव काम केलेल्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. शिसव लाकडाचे कोरीव काम केलेली कपाटे, आकर्षक शोकेस ठेवण्यात आली आहेत. राजर्षी शाहू महाराजांना दोन पुत्र व एक मुलगी. त्यांचे थोरले चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज व प्रिन्स शिवाजी




यांचे पुतळे सुबक कामाचा उत्कृष्ट नमुना असलेल्या टेबलावर ठेवण्यात आले आहेत.

## हत्ती दालन

दरवाजातून आत गेल्यावर हत्तीचे दालन दिसून येते. पूर्वीच्या काळी राजांची हत्तीवरून चांदीच्या अंबारीतून मिरवणूक निघत असे. या मिरवणुकीच्या भव्यतेचे स्मरण करून देणारा हत्तीचा पुतळा. त्यावर भरजरी झूल (घाशा).. दागिन्यांनी मढवलेल्या हत्तीवर चांदीची अंबारी त्या काळच्या मिरवणुकीची भव्यता विशद करते. बाजुला चांदीचा हौदा, दंडातील वाक्या, वस्त्रे, तुरा, शिरपेच, शिवकालीन जरी पटका, जुनी नाणी आणि विविध घराण्यांच्या पगड्या, चांदीच्या तोफा, हत्तीच्या दातावर लावण्याचे दिवे हेही अनोखच आहे.

## लाकडी वस्तूंचे दालन

पुढे उजव्या बाजूच्या दालनामध्ये



सांबराच्या शिंगापासून तयार केलेले मेज (टिपॉय), टेबल लॅम्प, शोकेस, छत्रपती घराण्याचा वंशपरंपरागत पाळणा दिसून येतो. करवीर संस्थानात विविध स्पर्धातील विजेत्यांना पारितोषिक देऊन प्रोत्साहन देण्याकडे महाराजांचा कल होता हे या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या विविध साहित्यातून दिसून येते. याच दालनात ऐतिहासिक लाकडी वस्तूंची आकर्षक पद्धतीने सजावट केल्याचे दिसते. डाव्या

### छत्रपती शाहू दालन

म्युझियममधील महत्त्वपूर्ण दालन म्हणजे छत्रपती शाहू दालन. या दालनात डावीकडे शाहू महाराजांची शिकार कँपमधील खुर्ची, कार्यालयीन खुर्ची, उजवीकडे महाराजांची दिल्ली दरबारची खुर्ची ठेवण्यात आली आहे. तत्कालीन डेक्कन स्टेट संस्थानिकांसोबत शाहू महाराजांचे छायाचित्र अन्य विविध छायाचित्रांसह येथे लावण्यात आले आहे.

त्या काळी शाहू राजांनी इंग्लंडसह

हत्तीची झुंज, छत्रपती शाहू महाराजांचे अधिकार ग्रहण (१८९४) प्रसंगीची चित्रे लक्ष वेधून घेतात. बाजूला कपाटात गिंडी, जग, तोटी असलेला तांब्या, पितळेचा खलबत्ता अशी मोठाली भांडी आकर्षक आहेत.

शाहू महाराज धारवाड येथे शिक्षणासाठी गेल्याचे दाखले संग्रहालयात पाहावयास मिळतात. पहिले राजाराम महाराज यांच्या इटलीमधील फ्लॉरेन्स येथील स्मारकालाही महाराजांनी भेट दिली होती. महाराजांच्या





भिंतीवर करवीर संस्थापिका महाराणी ताराराणी यांचे अश्वारूढ रेखाचित्र आहे. हे रेखाचित्र ताराराणींच्या शालीन, घरंदाजपणा बरोबरच खंबीरतेची साक्ष देते.

वस्तूसंग्रहालयातील पुस्तके ठेवण्याचे भलेमोठे काचेचे कपाट शाहू महाराजांची वाचनाची आवड आधोरेखित करते. प्रत्येक कोपऱ्यात ठेवण्यात आलेल्या संगमरवरी कॉर्नर पीसचे रेखीव काम अवर्णनीय असेच आहे. बैठक व्यवस्था आणि सोफ्याची रचना पाहिली की त्या काळी युद्धनीती, गुप्त बाबींची खलबते होण्याच्या दृष्टीने सोफ्यांची रचना केल्याचे दिसते. पूर्वी दूरच्या प्रवासासाठी राजे-रजवाडे घोड्याचा अथवा माणसांचा वापर करत, तर राजघराण्यातील स्त्रिया आणि लहान मुलांच्या प्रवासासाठी सुरक्षित असा मेण्याचा वापर करत असत. राजघराण्यातील प्रवासासाठीचा मोठा मेणा या ठिकाणी ठेवण्यात आला आहे. पुढे काचेच्या पेटीत ठेवलेली सुबक भरतकाम व मण्यांचे काम केलेली वस्त्रेदेखील आकर्षक आहेत.

अनेक देशांना भेटी दिल्या होत्या. राजांच्या विदेश भेटींची छायाचित्रे येथे लावण्यात आली आहेत. भोला घराण्याच्या (१९४६) पैलवानांचे (सध्या पाकिस्तानच्या लाहोर येथील) छायाचित्र पाहिले की, राजांनी कुस्ती खेळाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न अधोरेखित होतात. महाराजांच्या विविध टप्प्यातील म्हणजेच अकराव्या, बाराव्या आणि पंधराव्या वर्षातील शाहू महाराज, १८९४ मधील शाहू महाराजांची छायाचित्रे त्यांचे बालपण, युवा काळाचे स्मरण करून देतात. पुणे येथील शिवाजी मेमोरिअल फाऊंडेशनच्या उद्घाटनप्रसंगी प्रिन्स ऑफ वेल्स समवेत महाराजांचे (१९२१) छायाचित्र, लेडी व लॉर्ड विलिंग्डन यांच्यासमवेत महाराजांचे छायाचित्रही येथे पाहावयास मिळते. त्याचबरोबर खासबाग मैदानातील कुस्त्यांसाठीची गर्दी, कोल्हापूर व राधानगरी येथे महाराजांनी बांधलेले साठमारी मैदान, शाहू महाराजांचा भैऱ्या, महाराजांनी शिकवून तयार केलेल्या शिकारी कुत्र्यांकडून जंगली वाघाची शिकार केल्यानंतरचे छायाचित्र,

विविध ठिकाणांच्या भेटींची आठवण करून देणारी छायाचित्रे येथे आहेत. भावनगरचे महाराज श्रीमंत भाऊसिंगजींच्या सोबतचे तसेच महाराजांच्या फ्लॉरेन्स येथील स्मारकाच्या भेटीचे छायाचित्र येथे लावण्यात आले आहे. शाहू राजांचे जीसीआयई रोब, केंब्रिज एलएलडी रोब यासह राजघराण्याची भरजरी उंची वस्त्रे आपल्या नजरेत भरतात.

पुढच्या खुल्या दालनात करवीर संस्थानकालीन दिमाखदार दसरा मिरवणुकीचे छायाचित्र आहे. शाहू महाराजांच्या पत्नी महाराणी लक्ष्मीबाई उर्फ आईसाहेब महाराज





यांचा येथील संगमरवरी पुतळा लक्ष वेधून घेतो. एक हजार इंडियन गिनीज ही शर्यत जिंकल्यानंतरचे घोडींचे छायाचित्र आहे. त्याकाळच्या चांदीच्या वस्तू, हस्तिदंतापासून तयार केलेला पिंजरा, साळींदरांच्या पीसापासून तयार केलेला पिंजरा येथे आहे. समोर खुल्या दालनात गेंड्याच्या पाया पासून तसेच विविध प्राण्यांच्या अवशेषापासून तयार केलेल्या उपयोगी वस्तू, लॅंप स्टॅंडसह अन्य उपयोगी वस्तू ठेवण्यात आल्या आहेत.


## भव्य दरबार हॉल

म्युझियमचे मुख्य आकर्षण म्हणजे भव्य शाही दरबार हॉल. दरबार हॉलमध्ये समोरच्या बाजूला प्रशस्त आसन व दोन्ही बाजूला दोन मोठी आसने आणि राजदरबारातील सदस्यांना बसण्यासाठी साधारण १५० आसन व्यवस्था पाहिली की राजांच्या राजदरबाराची भव्यता कळून येते. या दरबार हॉलच्या खिडक्यांवर स्टेन ग्लास पेंटिंगमध्ये चित्रमय शिवचरित्र कोरण्यात आले आहे.

## शस्त्रास्त्र दालन

शस्त्रास्त्र दालनात प्रवेश केला की, समोरच दोन तोफा ठेवलेल्या दिसतात, त्या सलामी देण्यासाठी उभ्या असल्याचा भास होतो. राजांनी वापरलेल्या विविध शस्त्रास्त्रांची मांडणी आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे. यात तलवारी, बंदुका, भाला, ढाल अशी शस्त्रास्त्रे आहेत. या दालनात निमचा, पेश कब्ज, सकेला, सुरा, तेगा मराठा पट्टनी आलेमानी, धोप कर्नाटकी, कट्टी (कर्तिक), पट्टा (दुधारी), तेगा हिंदुस्थानी, तलवार सुराऊ, धोप (व्दिपल्ल), फिरंगी, सकेला (सखेलक), तलवार मुग्राबी, किरच, क्रिस, जंबिया आदी विविध प्रकारची हत्यारे पाहिली की शस्त्रास्त्र साठ्याची विपुलता लक्षात येते. बाहेरच्या बाजूला शाहू महाराजांनी तयार करून घेतलेली साठमारीची हत्यारे, तेगा इराणी, खांडा मछेली-मत्स्य खड्ग, मत्स्य खड्ग दुधारी, तेगा मराठा, किरच पट्टा पान, धोप कर्नाटकी यासह अनेकविध हत्यारे आकर्षक पद्धतीने मांडण्यात आलेली आहेत.

दरबार हॉल व शस्त्रास्त्र दालनामध्ये खुल्या दालनात छत्रपती संभाजी पहिले यांच्या कारकीर्दीतील करवीर आरमारातील लढाऊ जहाजे (१७१४ ते १७६०) मागे सिंधुदुर्ग किल्ल्याची कलाकृती असून समोर जहाजांच्या प्रतिकृती आहेत. समोरच्या बाजूला आकर्षक आणि लक्षवेधक तैल रंगातील चित्रे आहेत. तसेच छत्रपती राजाराम (दुसरे) यांची आवडती घोडी शिवगंगाची कलाकृती, भरजरी कापडावर तैल रंगाने



चितारलेली चित्रे आहेत. छत्रपती घराण्याचा वंशवृक्ष, भोसले, खानवटकर, पवार घराण्याची वंशावळ, मेवाड घराण्याच्या वंशावळीची माहिती लावण्यात आली आहे. पुढच्या दालनात हत्तीवर घालण्याचे चांदीचे मोर ठेवण्यात आले आहेत. याच दालनात श्रीमंत शहाजी महाराजांची विविध छायाचित्रे आहेत.

## शिकार दालन

शाहू महाराजांना शिकारीची खूप आवड असल्याचे अनेक दाखले आहेत. वाघ, हरीण, चित्त्याची असेच रानडुकराची शिकार करण्यात ते तरबेज होते. याचबरोबर चित्ते आणि शिकारी कुत्र्यांना प्रशिक्षण देऊन शिकार करण्यासाठी त्यांना तयार करण्याचे नवे तंत्र त्यांनी राबवले होते. शिकारीसाठी




रानावनात भटकंती करत जाताना तेथील लोकांच्या अडचणी ते सोडवत असल्याचे दिसते. मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर जॉर्ज लॉईड व लेडी लॉईड यांच्यासह अन्य तत्कालीन मान्यवरांनी देखील राजर्षी शाहू महाराजांसोबत एप्रिल १९२१ मध्ये दाजीपूरच्या जंगलात शिकार दौरा केला होता. या म्युझियममध्ये शाहू राजांनी केलेल्या विविध प्राण्यांच्या शिकारीचे नमुने प्रक्रिया करून ठेवण्यात आले आहेत. शिकारीचे दाखले देणारी अनेक छायाचित्रे या ठिकाणी लावण्यात आली आहेत. राजांनी केलेल्या जंगली प्राण्यांच्या शिकारीचे येथील नमुने बघितले की, राजांच्या धैर्याचा अंदाज येतो.

## नक्कीच पाहण्यासारखे संग्रहालय

'A State of India' च्या 'Maharashtra' या पुस्तकात वस्तुसंग्रहालय व दरबार हॉलच्या छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची, त्यांच्या पुरोगामी विचारांची ओळख करून देणारे हे संग्रहालय प्रत्येकाने पाहावे असे आहे. लोकराजा शाहू महाराजांच्या काळातील वस्तू, शस्त्रास्त्रे, नाणी, राजदरबार यासह त्यांनी वापरलेल्या वस्तूंचा संग्रह या ठिकाणी करण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या पुनीत स्पर्शाने पावन झालेल्या या ऐतिहासिक वास्तूमधील एक-एक वस्तू राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे स्मरण करून देते. कोल्हापुरातील न्यू पॅलेसमधील हे ऐतिहासिक शहाजी छत्रपती म्युझियम नक्कीच भेट देण्यासारखे आहे.

माहिती अधिकारी, कोल्हापूर

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज... समाजाला नवी दिशा देणारा लोकराजा... या लोकराजाच्या विचारांचे स्मरण करून त्यांचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने १८ एप्रिल ते २२ मे २०२२ या कालावधीत 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्व' साजरे केले जात आहे.**

# कृतज्ञता पर्व

शाहू महाराजांनी सुरू केलेली कापड मिल म्हणजे श्री शाहू छत्रपती मिल.. म्हणूनच या मिलमध्ये कृतज्ञता पर्वाचे विविध कार्यक्रम घेण्याचे ठरले. कृतज्ञता पर्वच्या माध्यमातून शाहू महाराजांचे कार्य सर्वदूर पोहोचवण्यासाठी आणि एकूणच कृतज्ञता पर्वच्या यशस्वितेसाठी श्री शाहू छत्रपती मिलच्या साफसफाईसह कार्यक्रमांच्या नियोजनात गृह राज्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील यांनी पुढाकार घेतला. ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्यासह जिल्ह्यातील खासदार, लोकप्रतिनिधी यांनीही या उपक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

## वंदन लोकराजाला

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्व अंतर्गत ६ मे रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दी दिनी अवघे कोल्हापूर १०० सेकंद स्तब्ध झाले. सकाळी ठीक १० वाजता जिथे आहे तिथे १०० सेकंद स्तब्ध उभे राहून लोकराजाला कोल्हापूरकरांनी अनोखी मानवंदना देवून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विचार व कार्याचे स्मरण केले. शाहू समाधी स्थळ येथे विविध विभागांचे मंत्री, खासदार, लोकप्रतिनिधी विविध क्षेत्रातील मान्यवर, एन.सी.सी.चे विद्यार्थी, नागरिक यांनी स्तब्ध उभे राहून लोकराजाला अभिवादन केले.


छायाचित्रकार : सौरभ पाटील, कोल्हापूर.

**श्री शाहू समाधी स्थळ येथे श्री शाहू महाराज छत्रपती, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पालकमंत्री सतेज पाटील यांच्यासह संपादक, विविध क्षेत्रातील मान्यवर, शाहू प्रेमी, नागरिक, विद्यार्थी यांनी स्तब्ध उभे राहून लोकराजा शाहू महाराजांना विनम्र अभिवादन केले.**

## कृतज्ञता पर्वाची सुरुवात

विविध रंगात रेखाटलेल्या रांगोळ्या.. फुलांच्या पाकळ्यांच्या पायघड्या.. चित्तथरारक शिवकालीन मर्दानी खेळ.. ढोलताशांचा दुमदुमाट.. छत्रपती शिवाजी महाराज की जय..! महाराणी ताराराणी की जय..! अशा जयघोषाच्या चैतन्यपूर्ण वातावरणात छत्रपती शिवाजी महाराज आणि करवीर संस्थापिका महाराणी ताराराणी यांच्या रथोत्सवाने कोल्हापुरातील ऐतिहासिक भवानी मंडपातून कृतज्ञता पर्वाची सुरुवात झाली.

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंगांची आठवण करून देणारी दुर्मीळ छायाचित्रे, लोकोपयोगी आदेश, कागदपत्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या हस्ते तसेच श्री शाहू छत्रपती व गृह राज्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

## विविध कार्यक्रमांची रेलचेल


राजर्षी शाहू महाराजांनी भरीव योगदान दिलेल्या विविध क्षेत्रांशी निगडित कार्यक्रम जिल्ह्यात घेण्यात येत आहेत. यात शालेय विद्यार्थ्यांसाठी कथाकथन स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन तसेच स्टार्टअप आणि गुंतवणूकदार समिट, १०० वक्त्यांचे एकाच वेळी १०० ठिकाणी व्याख्यान याद्वारे लोकराजाच्या कार्याचा जागर घालण्यात येत आहे. राजर्षी शाहू महाराजांनी अनेक कलांना राजाश्रय दिला. याच विचारातून कृतज्ञता पर्वामध्ये नाटक, संगीत नाटक, शाहिरी पोवाडे, १३० हून अधिक चित्रकार-शिल्पकारांच्या कलेचे एका छताखाली सादरीकरण करून कलेचा वारसा वृद्धिंगत व्हावा व राजांचे कार्य सर्वदूर पोहोचण्यासाठी विविध उपक्रम घेण्यात येत आहेत.

जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर

# महाराष्ट्र दिनः मानवंदना व अभिवादन...



महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६२व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील शिवाजी पार्क येथे मुख्य शासकीय सोहळ्यात राष्ट्रध्वजाला मानवंदना देताना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी. दरम्यान राज्यपाल श्री. कोश्यारी यांनी संचलनाचे निरीक्षण केले. तसेच राज्यातील नागरिकांना मराठीतून संबोधित केले.



संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना महाराष्ट्र दिनानिमित्त हुतात्मा चौक येथील स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

**O.I.G.S.** भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य **LOKRAJYA**

*If undelivered, please return to:*

प्रेषक / **From**

**अनिल आलूरकर**
**उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई–१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: दीपक कपूर